संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने १२ (६+६) किंमत ३ रुपये अहिल्यानगर, शुक्रवार दि. १४.०८.२०२६ अंक नं. ११६ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020

चष्मा नको?
आता चष्मा घालवा कायमचा
लेसर नेत्रशस्त्रक्रिया शिबीर
दि. २२ ऑगस्ट २०२६ शनिवार
नांव नोंदणी अंतिम तारीख १९ ऑगस्ट
वर्धापन दिनानिमित्त विशेष सवलत
नांव नोंदणीसाठी त्वरित संपर्क करा
9112288611
8888982222
वर्धमान, माणिक चौक, अहिल्यानगर
Contoura Vision
जी देऊ शकते अचूक दृष्टी
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
41 Years of Trust & Care वर्धापन दिन आणि स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
स्वातंत्र्य भारताचे... स्वच्छ, निरोगी आणि चष्मामुक्त दृष्टीचे स्वप्न साकार करण्याचा आमचा ४१ वर्षांचा प्रवास!
www.saisuryasupervision.com

सर्व नगरकारांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
स्वच्छ भारत, सुंदर भारत
* शुभेच्छुक *
साई टँक क्लिनींग सर्व्हिसेस
सोफा क्लीनींग आणि पेस्ट कंट्रोल उपलब्ध आहे.
इशान शेख
(M.Tech. Chemical)
9028330599
9834621600

CAMPUS move your way
८० व्या स्वातंत्र्य दिवस निमित्त हार्दिक शुभेच्छा..!
भव्य शुभारंभ
दि. १५ ऑगस्ट २०२६
उद्घाटन सोहळ्या निमित्ताने
पहिल्या १०० ग्राहकांना ५०० रुपये पर्यंत खरेदी मोफत
त्यानंतरच्या ग्राहकांना One Time Offer सुध्दा असेल




CAMPUS move your way
Shri. Shrenik Munot
Ground & First Floor, Shop No. 2, 3 & 4, Adventure Tower, Savedi Road, Opp. Oberoi Hotel, Bishap Lloyd Colony, Ahilyanagar
8484872592 / 9112664467

RAM AGENCY 49
राम एजन्सी
MARKETYARD 41
अहिल्यानगरचा विश्वास, इलेक्ट्रॉनिक्स सेवेत ४९ वर्षांचा प्रवास!
स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
▸ ₹0 डाऊन पेमेंट
▸ इ एम आय फक्त ₹999 पासून सुरू
▸ क्रेडिट कार्ड्स ऑफर



SAMSUNG | BLUE STAR | BOSCH | AKAI
MITSUBISHI ELECTRIC | IFB | VOLTAS A TATA Enterprise | HITACHI | Symphony
व अनेक ब्रँड एकाच छताखाली । फ्री होम डिलिव्हरी । फ्री डेमॉन्स्ट्रेशन
सावेडी 241 9141 | नवीपेठ 241 9142 | मार्केटयार्ड 241 9143
NO COST EMI BAJAJ FINSERV

Celebrating the Spirit of Freedom
HAPPY INDEPENDENCE DAY
Ahilyanagar's 1st Choice



For Dining, Leisure & Comfort.
Thank you for choosing us.
PARK CENTRAL HOTEL
Pure Veg Dinning | Luxurious Stay
Sattha Colony, Station Road, Ahilyanagar
CALL : 982395 1515 | 95113 33333 | www.parkcentralhotel.in

सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा 7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अँड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर. फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १४.०८.२०२६ | अंक नं. ११६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

असंख्य रक्तदात्यांच्या पाठबळावर १४वा वर्धापनदिन..
रक्तविघटन प्रयोगशाळा व अफेरेसिस तंत्रज्ञानासह नगर जिल्ह्यातील अत्याधुनिक अशी
– एकमेव एनएबीएच मान्यताप्राप्त –
अष्टविनायक ब्लड सेंटर
■ शासनमान्य रक्तपेढी ■ २४ तास अविरत सेवा
■ सर्व रक्तघटक उपलब्ध ■ ल्युकोडिप्लिटेड रक्तघटक उपलब्ध
■ २४ तास मोफत कुरिअर सेवा ■ नॅट टेस्टेड रक्त उपलब्ध
■ संपूर्ण सुरक्षित व गुणवत्तापूर्ण रक्त उपलब्ध
■ संपूर्ण रक्त, तसेच विविध रक्तघटक म्हणजेच लालपेशी, प्लाझ्मा, प्लेटलेटस् यांची उपलब्धता
■ अफेरेसिस तंत्रज्ञान (सिंगल डोनर प्लेटलेटस्) उपलब्ध.
NABH
१४ वा वर्धापन दिन १५ ऑगस्ट २०२६
स्वातंत्र्य दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
रक्तदान हे आरोग्याचं वरदान आहे. निरपेक्ष भावनेने केलेले रक्तदान हे सात्त्विक दान होय. रक्तदान करून आपण रक्तदान चळवळीत व रुग्णसेवेत अनमोल योगदान देत आहात. त्याबद्दल
रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार!
असंख्य रुग्णांच्या पाठबळावर १४वा वर्धापनदिन..
जागतिक दर्जाच्या उपकरणांसह जिल्ह्यातील एकमेवाद्वितीय अशी कॉर्पोरेट लॅबोरेटरी
स्कायलॅब सुपरस्पेशालिटी
■ जगभरातील अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज
■ प्रशिक्षित व अनुभवी तंत्रज्ञ ■ अहर्निश तत्पर सेवा
■ सर्व रिपोर्टस् हे एम.डी. पॅथॉलॉजिस्ट तज्ज्ञ डॉक्टरांच्या प्रत्यक्ष निगराणीखाली तयार केले जातात
■ विविध प्रकारचे हार्मोन्स, ट्युमर, मार्कर्स, थायरॉईडच्या तपासण्या
■ टीबीच्या निदानासाठी अत्यंत प्रगत व अत्याधुनिक अशी पीसीआर चाचणी उपलब्ध ■ यंत्रमानवी हातांनी युक्त अशी रोबोटिक टेक्नॉलॉजी.
पहिला मजला, साई पॅलेस, आकाशवाणी केंद्रासमोर, प्रोफेसर कॉलनी चौकाजवळ, अहमदनगर. फोन नं. ०२४१- २४२१३३४/२४२१३३५

चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹50000/- सोने खरेदीवर
₹20000/- चांदी खरेदीवर
₹5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच
मजुरीही सर्वात कमी.
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु






पत्रकार चौकामध्ये १४ ऑगस्ट रोजी दुपारी वाहतूक कोंडी झाल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. (छाया – धनेश कटारिया)

# नगरच्या पत्रकार चौकात वाहतुकीचा बोजवारा; अर्धवट सिमेंट काँक्रिटीकरणामुळे होतेयं कोंडी

नगर – शहरातील वर्दळीच्या पत्रकार चौकात वाहतूक कोंडीची समस्या आता नित्याचीच बनली असून, या चौकातील अर्धवट सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामामुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, याच चौकात वाहतूक पोलिसांची चौकी असतानाही पोलिसांच्या डोळ्यांसमोर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पत्रकार चौकात तीन प्रमुख रस्ते एकत्र येतात. मनमाड मार्गावरुन आलेली वाहने डीएसपी चौक किंवा अप्पू हत्ती चौकाकडे जातात. डीएसपी चौकाकडून आलेली वाहने मनमाड मार्गाकडे किंवा पत्रकार चौकातून यू-टर्न घेऊन अप्पू हत्ती चौकाकडे मार्गस्थ होतात. अप्पू हत्ती चौकाकडून आलेली काही वाहने डीएसपी चौकाकडे जाण्यासाठी यू-टर्न घेतात, तर काही सरळ मनमाड रोडला लागतात. अशा या महत्त्वाच्या त्रिभाजित चौकात सध्या सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम अर्धवट अवस्थेत पडले आहे. यामुळे एकाच वेळी तीन बाजूंनी येणारी वाहने इकडे-तिकडे वळताना त्यांचा वेग एकदम मंदावतो. त्यातच चालू असलेल्या कामामुळे रस्ता अतिशय अरुंद झाला असून, परिणामी रोजच या ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे.

या गंभीर समस्येवर प्रशासनाने तातडीने लक्ष घालून मार्ग काढावा, अशी जोरदार मागणी संतप्त नागरिक व वाहनचालकांकडून केली जात आहे.

# स्वतंत्र भारतामध्ये पहिल्यांदाच होणार जातनिहाय जनगणना

नवी दिल्ली – केंद्र सरकारने १४ ऑगस्ट रोजी जनगणनेच्या दरम्यान नागरिकांना विचारल्या जाणाऱ्या ४० प्रश्नांची यादी प्रसिद्ध केली आहे. या प्रश्नांमध्ये जात, कोविड लसीकरण स्थान यांचा समावेश असेल. स्वतंत्र भारतात पहिल्यांदाच एससी, एसटी सोबत अन्य जातींचीही गणना होणार आहे.

भारतात पहिल्यांदा जातनिहाय जनगणना ब्रिटिशांची सत्ता असताना १९३१ मध्ये झाली होती. जातनिहाय आधारित आकडे गोळा करण्याचे प्रयत्न १८७१-७२ मध्ये सुरू झाले होते. त्यावेळी पहिल्यांदा जनगणना झाली होती. पण १९३१ च्या जनगणनेत जातनिहाय आकडेवारी होती. त्यानंतर देशात कधीही अशी जनगणना झालेली नाही. हिमवर्षाव होणाऱ्या देशाच्या भागांमध्ये १ सप्टेंबरपासून जनगणना सुरू होईल. जनगणनेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. जनगणना आयुक्त मृत्यूंजय कुमार यांनी याबद्दलचा आदेश जारी केलेला आहे. जनगणनेदरम्यान ४० प्रश्न विचारले जातील. एससी, एसटी आणि अन्य जातीबद्दलचे प्रश्न यात असतील. कोविड-१९ ची लस कुठे घेतली, हा प्रश्नदेखील विचारला जाईल.

रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्तांकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, तुम्ही अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीशी संबंधित आहात की नाही, तुमची जात नाही, असे प्रश्न लोकांना विचारले जातील. लडाख, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील बर्फाळ प्रदेशात १ ते ३० सप्टेंबर या कालावधीत जनगणना होईल. त्याआधी १७ ते ३१ ऑगस्ट दरम्यान लोक स्वत: त्यांची माहिती ऑनलाईन पद्धतीनं नोंदवू शकतात.

देशातील बाकीच्या भागांमध्ये फेब्रुवारी २०२७ मध्ये जनगणना होईल. जनगणना दोन टप्प्यांमध्ये करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात घरं आणि निवासांशी संबंधित माहिती गोळा केली जाईल. दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक व्यक्तीची सामाजिक-आर्थिक माहिती नोंदवली जाईल.

२०२७ मध्ये होणारी जनगणना देशातील १६वी आणि स्वतंत्र भारतातील आठवी जनगणना असेल. ही पहिली डिजिटल जनगणना असेल. यामध्ये मोबाईलच्या माध्यमातून आकडे गोळा केले जातील. स्वत: माहिती नोंदवण्याची सोय असलेली ही पहिलीच जनगणना ठरेल. २०२१ मध्ये कोविड-१९ मुळे जनगणना होऊ शकली नाही. त्याआधी २०११ मध्ये देशात जनगणना झाली आहे.

# २७ जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज

मुंबई – १३ ते २० ऑगस्ट या कालावधीत कोकणात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज आहे. त्यानंतर २० ते २७ ऑगस्ट या कालावधीतही कोकण किनारपट्टीवर सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात मुंबई आणि उपनगरांत पावसाच्या आणखी काही जोरदार सरी पाहायला मिळू शकतात. तसेच सांताक्रूझ येथील सप्टेंबरअखेरची सरासरी पूर्ण करण्यासाठीही या पावसाचा फायदा होण्याची शक्यता आहे. पुढील पाच दिवस मुंबईसह संपूर्ण कोकण, विदर्भ, खान्देश तसेच नाशिक पुणे सातारा सांगली कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर अशा २७ जिल्ह्यात मध्यम ते मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. तर अहिल्यानगर व सोलापूर अशा ९ जिल्ह्यात किरकोळ पाऊस होईल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.


तीन दिवस फायद्याचे, भरघोस बचतीचे..
22 कॅरेट सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर मिळवा
25%* पर्यंत सूट
ऑफर 15 16 17 ऑगस्ट 2026
योजनेचा सर्व सुवर्णग्राहकांनी अवश्य लाभ घ्यावा .
डबल शाईन योजना
दर वाढले तरी फायदा तुमचाच !
सोन्याचे दर आजच निश्चित करा
10 महिने हप्ते भरा व 11 व्या महिन्यात सुवर्णखरेदी करतांना मजुरीवर मिळवा 50%* सूट
सुवर्णसंचय योजना
12=13
12 महिने हप्ते भरा व 13वा हप्ता आमच्याकडुन मिळवा व खरेदी करा शुध्द सोने (वेढणी / क्वाईन) किंवा नाविण्यपुर्ण अलंकार.
Conditions Apply*
शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका -ज्वेलर्स-
वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512 | बेलापुर रोड, श्रीरामपुर 02422-221512 | धामणगांव रोड, कडा 02441-239538
आमच्याकडे खरेदी केलेल्या सोने-चांदीच्या दागिन्यांची मोडतेवेळी घट धरली जात नाही.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीच्या बी.फार्म. विभागाच्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम

नगर - शैक्षणिक गुणवत्तेचा नवा मानदंड प्रस्थापित करत अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी बी. फार्म. विभागाने या वर्षीही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या अंतिम वर्ष परीक्षांमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत संस्थेचा नावलौकिक अधिकच उंचावला आहे.

प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी ही माहिती देतांना विध्यार्थीच्या परिश्रमांचे तसेच प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले. प्रथम क्रमांक वैभवी म्हस्के, आश्विनी नगरे, नुसरतफातेमा शेख, तुलिका कराळे (८.७३ एसजीपीए) नाविन्या मुनोत, अक्षता वाघ, माधुरी कुटे, शुभांगी कोलते ह्या विद्यार्थिनी (८.५५ एसजीपीए) द्वितीय क्रमांक व प्राजक्ता लवांड (८.४४ एसजीपीए) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे कॉलेजचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना, उपप्राचार्या वर्षाराणी आव्हाड, प्रा. जितेश बत्रा, पीयुष जंगम, सुधीर गर्जे, तृप्ती शिंदे, कांचन गलगते, स्नेहा कणसे, मिलिंद क्षीरसागर, नीता येणारे, योगेश पंडित, अर्पणा पंडित, अमोल बर्डे, अनिल गावडे, पल्लवी गुगळे, धनश्री गटने, स्वाती भुजबळ, अमृता कुलथे, वैशाली शिंदे, सोनी मिश्रा, बाळासाहेब भागवत, शारदा भागवत यांनी अभिनंदन केले.

# शहरात अरुंद रस्ता, उघडा खड्डा ठरतोयं जीवघेणा; चालकांसह विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

नगर - सावेडीतील कोहिनूर मंगल कार्यालयाजवळील रस्त्याच्या एका कोपऱ्यावर मोठे गटार आहे. विशेष म्हणजे गटार उघडे आहे. तसेच येथे रस्ताही अत्यंत अरुंद आहे. या ठिकाणी वळण घेताना अनेकदा वाहने या खड्ड्यात पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावरुन अनेक स्कूल बस धावतात. येथील रस्ता अरुंद असल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते. वाहनांचे डाव्या बाजूचे चाक वारंवार या खड्ड्यात भिती निर्माण झाली आहे. या ठिकाणी नुकतीच एक कार उलटल्याची घटना घडल्याने या धोक्याची तीव्रता समोर आली आहे. त्यामुळे हा अरुंद रस्ता आणि मोठा खड्डा जीवघेणा ठरत आहे.



कोहिनूर मंगल कार्यालयाजवळ रस्त्याकडेला असलेला मोठा उघडा खड्डा व त्यात पडताना वाचलेली एक कार.

या परिसरात शाळा, महाविद्यालये असल्यामुळे या रस्त्यावरुन नियमितपणे स्कूल बसची ये-जा सुरु असते. मोठ्या आकाराच्या स्कूल बसला या अरुंद वळणावरून मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागते. अशावेळी बसचे चाक या खड्ड्यात गेल्यास बसचा तोल जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे स्कूल बसच्या दरवाजाजवळ उभे असलेले विद्यार्थी अचानक बसचा तोल गेल्यास धोकादायक पद्धतीने बाहेर फेकले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेणे अत्यावश्यक आहे.

या धोकादायक ठिकाणाबाबत संबंधित ठेकेदाराला अनेक वेळा सांगूनही अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. केवळ अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी तातडीने या ठिकाणी संरक्षक कठडे बांधावे तसेच रस्त्याची आवश्यक दुरुस्ती करून हा भाग सुरक्षित करावा, अशी मागणी होत आहे.

हा कोपरा, मोठे गटार आणि त्यामुळं अरुंद झालेला रस्ता यामुळे वाहनचालकांना वळण घेताना मोठी कसरत करावी लागते. रस्ता अरुंद असल्याने डाव्या बाजूचे चाक कायम या खड्ड्याच्या दिशेने जाण्याचा धोका असतो. या रस्त्यावरून स्कूल बसेस जातात. बसचा तोल गेला तर दरवाजाजवळ उभे असलेली मुले बाहेर फेकली जाऊ शकतात. एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने या समस्येवर उपाय करावा, अशी मागणी नागरिक मनसुख वाबळे यांनी केली.

नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन संबंधित विभागाने घटनास्थळी पाहणी करावी आणि विद्यार्थ्यांसह सर्व वाहनचालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

# वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कोतवाली पोलिसांची शहरात रात्रगस्त

नगर - शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि नागरिकांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण करण्यासाठी कोतवाली पोलिसांनी कंबर कसली आहे. चोऱ्या, हाणामारी, रस्त्यावरील अतिक्रमण आणि नागरिकांना दमदाटी करणाऱ्या मुजोर प्रवृत्तींवर वचक बसवण्यासाठी कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी गुरुवारी सायंकाळी आपल्या सहकाऱ्यांसह शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये पायी गस्त (पेट्रोलिंग) घातली.



वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शहरात गस्त घालताना कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख व त्यांचे पथक. (छाया - धनेश कटारिया)

या विशेष मोहिमेदरम्यान गंज बाजार, सराफ बाजार, फुटाणे गल्ली, तेली खुंट, शहाजी रोड, नवी पेठ आणि माणिक चौक या भागांची बारकाईने पाहणी करण्यात आली. यावेळी रस्त्यावर अडथळा निर्माण करणारी वाहने, बेशिस्तपद्धतीने पार्किंग केलेली वाहने, तसेच हातगाड्या व अन्य साहित्य ठेवून केलेले अतिक्रमण पोलिसांनी काढून घेण्यास भाग पाडले. तसेच कोणीही बाजारात रस्त्यावर अडथळा होईल, महिलांना व नागरिकांना वाहन लावण्यास जागा मिळणार नाही असे बेकायदेशीर कृत्य करू नये. बाजारपेठेमध्ये कोणीही दहशत करत असेल तर त्यांच्यावर थेट कारवाई केली जाईल. अनधिकृत अतिक्रमणांवर थेट गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला. शहाजी रोड चौकामध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यास अडथळा निर्माण करणारे फलक तातडीने काढण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. पेट्रोलिंग दरम्यान पोलीस निरीक्षक देशमुखांनी नागरिकांशी संवाद साधला. बाजारात किंवा रस्त्यावर कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करू नका, महिला व नागरिकांना अडचण होईल अशा प्रकारे वाहने लावून बेकायदेशीर कृत्य करू नका, अशी तंबी त्यांनी संबंधितांना दिली.

बाजारपेठेत किंवा परिसरात कोणीही दहशत माजवण्याचा किंवा असभ्य वर्तन करण्याचा प्रयत्न करत असल्यास नागरिकांनी न घाबरता तत्काळ पोलिसांकडे तक्रार करावी. अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करून तात्काळ निवारण केले जाईल, असे आवाहन पोलीस निरीक्षक देशमुख यांनी केले आहे.

# नगर-मनमाड महामार्गाला नितीन गडकरी अनागोंदी नॅशनल हायवे प्रतीकात्मक नामकरणाचा इशारा

### २८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार आंदोलन

नगर - अहिल्यानगर-शिर्डी-मनमाड राष्ट्रीय महामार्गाच्या गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या रखडपट्टीचा, अपूर्ण कामांचा, वारंवार होणाऱ्या दुरुस्तीचा तसेच कंत्राटदार बदलण्याच्या प्रकारांचा निषेध करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने २८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनआंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनादरम्यान महामार्गाचे प्रतीकात्मक नामकरण नितीन गडकरी अनागोंदी नॅशनल हायवे असे करण्यात येणार असल्याची घोषणा संघटनांनी केली आहे.

अहिल्यानगर, शिर्डी आणि मनमाड या महत्त्वाच्या शहरांना जोडणारा हा महामार्ग उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा तसेच शिर्डीच्या धार्मिक, पर्यटन आणि आर्थिक क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, अनेक वर्षांपासून महामार्गाच्या कामात होत असलेला विलंब, अपूर्ण राहिलेली कामे, वारंवार कराव्या लागणाऱ्या दुरुस्त्या आणि बदलले जाणारे कंत्राटदार यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.



पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी आंदोलनाची माहिती देताना महामार्गाच्या कामकाजाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले. राष्ट्रीय महामार्गाची कामे वर्षानुवर्षे अपूर्ण राहणे, काही कंत्राटदारांकडून कामे अर्धवट सोडली जाणे, त्यानंतर पुन्हा निविदा काढणे, मुदतवाढ देणे आणि तरीही नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार रस्ता उपलब्ध न होणे हा केवळ तांत्रिक त्रुटींचा विषय म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही, असे त्यांनी म्हटले.

महामार्गाच्या कामांमध्ये आर्थिक हितसंबंध, कथित टक्केवारी, संगनमत किंवा भ्रष्टाचाराचा कोणताही प्रकार झाला आहे का, याची स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनांनी केली आहे. भ्रष्टाचारासंबंधी अंतिम निष्कर्ष सक्षम चौकशीअंतीच काढता येऊ शकतो; त्यामुळे केवळ आरोप-प्रत्यारोप करण्याऐवजी मागील सर्व व्यवहारांची वस्तुनिष्ठ तपासणी होणे आवश्यक असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाचे दीर्घकाळ नेतृत्व करणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या महामार्गाच्या कामाचा संपूर्ण हिशेब जनतेसमोर मांडावा, अशी मागणी आंदोलनातून करण्यात येणार आहे. संबंधित अधिकारी व यंत्रणांची जबाबदारी निश्चित करावी तसेच कामात अपयशी ठरलेल्या किंवा काम सोडून गेलेल्या कंत्राटदारांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली, याची माहितीही सार्वजनिक करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

२८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होणाऱ्या आंदोलनातून संबंधित यंत्रणांना प्रामुख्याने तीन प्रश्न विचारण्यात येणार आहेत - हा महामार्ग नेमका पूर्ण कधी होणार? आतापर्यंत या कामावर किती पैसा खर्च झाला? आणि या प्रदीर्घ विलंबाला नेमके जबाबदार कोण? या प्रश्नांची स्पष्ट, लेखी आणि पुराव्यानिशी उत्तरे शासन, राष्ट्रीय महामार्ग प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी जनतेसमोर द्यावीत, अशी मागणी आंदोलनातून करण्यात येणार आहे. या आंदोलनासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले, अमित थोरात आदी प्रयत्नशील आहेत.

# धीरज परदेशी हत्येचा निषेधच; पण त्या आडून धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या तथाकथित नेत्यांवर कडक कारवाई करा

### वंचित बहुजन आघाडीची पोलीस प्रशासनाकडे मागणी

नगर- अहिल्यानगर शहरातील धीरज परदेशी यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली असून, या घटनेचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जाहीर निषेध नोंदवण्यात आला आहे. गुन्हेगारांना कोणतीही जात किंवा धर्म नसतो; परंतु या घटनेच्या माध्यमातून काही तथाकथित हिंदुत्ववादी नेते आणि संघटना जाणूनबुजून समाजात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा व्यक्तींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने पोलीस प्रशासनाकडे केली आहे.



अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे यांना निवेदन देताना वंचित बहुजन आघाडीचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष योगेश साठे, सुहास धीवर, अमर निरभवने, संकेत शिंदे आदी.

याबाबत वंचित बहुजन आघाडीचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी सुहास धीवर, अमर निरभवने, संकेत शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते. या निवेदनात म्हटले आहे की, मयत धीरज परदेशी यांच्या समर्थनार्थ आयोजित आंदोलनाच्या व्यासपीठावरून आमदार अक्षय कर्डिले, आमदार संग्राम जगताप, आमदार गोपीचंद पडळकर, ह. भ. प. संग्राम भंडारे व इतर वक्त्यांनी उघडपणे अत्यंत चिथावणीखोर व समाजविघातक विधाने केली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या कलम ३२६ अन्वये दिलेल्या 'एक नागरिक, एक मत, एक मूल्य' या समान अधिकाराची व लोकशाही मूल्यांची सार्वजनिक व्यासपीठावरून तुच्छ शब्दांत टर्र उडवून संविधानाचा अवमान करण्यात आला आहे.

सोशल मीडियावर साध्या कमेंट किंवा पोस्ट करणाऱ्या सामान्य नागरिकांवर तात्काळ गुन्हे दाखल करणारे पोलीस प्रशासन, सत्ताधारी लोकप्रतिनिधींवर कारवाई करताना मात्र पक्षपाती भूमिका घेत आहे. संविधानाच्या कलम १४ नुसार सर्वांसाठी एकच कायदा असताना सत्ताधाऱ्यांना मोकळे रान देणारा प्रशासनाचा हा कारभार वंचित बहुजन आघाडी कदापि खपवून घेणार नाही. संविधानाचा अवमान करणाऱ्या व धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या या सर्व वक्त्यांवर तात्काळ एफआयआर दाखल करून त्यांना अटक करावी. जर पोलीस प्रशासनाने सत्ताधाऱ्यांच्या दबावाला बळी पडून कारवाईस टाळाटाळ केली, तर संपूर्ण जिल्ह्यात तीव्र एल्गार पुकारून न्यायालयात दाद मागण्यात येईल, असा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.

# अहिल्यानगर शहरात पार्क सेंट्रल हॉटेल सुरु

### ग्राहकांचा मिळतोयं उत्स्फूर्त प्रतिसाद

नगर - शहराच्या मध्यवर्ती भागात आधुनिक लक्झरी आणि उत्कृष्ट आतिथ्याचा संगम घडवणारे पार्क सेंट्रल हॉटेल सुरू झाले असून, हा ३-स्टार प्रकल्प होमी ग्रुप प्रा. लि.चे डायरेक्टर अनुज मित्तल आणि स्वप्निल होले यांनी साकारला आहे.

मध्यवर्ती ठिकाणी असलेले हे पार्क सेंट्रल लक्झरी हॉटेल दर्जेदार निवास, उत्कृष्ट भोजन आणि आकर्षक रूफटॉप अनुभव देते. व्यवसाय, कुटुंब किंवा वीकेंड मुक्कामासाठी येथे आरामदायी व संस्मरणीय सुविधा उपलब्ध आहेत. स्कायलाइन व्ह्यू रूम्स, आधुनिक इंटिरियर्स आणि प्रीमियम सेवा यामुळे येथे लक्झरी मुक्कामाचा अनुभव मिळतो. लक्झरी व उत्कृष्ट सेवेचा संगम साधत हे हॉटेल नवा मानदंड निर्माण करत आहे. लक्झरी आणि उत्तम सेवा यांचा संगम अशी ओळख निर्माण करणारे हे हॉटेल अहिल्यानगरच्या पर्यटन व व्यवसाय क्षेत्राला नवी चालना देत आहे.


## संपतलाल सुराणा यांचे अल्प आजाराने निधन

नगर - सावेडी येथील रहिवासी संपतलाल चंपालाल सुराणा (वय ७१) यांचे १३ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, भाऊ, भावजय, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुरेखा सुराणा यांचे पती, सचिन, राहुल, नितीन यांचे वडील तर ईश्वर सुराणा यांचे ते बंधू होत.

## सुनील गोंधळे यांचे दु:खद निधन



नगर - नंवदनवन हॉटेल शेजारील रहिवासी सुनील पांडुरंग गोंधळे (वय ६०) यांचे १४ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर लालटाकी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अक्षय व अभिजित गोंधळे यांचे ते वडील होत.

## कांतीलाल चोरडिया यांचे दु:खद निधन

नगर - गंजबाजार येथील रहिवासी कांतीलाल हस्तीमल चोरडिया (वय ९१) यांचे १३ ऑगस्ट रोजी जामखेड येथे दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १४ ऑगस्ट रोजी जामखेड अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ बहिण, १ मुलगा, सुन, मेहुणे, नातवंडे असा परिवार आहे. संतोष चोरडिया यांचे ते वडील होत.

# धीरज परदेशी खून प्रकरणी नगरच्या पोलीस प्रशासनाची भूमिका संशयास्पद

### आ.संग्राम जगताप यांची मुंबईत पत्रकार परिषद; पोलीस अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याची मागणी

नगर - धीरज परदेशी खून प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असून त्यांनी अद्याप मुख्य आरोपी कोण आहेत हे निष्पन्न केले नसून त्यांना अटकही केलेली नाहीये. जे आरोपी अटक केले ते मारेकरींना मदत करणारे आरोपी पकडले आहेत. पोलीस अधिकारी प्रमुख आरोपींना पाठीशी घालत आहे का? असा आरोप करीत हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करणाऱ्या अधिकाऱ्यांना तातडीने बडतर्फ करण्याची मागणी आ. संग्राम जगताप यांनी केली.



मुंबईत आयोजित पत्रकार बोलताना आमदार संग्राम जगताप. समवेत स्व. धीरज परदेशी यांच्या पत्नी पल्लवी परदेशी.

धीरज परदेशी खून प्रकरणी आमदार संग्राम जगताप यांनी १४ ऑगस्ट रोजी मुंबई येथे पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली. ते म्हणाले, धीरज परदेशी खून प्रकरणाची खरी घटना व त्यामागील आमच्या भावना राज्य सरकारपर्यंत पोहोचाव्यात व पीडित कुटुंबीयांना त्वरित न्याय मिळावा यासाठी मुंबईत पत्रकार परिषद घेत आहे. याप्रकरणी नगरच्या पोलीस प्रशासनाची भूमिका संशयास्पद आहे. घटना घडल्यानंतर हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांचा आवाज पोलीस दाबत असून त्यांच्यावर अनेक खोटे गुन्हे दाखल करत या प्रकरणाला वेगळे वळण देण्याचा पोलीस अधिकाऱ्यांचा विचार आहे. पोलीस अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असून त्यांनी अद्याप मुख्य आरोपी कोण आहेत हे निष्पन्न केले नसून त्यांना अटकही केलेली नाहीये. जे आरोपी अटक केले ते मारेकरींना मदत करणारे आरोपी पकडले आहेत. पोलीस अधिकारी प्रमुख आरोपींना पाठीशी घालत आहे का? अशी शंका व्यक्त होत आहे. नगरचे पोलीस अधिकारी ही घटना वेगळ्या मार्गावर नेण्याच्या प्रयत्नात आहेत. याला वाचा फुटावी, न्याय मिळाला पाहिजे, यासाठी लवकरच राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार आहोत. आरोपीचे अनधिकृत घरे पाडण्याच्या आदेशाला आरोपींनी लावलेली स्थगिती ताबडतोब उठवावी व घर पाडण्याची कारवाई त्वरित करावी, धीरजच्या मारेकरींना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा होण्यासाठी चांगल्या सरकारी वकीलाची नियुक्ती करावी, धीरजच्या पत्नीच्या मागे आम्ही हिंदुत्ववादी सर्वजण खंबीरपणे उभे आहोतच. पण त्यांना शासनानेही सन्मानजनक नोकरी देणे आवश्यक आहे, अशा मागण्या मुख्यमंत्र्यांना करणार आहोत. हिंदुत्ववाद्यांवर या खोट्या केसेस दाखल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना तातडीने बडतर्फ करण्यात यावे, पीडित परदेशी कुटुंबाला त्वरित न्याय मिळावा, अशी मागणी आ. जगताप यांनी केली.

आ. जगताप पुढे म्हणाले, नगर जिल्ह्याचे अतिरिक्त पोलीस अधिकारी वैभव कलूबर्गे, डीवायएसपी दिलीप टिपरसे यांनी गेल्या दोन दिवसापासून नगर शहरातील हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना टार्गेट करून वेगवेगळ्या केसमध्ये अडकवत आहेत. त्यामुळे या प्रकरणाला हे वरिष्ठ पोलीस अधिकारी वैयक्तिक वेगळा रंग देण्याच्या भूमिकेत आहेत हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून देणार आहे. या घटनेच्या बाबतीत आमचा आता पोलिसांवर विश्वास राहिलेला नाहीये त्यामुळे आयजी व डीआयजी यांनी वाटल्यास वेगळ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती या प्रकरणी केली तरच योग्य पद्धतीने तपास योग्य दिशेने तपास जाईल.

पोलिसांच्या म्हणण्याप्रमाणे जर मूळ एफआयआरमध्ये वेगळी नोंद झाली तर ते न्यायालयात सिद्ध करण्यास अधिक वेळ लागेल. त्यामुळे याप्रकरणी जे सत्य घडले आहे, जे परदेशी कुटुंबियांचे म्हणणे आहे, त्यानुसारच एफआयआर व्हावी व त्या पद्धतीने तपास व्हावा. तसेच धीरजच्या खुनाच्या घटनेआधी नेमके काय काय घडले, घटना कशी घडली, कोणी घडवली, याचा तपास पोलिसांनी अद्याप केलेला नाहीये. मुख्य आरोपींचाही शोध अद्याप लागलेला नाहीये. हिंदू म्हणूनच धीरजला मारले या दाव्यावर आम्ही ठाम आहोत. मुकुंदनगरमध्ये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना याआधीही मारहाण करण्याच्या अनेक घटना घडलेली आहेत. मात्र एखाद्याचा खून करण्यापर्यंत आता त्यांची मजल जात आहे.

### पोलीस अधीकारी खोट्या पद्धतीने प्रकरण हाताळतात - पल्लवी परदेशी

स्व.धीरज परदेशी यांची पत्नी पल्लवी परदेशी म्हणाल्या, माझ्या पतीच्या निधनानंतर सोशल मीडिया माध्यमातून मोठ्या प्रमाणात खोटे आरोप केले जात आहेत. माझ्या पतीची याप्रकरणी काहीही चूक नाहीये. ते मूळचेच धार्मिक व हिंदू विचाराचे होते. ते रोजच अभिमानाने भगवा टिळा लावत असे. घटना घडली त्यादिवशी दुपारी एक वाजता माझे व पतीचे फोनद्वारे शेवटचे संभाषण झाले. त्यांचा व आरोपींचा काही एक संबंध नाहीये तसेच त्यांचे कोणाशीही भांडण नव्हते. तरीही पोलीस अधिकारी काही खोट्या व चुकीच्या पद्धतीने हे प्रकरण हाताळत आहेत. पोलीस अधिकाऱ्यांनी आम्हाला त्वरित न्याय द्यावा व आरोपींना कडक शासन करावे, अशी मागणी त्यांनी केली.

# रामवाडीच्या लक्ष्मीआई यात्रेत पारंपारिक पोतराजांच्या नृत्याने वेधले लक्ष


रामवाडीत लक्ष्मीआई यात्रेत पारंपारिक नृत्य करताना पोतराज.

नगर – शहरातील रामवाडी परिसरात लक्ष्मीआई यात्रा उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. रामवाडी यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या यात्रेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक वाद्यांच्या गजरात निघालेल्या भव्य शोभायात्रेत महिला, युवक, पोतराज तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण रामवाडी परिसर लक्ष्मीमातेच्या जयघोषाने दुमदुमून गेला.

या यात्रेला तब्बल ५० वर्षांची परंपरा असून, दरवर्षी रामवाडी येथे लक्ष्मीआई यात्रा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदाच्या यात्रेतही पारंपरिक धार्मिक परंपरा जपत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेच्या निमित्ताने परिसरात सकाळपासूनच भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. युवकांनी प्रवरा संगम येथून कावडीद्वारे आणलेल्या पवित्र जलाने रामवाडी येथील लक्ष्मीमातेच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला. विधिवत पूजा–अर्चा करून लक्ष्मीमातेच्या उत्सवमूर्तीची शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने देवीचे दर्शन घेतले.

शोभायात्रेत संबळ, हलगी, ढोल आणि ताशांच्या निनादाने संपूर्ण परिसर दणाणून गेला. पारंपरिक वेशभूषेतील पोतराजांनी देवीप्रती श्रद्धा व्यक्त करत पारंपरिक पद्धतीने आसूडचे फटके ओढले. आसूड ओढताना होणारा 'चट्ट... चट्ट...' आवाज परिसरात घुमत होता. या पारंपरिक सादरीकरणामुळे यात्रेचे विशेष आकर्षण वाढले.

यात्रेनिमित्त माजी नगरसेवक भाऊसाहेब उडाणशिवे हे वर्षातून एकदा पोतराजाचा साज चढवून लक्ष्मीमातेला अभिवादन करतात आणि यात्रेत सहभागी होतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बबन लोखंडे, लखन लोखंडे, गणेश गायकवाड, लक्ष्मण नवगिरे, रोहित शेलार, ऋतिक शेरकर, गोपाल शिंदे, कैलास शिंदे आदी पोतराजांनी शोभायात्रेत सहभाग घेतला. यावेळी वाजंत्री म्हणून राहुल वैरागर, विशाल वैरागर, यादव खुडे, सागर खुडे, संजय चांदणे आदी सहभागी झाले होते. पारंपरिक वाद्यांच्या तालावर भाविकांनी सहभाग नोंदविला.

शोभायात्रेत परिसरातील महिला पारंपरिक वेशभूषेत डोक्यावर कलश घेऊन सहभागी झाल्या होत्या. कपाळी गंध लावलेल्या कलशधारी महिलांची शिस्तबद्ध उपस्थिती लक्षवेधी ठरली. तसेच घोड्यांच्या बग्गीत विराजमान असलेल्या लक्ष्मीमातेच्या उत्सवमूर्तीने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. शोभायात्रेदरम्यान भाविकांकडून भंडाऱ्याची उधळण करण्यात आली. 'लक्ष्मीमातेचा विजय असो', 'लक्ष्मीआईचा जयजयकार' अशा जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. युवकांसह महिला व ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने यात्रेत सहभाग घेतला.

रामवाडी परिसरातून सुरू झालेली ही शोभायात्रा कोठला, मंगलगेट, सर्जेपूरा आणि रंगभवन मार्गे मार्गक्रमण करत पुन्हा रामवाडी येथे पोहोचली. तेथे शोभायात्रेचा भक्तिमय वातावरणात समारोप करण्यात आला. पाच दशकांपासून सुरू असलेली ही धार्मिक परंपरा आजही त्याच उत्साहाने जपली जात असल्याने रामवाडीतील लक्ष्मीआई यात्रा हा शहरातील एक महत्त्वाचा पारंपरिक धार्मिक उत्सव ठरत आहे. युवकांचा उत्स्फूर्त सहभाग, महिलांची उपस्थिती आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरामुळे यंदाच्या यात्रेला विशेष रंगत आली.

# डॉ.राहुल शेलार यांना पी.एच.डी. पदवी प्रदान


अहिल्यानगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयाचे संशोधक विद्यार्थी डॉ. राहुल शेलार यांना पी.एच.डी. मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. माहेश्वारी गावित, प्रा. डॉ. उमेश मुंडे, प्रा. डॉ. अशोक डोळस, प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे आदि.

नगर – येथील 'ड्रम सेंटर' या स्टुडिओचे संचालक तथा 'पडघम' वाद्य संगीताचे ध्वनीमुद्रण आणि तांत्रिक शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. राहुल शेलार यांनी मराठी साहित्य संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करीत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्राप्त केली आहे.

विद्यापीठाकडून पदवी जाहीर झाल्याचे अधिकृत पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले आहे. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी पेमराज सारडा महाविद्यालय अहिल्यानगरच्या प्राचार्या डॉ. माहेश्वीरी गावित, बहिस्त परिक्षक प्रा. डॉ. उमेश मुंडे, मार्गदर्शक प्रा. डॉ. अशोक डोळस, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे आदि मान्यवर उपस्थित होते.

डॉ. राहुल शेलार यांनी अहिल्यानगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मराठी संशोधन केंद्रातून केंद्रप्रमुख प्राचार्य डॉ. माहेश्वीरी गावित आणि मार्गदर्शक प्रा. डॉ. अशोक डोळस यांच्या मार्गदर्शनाखाली 'द. मा. मिरासदार व शंकर पाटील यांच्या ग्रामीण व विनोदी कथात्म साहित्याचे स्वरूप आणि चिकित्सा' या विषयावर संशोधन प्रबंध सादर करीत, प्रमाण मराठी आणि ग्रामीण बोली अशा मिश्र भाषेचा भाषा शास्त्रीय व 'विनोद' या संकल्पनेच्या स्वरूपाचा चिकित्सक अभ्यास मांडलेला आहे.

या संशोधनामुळे मराठी कथात्म साहित्यातील भाषाशास्त्रीयदृष्ट्या, मराठी प्रमाण व ग्रामीण बोली या मिश्र भाषा वापरामागील प्रयोजनाच्या स्वरूपाची आणि कलात्मक अभिव्यक्तीतून निर्माण होणार्‍याव विनोदात्म धर्माचे चिंतन व मूल्यमापन होण्यास मदत झाली असून, संशोधन क्षेत्रात हा अभ्यास उपयुक्त संदर्भग्रंथ ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# दिवंगत लोककलावंत प्रताप रोकडे यांना दिग्गज कलावंताची गीतांतून आदरांजली

नगर – शहरातील सिद्धार्थनगर येथील जेष्ठ लोककलावंत आणि भविष्य निर्वाह निधी कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी प्रताप तबाजी रोकडे यांचे २ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पुण्यानुमोदन विधीच्या निमित्ताने राज्यातील दिग्गज कलावंतांच्या वंदन माणसाला या कार्यक्रमाद्वारे रोकडे यांना आदरांजली वाहण्यात आली.

अहिल्यानगर पोलीस मुख्यालयाच्या कल्याण केंद्र हॉलमध्ये संगीत बहार फाउंडेशन आयोजित, संगीत बहार गुरुकुल विहार आणि समस्त लोककलावंत आयोजित वंदन माणसाला या कार्यक्रमाद्वारे महाराष्ट्रातील ख्यातनाम गायिका कडुताई खरात, श्वेताताई सभादिंडे, कल्पनाताई सूर्यवंशी, गायक रुपचंद भुजबळ, चेतनकुमार चोपडे, विकास साळवे, ज्ञानेश्वर खरात, अमोल साळवे, संगीतकार/गायक मोहित गांगुर्डे, गीतकार देवीदास भद्रे, महाकवी वामनदादा कर्डक यांच्या लेखणीच्या गायनाचे व्यासपीठ मानले जाणारे दिव्यांग जेष्ठ गायक दादुकाका साळवे, अनिकेत गवळी (ढोलक/ढोलकी) वादक, अनिल घोगरे (तबला वादक), कुणाल वानखेडे (कीबोर्ड), सनी गणकवार (पॅड) यांनी आपल्या कलेतून सुरेल सुरेल आदरांजली वाहिली.

संगीत बहार फाउंडेशनच्या सुशील रोकडे, योगेश तिवारी आणि समस्त रोकडे परिवार, सगेसोयरे, नातेवाईक कलावंत मित्र परिवार मंडळी आणि गुरुकुलातील साधकांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. तसेच रवी जाधव यांनी साऊंड सिस्टम व सचिन साळवी यांनी छायाचित्रेकरिता परिश्रम घेतले.

प्रताप रोकडे हे संगीत बहार फाउंडेशन या संस्थेच्या कार्यकारीणी पदावरही होते तसेच बासरीवादक जितेंद्र रोकडे व गायिका करुणा रोकडे यांचे ते वडील होत.

# सरस्वती मंदिर नाईट स्कूलमध्ये गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप


नवविद्या प्रसारक मंडळाचे सरस्वती मंदिर नाईट स्कुलमध्ये गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप करताना संस्थेचे पदाधिकारी.

नगर – येथील नव विद्या प्रसारक मंडळाचे सरस्वती मंदिर नाईट स्कूलमध्ये शिकणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अधिक प्रेरणा मिळावी आणि त्यांचा शाळेत येण्याचा प्रवास सुखकर व्हावा, या उदात्त हेतूने भव्य 'सायकल वाटप' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम मासूम संस्थेच्या संस्थापिका सौ. निकिता केतकर यांच्या विशेष प्रयत्नातून शाळेच्या मुख्याध्यापकांच्या मार्फत गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य पार पडले.

या गरिमापूर्ण सोहळ्याला 'मासूम' संस्थेचे संचालक कमलाकर माने, एस. एस. सी डिपार्टमेंट प्रमुख गुरुप्रसाद पाटील, सिनिअर प्रोग्राम हेड संदीप शेलार, समन्वयक महेंद्र म्हसे हे उपस्थित होते. तसेच नव विद्या प्रसारक मंडळाचे शाळा समिती सदस्य मंगेश धर्माधिकारी यांनीही या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.

रात्रीच्या शाळेत शिकणारे अनेक विद्यार्थी हे दिवसा काम करून किंवा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत आपले शिक्षण पूर्ण करत असतात. अशा गरजू विद्यार्थ्यांना शाळेत ये–जा करण्यासाठी वाहतुकीची अडचण भासू नये आणि त्यांच्या शिक्षणाला गती मिळावी, यासाठी या सायकलींचे वाटप करण्यात आले. सायकल मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि शिक्षणाची नवी उमेद दिसून येत होती. उपस्थितांनी मासूम संस्थेच्या संस्थापिका सौ. निकिता केतकर यांच्या या सामाजिक बांधिलकीचे आणि सहकार्याचे विशेष कौतुक केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक पांडुरंग गवळी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या नियोजनात शिंदे विलास यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. लबडे देवका, श्रीमती कुऱ्हाडे वीणा आणि श्रीमती धारूरकर सुषमा यांनी सक्रीय सहभाग नोंदवला.

# १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या गटप्रवर्तकांचा शासन निर्णयात समावेश करण्याची आशा व गटप्रवर्तक संघटनेची मागणी

नगर – राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आरोग्यविषयक योजना आणि शासनाच्या विविध आरोग्यविषयक धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी गेल्या १७ ते १८ वर्षांपासून कार्यरत असलेल्या गटप्रवर्तकांना अद्यापही कायमस्वरूपी सेवा व सामाजिक सुरक्षेचा लाभ मिळालेला नाही. राज्य शासनाने ३० जून २०२६ रोजी घेतलेल्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानातील १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या १५ हजार १० कंत्राटी कर्मचाऱ्यांना अभिसंख्य पदे निर्माण करून नियमित सेवेत घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे आशा व गटप्रवर्तक संघटनेने स्वागत केले असून, याच धर्तीवर दीर्घकाळ सेवा देणाऱ्या गटप्रवर्तकांसाठी स्वतंत्र शासन निर्णय काढून त्यांचाही सेवेत समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

गटप्रवर्तकांच्या मागण्यांसाठी आशा व गटप्रवर्तक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अ‍ॅड. कॉ. सुधीर टोकेकर तसेच जिल्हा मार्गदर्शक गटप्रवर्तक सुवर्णा थोरात सातत्याने पाठपुरावा करत आहेत. या प्रश्नासंदर्भात सुवर्णा थोरात यांनी आरोग्यमंत्री आबिटकर यांची भेट घेऊन गटप्रवर्तकांच्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली आहे. गटप्रवर्तकांना ३० जून २०२६ च्या शासन निर्णयात समाविष्ट करण्यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जाणार असल्याचे अ‍ॅड. टोकेकर यांनी सांगितले. १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांना शासनाने सेवेत स्थैर्य देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्याच अभियानात दीर्घकाळ काम करणाऱ्या गटप्रवर्तकांचाही सहानुभूतीपूर्वक विचार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या अनेक वर्षांपासून गटप्रवर्तक ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेचा महत्त्वाचा दुवा म्हणून काम करत आहेत. मात्र, ३० जूनच्या शासन निर्णयात १० वर्षांपेक्षा अधिक सेवा असलेल्या गटप्रवर्तकांचा समावेश नसल्याने त्यांच्यात नाराजी निर्माण झाली आहे. शासनाने आरोग्य अभियानातील इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवेला स्थैर्य देण्याचा निर्णय घेतला असताना, समान स्वरूपाचे काम करणाऱ्या गटप्रवर्तकांना या प्रक्रियेपासून वगळू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे.

२००८–०९ पासून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्त्वावर गटप्रवर्तक म्हणून अनेक महिला व कर्मचारी कार्यरत आहेत. जवळपास दोन दशके शासनाच्या आरोग्यविषयक योजना आणि उपक्रमांची माहिती गावागावांत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले आहे. एका गटप्रवर्तकाकडे सरासरी १७ ते २५ गावांचा कार्यभार असतो. संबंधित गावांना नियमित भेटी देणे, आरोग्यविषयक कामकाजाचा आढावा घेणे, अहवाल तयार करणे, प्रशिक्षण देणे, विविध उपक्रमांची माहिती पोहोचविणे तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय साधणे, अशा विविध जबाबदाऱ्या त्या पार पाडतात.

ग्रामीण भागातील आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी करताना गटप्रवर्तकांची भूमिका महत्त्वाची आहे. शासनाच्या योजना आणि प्रत्यक्ष लाभार्थी यांच्यामधील दुवा म्हणून ते काम करतात. मात्र, एवढ्या प्रदीर्घ सेवेनंतरही त्यांच्या नोकरीला स्थैर्य नाही. पेन्शन, विमा किंवा अन्य सामाजिक सुरक्षेच्या सुविधा उपलब्ध नसल्याने भविष्यातील सुरक्षिततेचा प्रश्न कायम असल्याचे गटप्रवर्तकांचे म्हणणे आहे. सध्या गटप्रवर्तकांना १९ हजार ६२५ रुपये मानधन मिळते. मात्र, मोठ्या कार्यक्षेत्रात नियमित प्रवास करावा लागत असल्याने पेट्रोल, प्रवास आणि इतर कामाशी संबंधित खर्चाचा मोठा भार त्यांच्या मानधनातूनच करावा लागतो. त्यामुळे प्रत्यक्ष हातात उरणारी रक्कम तुलनेने कमी असल्याचे संघटनेने म्हटले आहे. एका गटप्रवर्तकाला अनेक गावांमध्ये जाऊन काम करावे लागत असताना त्यानुसार स्वतंत्र व पुरेसा प्रवास भत्ता मिळावा, तसेच जबाबदारी आणि कार्यक्षेत्राचा विचार करून सन्मानजनक निश्चित मानधन द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. गटप्रवर्तकांनी शासनाकडे तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. ३० जून २०२६ च्या शासन निर्णयात १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या गटप्रवर्तकांचाही समावेश करून त्यांना सेवेत स्थैर्य द्यावे, ही प्रमुख मागणी आहे. त्याचबरोबर कार्यक्षेत्र आणि जबाबदारी लक्षात घेऊन फिक्स मानधनासोबत स्वतंत्र प्रवास भत्ता द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, गटप्रवर्तकांच्या प्रश्नांना शासनाच्या स्तरावर प्रभावीपणे मांडता यावे यासाठी गटप्रवर्तक संघटनेशी अधिकृतपणे चर्चा करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.


रणरागिणी फाऊंडेशनच्या रोहिणी पवार यांचा पुण्यात राष्ट्रीय समाजरत्न पुरस्काराने गौरव करताना तृप्ती देसाई, राजेश खर्डे वेसावकर, विजय भालसिंग,कैलास पठारे आदी.

# रणरागिणी फाऊंडेशनच्या रोहिणी पवार यांचा पुण्यात 'राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कारा'ने गौरव

नगर – क्रांती दिनानिमित्त पुणे येथील वानवडी परिसरात आयोजित राज्यस्तरीय गुणगौरव सोहळ्यांत अहिल्यानगरच्या रणरागिणी मल्टीपर्पज फाऊंडेशनच्या अध्यक्षा रोहिणी पवार यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. मातोश्री द्रोपदा बबन पठारे चॅरिटेबल ट्रस्ट, छत्रपती शेतकरी सेना तसेच बहुजन भूमी संघटना संचलित मानव हक्क , माहिती अधिकार, दक्ष पोलिस मित्र सहकार सेना यांच्या संयुक्त विद्यमाने या राज्यस्तरीय गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

पुण्यातील महात्मा ज्योतिराव फुले सांस्कृतिक भवन, वानवडी येथे झालेल्या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई व मुंबईतील प्रसिद्ध कोळी नटसम्राट राजेश खर्डे वेसावकर आणि सामाजिक कार्यकर्ते तथा पक्षीमित्र विजय भालसिंग यांच्या हस्ते रोहिणी पवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष कैलास पठारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष रशीद पठाण, राष्ट्रीय महिला अध्यक्षा रोहिणी भोसले, अल्ताफ शेख, विशाल पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोहिणी पवार गेल्या अनेक वर्षापासून शैक्षणिक सामाजिक उद्योजकता, विकास महिला सक्षमीकरण महिला सबलीकरण ग्रामविकास बालविकास संस्थेचे कार्य करीत आहे. महिलांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना आत्मनिर्भर करण्याचे काम त्या करत आहे. महिलांना वेळोवेळी अडचणीत मदत करणे, गृहउद्योग निर्मिर्ती करून महिलांना रोजगार मिळवून देणे, त्यांचे बचत गट स्थापन करून त्यांना बचत गटाच्या माध्यमातून शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच गरजू शालेय विद्यार्थ्यांना मदत करण्याचे काम त्या सातत्याने करत आहे. त्यांच्या या विविध सामाजिक उपक्रमाची दखल घेत त्यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी २८ ऑगस्टला सत्याग्रह 'सक्ती बालकावर नाही, कर्तव्याची सक्ती शासनावर असावी

## अ‍ॅड. कारभारी गवळी यांची मागणी

नगर – देशातील प्रत्येक बालकाला जन्मापासून १८ वर्षांपर्यंत पौष्टिक आहार, आरोग्य, व्यायाम, गुणवत्तापूर्ण शिक्षण, ज्ञान, विवेक आणि जीवनोपयोगी कौशल्यांची समान संधी मिळावी, तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी शासनाने स्वीकारावी, या मागणीसाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने 'राष्ट्रीय बाल धारणालय हक्क सत्याग्रह' जाहीर करण्यात आला आहे.

या आंदोलनाची पहिली जनजागृती व प्रत्यक्ष कृती मोहीम २८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे होणार आहे. 'सक्ती बालकावर नाही, बालक घडविण्याच्या कर्तव्याची सक्ती शासनावर!' हा आंदोलनाचा मूलमंत्र आहे. बालकांचा विकास केवळ परीक्षा, गुण आणि घोकंपट्टीपुरता मर्यादित न ठेवता त्यांचे आरोग्य, ज्ञान, विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन, निर्णयक्षमता आणि जीवनोपयोगी कौशल्ये विकसित होणे आवश्यक आहे. या उद्देशाने संघटनांनी पाच सूत्रांचा कृतीशील आराखडा मांडला आहे.

यामध्ये जन्मापासून १८ वर्षांपर्यंतच्या बालकांच्या पोषण, आरोग्य, शिक्षण व कौशल्यविकासाची नोंद ठेवणारे एकात्मिक बाल आरोग्य व ज्ञान कार्ड, शाळांमध्ये विवेक व कौशल्य केंद्रे, 'शून्य कुपोषण–शून्य वंचितता'ची हमी, ग्रामपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर बाल विकास देखरेख यंत्रणा आणि १८व्या वर्षी सक्षम, विवेकी व संविधाननिष्ठ नागरिक घडविण्याचे धोरण यांचा समावेश आहे.

'एकही बालक कुपोषित नको, एकही बालक ज्ञानवंचित नको आणि एकही बालक कौशल्यवंचित नको', अशी भूमिका घेत या मागण्यांसाठी स्वाक्षरी मोहिमा, ग्रामसभा, जनजागृती, निवेदने आणि संविधानिक सत्याग्रह करण्यात येणार आहेत.

या सत्याग्रहात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अड. कारभारी गवळी यांनी केले आहे. आंदोलनासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, अ‍ॅड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, अ‍ॅड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम यांच्यासह अनेक कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

# भारतीय संस्कृतीतील सणांचा महिना 'श्रावण'

मराठी महिन्यांपैकी एक महत्वाचा महिना म्हणजे श्रावण मास. श्रावण महिन्यालाच सणांचा महिना असेही म्हणतात. या महिन्याची सर्व आतुरतेने वाट पाहत असतात कारण या महिन्यात आपल्या भारतीय संस्कृतीत साजरे केले जाणारे बरेच सण असतात. त्यामुळे या महिन्यात सर्वांना हौसमौज करायला मिळते.

हा महिना दरवर्षी पावसाळ्यातील जुलै ते ऑगस्ट दरम्यान असतो, म्हणून याला पावसाचा महिना असेही म्हणतात कारण यावेळी भरपूर पाऊस पडतो. हा महिना हिंदूंच्या श्रद्धेचे प्रतीक देखील मानला जातो कारण या महिन्यात हिंदू विशेषत: महादेवाची पूजा करतात. हा काळ शेतीच्या दृष्टीकोनातूनही खूप महत्त्वाचा आहे कारण यावेळी शेतकरी आपल्या पिकांची पेरणीही करतात.

पुराणानुसार या महिन्यात श्रावण नक्षत्र असलेली पौर्णिमा येते, त्यामुळे या महिन्याचे नाव 'श्रावण' पडले. श्रावण हा मराठी वर्षाचा पाचवा महिना आहे. हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार, श्रावण महिना हा हिंदूंचा सर्वात पवित्र महिना आहे. हिंदूंच्या धार्मिक भावना आणि श्रद्धा या महिन्याशी जोडलेल्या आहेत. ग्रेगोरियन कॅलेंडरनुसार हा महिना दरवर्षी जुलै ते ऑगस्ट दरम्यान येतो.

सामान्य भाषेत याला 'श्रावण' असे म्हणतात. हा महिना भगवान शिवाला अत्यंत प्रिय आहे, अशी हिंदूंची धार्मिक श्रद्धा आहे, म्हणून या महिन्यात हिंदू भगवान शंकराची पूजा करतात. याला भगवान शंकराचा महिना असेही म्हणतात. हा संपूर्ण महिना भक्तिगीते आणि धार्मिक वातावरणाने भरलेला असतो. हिंदू देवी–देवतांच्या मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी असते. हिंदू या महिन्यातील विशेष दिवस उपवास करतात आणि महिनाभर शुद्ध आणि शाकाहारी अन्न खातात.

श्रावणमास म्हणजे व्रतवैकल्यांचा आणि सणावारांचा महिना. श्रावणातील सर्व सोमवारांचे खूप माहात्म्य आहे. यादिवशी भक्त व्रत करतात. तसेच दर मंगळवारी मंगळागौरीची पूजा केली जाते. तसेच शनिवारी मारुतीची आराधना केली जाते. श्रावणात नागपंचमीला सर्प पूजा केली जाते. तर नारळीपौर्णिमेला सागराला भक्तिभावाने नारळ अर्पण केला जातो. रक्षाबंधन सण देखील याच महिन्यात साजरा करण्याची पद्धत आहे. श्रावणातील अष्टमीला श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी करतात. या दिवशी श्रीकृष्णाचा जन्म झाला असे पुराणात सांगितले आहे. म्हणून या दिवशी भाविक उपवास करतात आणि कृष्ण जन्माचा सोहळा साजरा करतात. श्रावणातील नवमीला बालगोपाल गोपाळकाला, दहीहंडी साजरी करतात. त्यानंतर येतो तो बैलपोळा हा सण. यालाच श्रावणी पोळा असेही म्हणतात. शेतकरी आपल्या बैलांच्या गळ्यात घुंगराच्या माळा घालतात त्यांची सजावट करतात. या दिवशी शेतकरी आपल्या बैलाची पूजा करतात. बैलांना नैवेद्य दाखवतात आणि सर्व गावकरी मिळून या बैलांची गावामध्ये मिरवणूक काढतात.

शेतकऱ्यांसाठी श्रावण महिना महत्त्वाचा आहे कारण यावेळी शेतकरी अनेक प्रकारची धान्ये, भाजीपाला, फुले इत्यादी पेरतात. भात, मका, ज्वारी, बाजरी, सूर्यफूल आणि अनेक प्रकारच्या भाज्यांची पेरणी या महिन्यात केली जाते.

श्रावण महिना हा हिंदू भक्तीचा महिना आहे. एप्रिल ते जून या कडाक्याच्या उष्णतेमुळे मनुष्य व प्राणी दोघांचेही हाल होतात, झाडे, नद्या, कालवे, तलाव, विहिरी इत्यादी कोरड्या पडतात आणि अनेक ठिकाणी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊन लोकांचे हाल होतात. श्रावण महिन्यातील मुसळधार पावसाने पृथ्वीच्या या दयनीय वातावरणाला नवसंजीवनी मिळते आणि सर्वत्र आनंदाची नवी लहर दिसू लागते.

श्रावण महिन्याचे महत्त्व प्राचीन काळापासून चालत आले आहे. पुराणात समुद्रमंथन फक्त श्रावण महिन्यातच होते. श्रावण महिन्यात भगवान शिव आणि माता पार्वती पृथ्वीवर वास करतात. हा महिना जसा भक्तीचा महिना आहे तसाच जीवनाचाही महिना आहे. श्रावण महिन्यात शेतकरी नवनवीन पिकेसावन आणि निसर्गही नवनवीन झाडे–झाडांना जन्म देतो. श्रावण हा महिना मानव, प्राणी आणि पक्षी सर्वांसाठी आनंदी वातावरण घेऊन येत असतो.

शब्दांकन – **प्रशांत बाफना,** मो. ८०५५४४०३८५

# गृहिणी

## आरोग्य

### जंक फूड खाण्याचे गंभीर धोके

आजच्या जीवनशैलीत जंक फूड खाण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. जिभेचे चोचले पुरवण्यासाठी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण अशा चमचमीत अन्नाकडे आकर्षित होतात. मात्र, यात अतिरिक्त प्रमाणात चरबी, साखर आणि मीठ असल्याने हे अन्न आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरू शकते. अशा अन्नामध्ये आवश्यक पोषक घटकांचा पूर्णपणे अभाव असतो. सतत असे अन्न खाल्ल्याने लठ्ठपणा वेगाने वाढतो आणि शरीरात इतर आजार मूळ धरू लागतात. यामुळे कमी वयातच मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होतात. तसेच पचनसंस्थेवर ताण येऊन अपचन आणि बद्धकोष्ठता यांसारखे पोटाचे विकार जडतात. यातील घातक रसायनांमुळे यकृत आणि मूत्रपिंडावर वाईट परिणाम होतो. रोगप्रतिकारशक्ती क्षीण झाल्यामुळे शरीर आजारांना सहज बळी पडते. त्यामुळे निरोगी आयुष्यासाठी घरगुती आणि सकस आहाराचा स्वीकार करणे गरजेचे आहे.

## पाककला

### पान-नारळ लाडू

**साहित्य :** सुक्या खोबऱ्याचा खिस किंवा ओले खोबरे २ कप, कंडेन्स्ड मिल्क १ कप, नागवेलीची पाने ४ ते ५, गुलकंद ३ चमचे, टूटी-फ्रुटी २ चमचे, बारीक चिरलेला सुका मेवा (काजू-बदाम) १ चमचा, हिरवा खाद्यरंग १ थेंब (ऐच्छिक), तूप १ चमचा.

**कृती :** प्रथम नागवेलीची पाने धुवून २ चमचे कंडेन्स्ड मिल्कसोबत मिक्सरमध्ये बारीक वाटून पेस्ट तयार करा. एका कढईत १ चमचा तूप गरम करून त्यात खोबऱ्याचा खिस घाला आणि मंद आचेवर २ ते ३ मिनिटे हलके परतून घ्या. आता उरलेले कंडेन्स्ड मिल्क आणि तयार केलेली पानाची पेस्ट कढईत घाला. सर्व मिश्रण मंद आचेवर सतत ढवळत राहा. मिश्रण घट्ट होऊन कढई सोडायला लागले की गॅस बंद करा आणि मिश्रण एका प्लेटमध्ये काढून थोडे थंड होऊ द्या. सारणासाठी एका लहान बाऊलमध्ये गुलकंद, टूटी-फ्रुटी आणि चिरलेला सुका मेवा एकत्र मिक्स करा. तयार खोबऱ्याच्या मिश्रणातून थोडे मिश्रण हातावर घेऊन चपटे करा. मध्यभागी थोडे गुलकंदाचे सारण ठेवून चारी बाजूने बंद करा आणि गोल लाडू वळा. तयार लाडू सुक्या खोबऱ्याच्या खिसमध्ये व्यवस्थित घोळवून घ्या. चविष्ट आणि रिफ्रेशिंग पान-नारळ लाडू सर्व्ह करण्यासाठी तयार आहेत.

## वास्तू

### तोडफोड न करता दोष करा दूर

* ज्या खोलीत किंवा कोपऱ्यात वास्तू दोष आहे असे वाटते, तिथे पीतळ किंवा लाकडाचा वास्तू पिरॅमिड ठेवा. पिरॅमिड ऊर्जे चे संतुलन राखण्यास मदत करतो.

* रोज सकाळी घरातील खिडक्या, दरवाजे काही वेळासाठी उघडे ठेवा, जेणेकरून ताजी हवा आणि सूर्यप्रकाश घरात येईल.

* घराच्या पूर्व किंवा ईशान्य दिशेला तुळशीचे रोप लावा. याशिवाय मनी प्लांट, बांबू प्लांट किंवा स्नेक प्लांट घरात ठेवल्याने शुद्ध हवा आणि सकारात्मकता मिळते. (काटेरी वनस्पती घरात ठेवणे टाळा).

## सौंदर्य

सकाळी फक्त साध्या पाण्याने किंवा मऊ क्रीमी फेस वॉशने चेहरा धुवा. चेहरा थोडा ओलसर असतानाच घट्ट मॉइश्चरायझर क्रीम लावा (जसे की शिआ बटर किंवा दुधाची साय).

## सल्ला

* मिक्सरच्या भांड्यात २ चमचे जाडे मीठ (खडे मीठ) टाकून १ मिनिट फिरवून घ्या, पात्यांची धार पुन्हा तेज होईल.

* करपलेल्या भांड्यात पाणी २ चमचे बेकिंग सोडा आणि १ चमचा डिशवॉश लिक्विड घालून ५ मिनिटे उकळा. जळलेला थर लगेच निघून जाईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६**

**स्वातंत्र्य दिन, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, उत्तरा २७।२६, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. १६ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आजचा दिवस कार्यक्षेत्रात प्रगतीकारक ठरेल.

**वृषभ :** कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील.

**मिथुन :** बौद्धिक कामांमध्ये यश मिळेल.

**कर्क :** मानसिक शांतता लाभेल. व्यवसायात वृद्धी होईल.

**सिंह :** मानसन्मान आणि प्रतिष्ठा वाढेल. कार्यक्षेत्रात नवीन जबाबदाऱ्या मिळतील.

**कन्या :** नियोजित योजना यशस्वी होतील. आर्थिक स्थिती मजबूत राहील.

**तुळ :** व्यावसायिक क्षेत्रात चांगला नफा होईल.

**वृश्चिक :** अडकलेले पैसे परत मिळण्याची शक्यता आहे.

**धनु :** सामाजिक कार्यात सहभाग वाढेल.

**मकर :** कामाच्या ठिकाणी वरिष्ठांची प्रशंसा लाभेल.

**कुंभ :** नवनवीन संधी उपलब्ध होतील. शुभ बातम्या मिळतील.

**मीन :** आत्मविश्वासात वाढ होईल. सर्व प्रलंबित कामे पूर्ण होतील.

## शब्दगंध क्र. ७४९५ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३ | ■ | ४ | ५ |
| ६ | | ■ | ■ | ७ | ८ | | |
| ९ | | १० | ११ | ■ | | ■ | |
| | ■ | १२ | | ■ | १३ | | |
| ■ | १४ | | ■ | १५ | | ■ | ■ |
| १६ | | ■ | १७ | ■ | | १८ | १९ |
| २० | | | | २१ | ■ | २२ | |
| २३ | | ■ | २४ | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) अहमदनगर जिल्ह्यातील एक तालुका ४) गोष्ट; कलम ६) नवीन; नूतन ७) सांगता; समाप्ती; शेवट ९) नातेवाईक; आप्त; नातलग १२) भारताच्या उत्तरेकडील एक देश १३) कट्यारीसारखे एक हत्यार १४) एक वृक्ष ज्याच्यापासून एक पेयही मिळते १५) झाडावर पिकलेले फळ १६) एक समसंख्या; एक तपातील वर्षांची संख्या १८) शीख धर्माचे संस्थापक २१) फिरस्ता; गोसावी २३) गंध; राहणे २४) मृत पतीच्या शरीराबरोबर स्वतःचे दहन करून घेणारी; पतिव्रता; पार्वती २५) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र

**उभे शब्द :-** १) जम्मू-काश्मीरची राजधानी २) लंकेचा दहातोंडी राजा ३) ऊस, फळ यातील द्रव ४) वडील; पिता; तात; जनक ५) बागकाम करणारा; फुलधर; माळी ८) अपमान; अवमान; पाणउतारा १०) गाय वगैरे जनावरांच्या शरीरावर आढळून येणारा एक रक्तशोषक कीटक ११) शरीर; देह; काया; कुडी १४) राजा हरिश्चंद्राची पत्नी १६) बारावी तिथी; द्वादशी १७) महाभारत कथेतील एक राजा; विशाल; प्रचंड १९) नूतन; नवीन २०) उणीव; कमतरता; वानवा २२) त्वचेवरील काळ डाग; चामखीळ; तीळ

### शब्दगंध क्र. ७४९४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | को | ले | ■ | अ | व | ता | र |
| ट | ■ | कु | र | घो | डी | ■ | ज |
| ■ | ■ | र | ब | री | ■ | मु | नी |
| मा | र | वा | डी | ■ | न | र | ■ |
| मा | स | ळी | ■ | ज | व | ळी | क |
| सा | ■ | ■ | पा | य | री | ■ | रा |
| हे | ल | पा | टा | ■ | ■ | ना | म |
| ब | ट | वा | ■ | पा | रं | ग | त |

### फिल्मीचक्कर क्र. १२४९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धी | रे | धी | रे | म | च | ल | ऐ |
| र | ■ | ■ | खा | ■ | ल | ■ | गु |
| ज | ■ | मा | ■ | शो | ■ | हा | ल |
| कु | मा | र | गौ | र | व | ■ | ब |
| मा | ■ | दि | ■ | ■ | च | ■ | द |
| र | ■ | या | ■ | खा | न | दा | न |
| ■ | अं | जा | न | ■ | ■ | म | ■ |
| ■ | ■ | य | ■ | अ | ज | न | बी |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** सकारात्मक विचार ही अशी ताकद आहे, जी कठीण प्रसंगालाही संधीत बदलू शकते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कासव एवढे जास्त आयुष्य कसे जगतात?

निसर्गाने प्रत्येक जीवाला काही ना काही वेगळे वैशिष्ट्य दिले आहे. कोणाला खूप वेग दिला आहे, तर कोणाला आकाशात उंच उडण्याची ताकद दिली आहे. पण कासवाला निसर्गाने दिलेली सर्वात मोठी भेट म्हणजे त्याचे दीर्घ आयुष्य! पृथ्वीवर सर्वात जास्त काळ जगणाऱ्या प्राण्यांमध्ये कासवाचा पहिला क्रमांक लागतो. काही कासवं शंभर, दीडशे अगदी दोनशे वर्षेसुद्धा सहज जगतात. एकाच ठिकाणी शांत बसून राहणारा हा प्राणी एवढे मोठे आयुष्य कसे काय जगत असेल, असा प्रश्न आपल्या मनात नेहमी येतो. कासवाच्या या अफाट आयुष्यामागे त्याची खास शारीरिक रचना आणि अत्यंत शांत जीवनशैली लपलेली आहे.

कासवाच्या दीर्घ आयुष्याचे सर्वात मोठे रहस्य म्हणजे त्याची अत्यंत मंद पचनक्रिया. आपण जेव्हा अन्न खातो, तेव्हा आपले शरीर त्याचे ऊर्जे त रूपांतर करण्यासाठी खूप वेगाने काम करते. या प्रक्रियेत शरीरातील पेशींची झीज होत असते. परंतु कासवाच्या शरीरात अन्न पचवण्याची आणि ऊर्जा वापरण्याची गती अतिशय मंद असते. त्यामुळे त्याच्या शरीरातील पेशींची झीज खूप हळूहळू होते. मंद पचनक्रियेमुळे कासवाला श्वासोच्छवासही खूप कमी वेळा करावा लागतो. माणसाचे हृदय एका मिनिटात ७० ते ८० वेळा धडकते, तर कासवाचे हृदय एका मिनिटात फक्त ५ ते १० वेळाच धडकते. अवयवांवर कमी ताण पडल्यामुळे त्याचे हृदय आणि इतर अवयव शेकडो वर्षे न थकता आणि न बिघडता काम करत राहतात.

कासवाकडे निसर्गाने दिलेली दुसरी मोठी ढाल म्हणजे त्याच्या पाठीवरील मजबूत कवच. हे कवच एवढे कठीण असते की शिकारी प्राणी सहजपणे कासवाला इजा पोहोचवू शकत नाहीत. जेव्हा जेव्हा काही धोका वाटतो, तेव्हा कासव आपले डोके, हात आणि पाय या कवचाच्या आत ओढून घेते. यामुळे निसर्गात राहूनही ते शत्रूंपासून सुरक्षित राहते आणि अपघाती मृत्यू टाळू शकते. याशिवाय, बहुतेक दीर्घायुषी कासवं ही पूर्णपणे शाकाहारी असतात. गवत, झाडांची पाने, फळे असा साधा आणि नैसर्गिक आहार असल्यामुळे त्यांच्या पचनसंस्थेवर कधीही अतिरिक्त ताण येत नाही आणि शरीरात विषारी घटक साचत नाहीत.

कासवाच्या शरीरात अन्न आणि पाणी साठवून ठेवण्याची अद्भुत क्षमता असते. पचनक्रिया मंद असल्यामुळे एकदा खाल्लेले अन्न त्याच्या शरीराला खूप काळ ऊर्जा देत राहते. यामुळेच कठीण प्रसंगी किंवा अन्न-पाणी उपलब्ध नसतानाही कासव अनेक महिने अन्नाशिवाय सहज जिवंत राहू शकते. वैज्ञानिक दृष्टीने पाहिले तर, कासवाच्या शरीरातील पेशींमध्ये स्वतःची दुरुस्ती करण्याची अप्रतिम क्षमता असते. वाढत्या वयानुसार शरीराची होणारी झीज रोखण्याचे काम त्याची जनुकीय रचना करत असते. त्यांची रोगप्रतिकारक शक्ती इतकी मजबूत असते की त्यांना सहसा गंभीर आजार होत नाहीत.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कासवाची जीवनशैली. कासव कधीही घाईगडबड करत नाही. ते अत्यंत शांत, हळूहळू आणि ताणतणावमुक्त जीवन जगते. निसर्गात राहताना कोणताही मानसिक ताण न घेणे आणि संथ गतीने राहणे हेच कासवाच्या निरोगी आणि दीर्घ आयुष्याचे खरे गमक आहे. थोडक्यात सांगायचे तर, शांत स्वभाव, साधे राहणीमान, मजबूत संरक्षण आणि धीमा वेग या सर्व गोष्टींमुळे कासव शतकानुशतके या पृथ्वीवर आनंदाने जगू शकते.

### अंधारातून प्रकाशाकडे

एका टेकडीच्या पायथ्याशी एक लहानसे गाव होते. तिथे राघू नावाचा एक गरीब पण मेहनती कुंभार राहत असे. राघूला मातीची सुबक आणि सुंदर भांडी बनवण्याची मनापासून आवड होती. गावातील इतर कुंभार जुन्या पद्धतीने भांडी बनवून विकत असत, पण राघूला काहीतरी वेगळे आणि उत्कृष्ट करायचे होते.

एकदा राघूने ठरवले की तो एका मोठ्या प्रदर्शनासाठी एक भव्य आणि अत्यंत नाजूक मातीचा दिवा तयार करेल. असा दिवा जो यापूर्वी कोणीही पाहिला नसेल. त्याने माती मळली, चक्रावर आकार दिला आणि रात्रंदिवस मेहनत करून एक अप्रतिम दिवा तयार केला.

पण संकट तिथेच संपले नाही. जेव्हा त्याने तो दिवा भट्टीमध्ये भाजण्यासाठी ठेवला, तेव्हा अचानक मुसळधार पाऊस सुरू झाला. भट्टीचे छप्पर गळू लागले आणि पाण्यामुळे त्याचा तो दिवा अर्धा विरघळून वाहून गेला. राघूची महिन्यांची मेहनत का क्षणात वाया गेली. तो प्रचंड निराश झाला. त्याच्या शेजाऱ्याने त्याला सल्ला दिला, राघू, साधी भांडी बनव आणि विक. एवढा त्रास कशाला घेतोस?

पण राघूने हार मानली नाही. त्याने या प्रसंगाला आपला पराभव न मानता एक आव्हान मानले. त्याने विचार केला की, भट्टी सुरक्षित करण्यासाठी आधी भक्कम छप्पर उभारले पाहिजे आणि मातीचे प्रमाण अधिक मजबूत केले पाहिजे. त्याने पुन्हा एकदा नव्याने सुरुवात केली.

दिवसेंदिवस त्याने अधिक कष्ट घेतले. भट्टी भक्कम केली, मातीतील दोष दूर केले आणि पुन्हा एकदा तसाच सुंदर दिवा तयार केला. यावेळी भट्टीतील उष्णता आणि निसर्गाचे आव्हान दोन्ही पार करून तो दिवा अत्यंत मजबूत आणि चमकदार बनून बाहेर आला.

जेव्हा प्रदर्शन भरले, तेव्हा राघूचा तो दिवा सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. त्याला प्रथम पुरस्कार मिळालाच, पण सोबतच त्याच्या कामाला खूप मोठी मागणीही आली. संघर्षाने त्याला खचवून टाकण्याऐवजी अधिक मजबूत बनवले होते.

तात्पर्य : आयुष्यात येणाऱ्या अडचणी आणि संघर्ष आपल्याला उद्ध्वस्त करण्यासाठी नाही, तर आपली खरी क्षमता उजळवण्यासाठी येतात. संघर्षाला न घाबरता सातत्याने प्रयत्न करत राहिल्यास यश नक्कीच मिळते.

## आत्मशक्ति



### आत्मा ओळखतो

झाडे प्राणवायु निर्माण करतात. प्राणवायु आम्हाला जगण्यासाठी अत्यावश्यक असतो. उच्छ्वास टाकतांना आम्ही कार्बंदील हा वायु बाहेर टाकतो. त्याला झाडे-झुडपे आपल्यात घेतात, पाणी व सूर्यप्रकाशाच्या मदतीने त्याचे त्यांच्या अन्नात रूपांतर करतात व प्राणवायू बाहेर सोडतात. वनस्पती अन्न द्वारा फुलाफळांना निर्माण करतात व बाहेर टाकलेला प्राणवायू आपल्या उपयोगात येतो. तरीसुद्धा आम्ही जंगले नष्ट करीत आहोत की जे प्राणवायूचे फार मोठे स्त्रोत आहेत व प्राणवायूचा भावी साठा नष्ट करीत आहेत. आत्मा प्रत्येक वस्तूकडे विशाल दृष्टीने पहाते. त्याला कळते की माणूस, वनस्पती, प्राणी, प्राकृतिक साधने आणि पृथ्वी ही परस्पर एकमेकांवर अवलंबून आहेत आणि पृथ्वी वरील जीवन व्यवस्थित चालण्यासाठी निसर्गाच्या नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. प्रदूषित हवा आणि पाणी रोगांचा निर्मिती करतात. त्याचा परिणाम केवळ आपल्यावरच नव्हे तर भावी पिढ्यावरही आम्ही होऊ शकतो. जंगलांचा नाश करून भावी पिढीला त्यापासून वंचित ठेवतो की जे त्यांच्या जीवनाला सुखी व समृद्ध बनवतील. ह्या संपत्तीने त्यांचे जीवन समृद्ध व सुखी झाले असते. अशी बहुमोल संपत्ती आपण नष्ट करीत असतो. जेव्हा आम्ही पूर्णतः अंतर्मुख होतो तेव्हा पृथ्वीवरील साधनसंपत्तीचा विचार करतो. केवळ आपल्या स्वार्थासाठीच नव्हे तर सर्व माणसांना आजच्यासाठी नव्हे तर येणाऱ्या भविष्यासाठीही त्याचा उपयोग होईल असेच निर्णय आपण घेतो. मग आपण पृथ्वीवरील आपल्या व्यक्तिगत भागाचे जतन करू लागतो व संपूर्ण पृथ्वीचे प्रदूषण आणि नाशापासून संरक्षण करण्याची आपली भूमिका पार पाडतो. आत्म्याशी जोडा (आत्मसंयोग)आपण आत्म्याशी जोडायचे जेव्हा ठरवितो तेव्हा आपण आपल्या स्वतः ला ओळखण्याचेच ठरवितो. आम्ही देहधारी आत्मा आहोत. म्हणजेच आपल्या आत्म्याने शरीराला व मनाला धारण केले आहे.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### कष्ट

पाचवा आहे - आत्म्याचे मूळ संस्कार - विवेक, शुद्धता, शांती, प्रेम, प्रसन्नता, परमानंद आणि सामर्थ्य. आपल्या घरात नवजात बाळाच्या रूपात आलेल्या आत्म्याकडे हे पाच प्रकारचे संस्कार असतात. हा आत्मा कोणते संस्कार घेऊन आला आहे आणि त्याला कसं सशक्त बनवता येईल याकडे आपल्याला लक्ष द्यावं लागेल. हे करण्यासाठी आपण मोठ्यांनी स्वतःची काळजी घ्यायला हवी. यशस्विवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. जर सतत वादविवाद आणि ताणतणाव हवी. यशस्विवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. जर फक्त संस्कारांवर नाही तर ताणतणाव असतील, तर त्याचा थेट परिणाम मुलांवर होतो. मुलांना संस्कारांवर नाही तर वातावरणावर असतील, तर त्याचा थेट परिणाम मुलांवर होतो. पण ती कमी का आहे? आपल्याला माहित आहे की ताणतणावाचा आपला रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होतो. पण मुलांकडे त्यांचा स्वतःचा ताणतणाव नसतो. पालकांचा ताणतणाव मुलांपर्यंत पोहोचतो आणि त्यांच्या रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम करतो.सुरेश ओबेरॉय : याचा अर्थ, जसे आईवडील तशी मुले. शिवानीदी : बरोबर. जर पालकांनी सुरुवातीपासूनच त्यांचे संस्कार सुधारण्याकडे लक्ष दिले नाही तर ते त्यांच्या मुलांच्या संस्कारांवरही आयुष्यभर ताण करतात.एके दिवशी मी एका महिलेला भेटले. ती दुःखी गरज होती. मी तिला हे समजावले आणि शांत राहा, रागवू नका, असे सांगितले. त्यावर ती म्हणाली की, तिला हे अजिबात जमणार नाही. कारण तो थोडा फार दिवसा पासून नऊ महिलांचा आणि त्यापुढच्या २-३ वर्षांच्या कालावधीचा प्रश्न होता. इतका प्रदीर्घ काळ ती न रागावता, न चिडता राहू शकत नव्हती. मग ती म्हणाली की, तिने पहिले मुलही खूप लवकर चिडायचे आणि हा संस्कार मुलाने तिच्याकडूनच उचलला असेल याची तिला जाणीवही नव्हती. मी तिला सांगितले की, दुसऱ्या मुलाच्या वेळेस तरी तिने यासाठी कष्ट घ्यावे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पहिला : अरे, दारू पिल्याने यकृत खराब होतं,
हे तुला माहित आहे ना?
दूसरा : माहित आहे रे, पण औषधं तरी कुठे गोड असतात?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* नीती आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष कोण असतात?

– भारताचे पंतप्रधान

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### तांदूळ

जगभरातील अन्नधान्यातील अधिक जनतेने तांदूळ हे प्रमुख अन्न आहे. तांदूळ हा प्राचीन काळापासून आहारात वापरला जातो. ख्रिस्तपूर्व ३०० वर्षांपूर्वी तो भारतात आला आहे. पूर्वीच्या काळी त्याला 'नीवार' असे म्हणत. मराठीत 'तांदूळ', हिंदीत 'चावल', संस्कृतमध्ये 'तंदुल', तर शास्त्रीय भाषेत 'ओरायझा सटायव्हस' या नावाने ओळखला जातो. ही वनस्पती 'पोएसी' कुळातील आहे. भारतात तांदूळ सर्वत्र होतो. विशेषतः दक्षिण गुजरातमध्ये व महाराष्ट्रात कोकणामध्ये तांदळाचे पीक घेतले जाते. आसाम, तमिलनाडू, बंगाल, बंगाली येथे उच्च प्रतीचा तांदूळ तयार होतो. तांदळाचे औषधांमध्ये, शुभकार्यात, सणांमध्ये व विविध पदार्थांसाठी अनेक प्रकार पडतात.उदाहरणार्थ : बासमती, इंद्रायणी, अंबेमोहर, बिरयानी, मटर तांदूळ, कोलम, डबल बासमती असे असंख्य प्रकार आहेत.या सर्व प्रकारांपैकी बासमती हा प्रकार चवीला सर्वोत्तम मानला जातो. तर आरोग्याच्या दृष्टीने इंद्रायणी तांदळाचा गंधा हातसडीचा तांदूळ उत्कृष्ट मानला जातो. तसेच आयुर्वेदिक दृष्टीने लाल तांदूळ हा श्रेष्ठ सांगितला आहे. तांदळाची लागवड काळीभुई किंवा रोपे तयार करून केली जाते. ही रोपे दोन ते तीन इंच वाढल्यानंतर शेतात लावली जातात. या रोपांना सर्व बाजूंनी पाणी लावलेले असते. या पाण्यातून गाळ व पोकळ असा दाणा बाहेर निघतो. निसर्ग व या तांदळाच्या टोकाशी आंच्या असतात. औषधामध्ये तांदळाचे दाणे तयार होतात. पुष्कळसे हे रोप हिरवे राहते असे. बेसी तांदूळ तयार होतो, तेव्हा हे रोप परिपक्व होऊन पिवळसर रंगाचे होते.औषधी गुणधर्म : स्वादु तिक्तकषायः शीतः स्निग्धः गुरपाच्यः । कषायानुसारः पथ्यः लघुरुक्ति हितः ।।आयुर्वेदानुसार : तांदळामध्ये तांदळाचा रंग आणि तांदळाचा तांदूळ श्रेष्ठ प्रतीचा असतो. तो खाल्यास गोड व थंड असतो. तसेच पित्त, मूत्र, पथ्यासाठी तांदळाचा तांदूळ श्रेष्ठ प्रतीचा असतो. तो खाल्यास (क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## 'ग्रेट डाईंग'नंतरच्या काळावर नवा प्रकाश

पृथ्वीच्या इतिहासातील सर्वात मोठा विनाशकारी एंड-पर्मियन मास एक्स्टिन्कशन म्हणजेच ग्रेट डाईगनंतर सागरी परिसंस्था (मरीन इकोसिस्टीम) किती जलद गतीने सावरली, याबद्दलच्या जुन्या समजुतींना आर्क्टिकमधील एका मोठ्या शोधाने आव्हान दिले आहे. पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनानुसार, सागरी जीवन सावरण्यासाठी ८० लाख वर्षे लागली, असा पूर्वीचा अंदाज आता खोटा ठरला आहे.


नॉर्वेच्या स्वालबार्ड द्वीपसमूहातील स्पिटस्बर्गन बेटावर सुमारे २४.९ कोटी वर्षांपूर्वीचे जीवाश्म सापडले.

**स्पिटस्बर्गन येथे दुर्मीळ शोध**

यामध्ये तब्बल ३०,००० हून अधिक जीवाश्मांचा (दांत, हाडे, इत्यादी) समावेश आहे. तसेच यामध्ये डायनासोर युगातील सर्वात जुनी ज्ञात सागरी सरपटर्णा ?या प्राण्यांची परिसंस्था उघड झाली. 'सायन्स जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासानुसार, सागरी जीवन महाविनाशानंतर अवघ्या तीन दशलक्ष वर्षांत (३० लाख वर्षे) पुन्हा जटिल अन्नसाखळ्यांसह (कॉम्पेक्स फूड चेन) तयार झाले.

**समुद्री जीवनातील वैविध्य**

या जीवाश्म साठ्यामध्ये इक्थिओसॉर्स, सागरी उभयचर प्राणी, हाडे असलेले मासे आणि शार्क यांचा समावेश आहे. सापडलेल्या प्रमुख प्राण्यांमध्ये खालील प्राण्यांचा समावेश आहे. ग्रिप्पिया लॉन्गिरोस्टिस हा लहान इक्थियोप्टेरिजियन प्राणी स्क्विडसारख्या ॲमोनॉईडस्ची शिकार करत असे. ॲफेनरम्मा हा सागरी उभयचर प्राणी माशांची शिकार करायचा. सायम्बॉस्पॉन्डायलस हा ५ मीटरपेक्षा जास्त लांबीचा महाकाय इक्थिओसॉर खोल समुद्रातील सर्वोच्च शिकारी होता.

**मोठा वैज्ञानिक निष्कर्ष**

संशोधकांनी सांगितले की, या जीवाश्मांच्या वैविध्यामुळे हे सिद्ध होते की, सागरी परिसंस्थांची पुनर्बांधणी खूप जलद गतीने झाली. हा शोध जीवनाच्या लवचिकतेवर प्रकाश टाकतो आणि समुद्रात राहणाऱ्या सरपटणाऱ्या प्राण्यांचे विविधीकरण महाविनाशापूर्वीच सुरू झाले असावे, यावरही प्रकाश टाकतो.

## चीनमध्ये धूम एआय क्लिनिकची

चीनने तंत्रज्ञानाच्या बाबतीत जगाला पुन्हा एकदा थक्क केले आहे. सोशल मीडियावर सध्या चीनमधील एका अशा रुग्णालयाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे, जिथे एकही डॉक्टर प्रत्यक्ष हजर नसताना रुग्णांवर उपचार केले जात आहेत. हे एआय संचालित क्लिनिक (एआय क्लिनिक) पाहून नेटिझन्स म्हणत आहेत की, 'चीन सध्या ३०२६ सालात जगत आहे. व्हायरल व्हिडीओमधील हे रुग्णालय म्हणजे एक छोटे कियोस्क किंवा केबिन आहे. यामध्ये रुग्णाने प्रवेश केल्यावर त्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे पार पडते. **संवाद :** रुग्ण आत गेल्यावर एआय सिस्टीमशी संवाद साधतो. एआय एखाद्या तज्ज्ञ डॉक्टरांप्रमाणे रुग्णाला लक्षणे, जुनी आजारपण आणि इतर माहिती विचारते. **६० सेकंदांत निदान :** सर्व माहिती मिळाल्यावर अवघ्या १ मिनिटाच्या आत (६० सेकंद) एआय सिस्टीम आजाराचे अचूक आकलन करते.

**तज्ज्ञांची पडताळणी :** एआयने गोळा केलेला डेटा एका रिमोट (दुसऱ्या ठिकाणी बसलेल्या) मानवी डॉक्टरांकडे पाठवला जातो. त्यांनी हिरवा कंदील दाखवताच पुढील प्रक्रिया सुरू होते. **झटपट औषधे :** निदानानंतर रुग्णाला बाहेर जाण्याची गरज पडत नाही; त्याच मशिनमधून आवश्यक औषधे त्वरित बाहेर येतात.

१०००
ह ् न




**अधिक केंद्रे उभारण्याची तयारी**

चीन सरकार अशा प्रकारचे १००० एआय कियोस्क देशभर बसवण्याच्या तयारीत आहे. यामुळे रुग्णालयांमधील गर्दी कमी होण्यास आणि ग्रामीण भागात त्वरित आरोग्य सेवा पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे. तासन्तास रांगेत उभे राहण्यापेक्षा अवघ्या काही मिनिटांत उपचार मिळवण्याचा हा मार्ग आरोग्य क्षेत्रात क्रांती घडवणारा ठरत आहे. जागतिक स्तरावर चर्चा सोशल मीडियावर या तंत्रज्ञानाचा व्हिडीओ पाहून जगभरातून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. भारतातही अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाची गरज आहे का, यावर चर्चा रंगली आहे. मात्र, तज्ज्ञांच्या मते, गंभीर आजारांसाठी मानवी डॉक्टरांची गरज असली तरी, सर्दी, ताप आणि प्राथमिक उपचारांसाठी हे एआय क्लिनिक अत्यंत प्रभावी ठरू शकते.

## पृथ्वीचे वातावरण गुपचूप खातोय चंद्र!

आपल्या पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह असलेला चंद्र, गेल्या कित्येक अब्ज वर्षांपासून गुपचूप पृथ्वीच्या वातावरणातील सूक्ष्म अंशांचे भक्षण करत आहे. लाईव्ह सायन्स या प्रसिद्ध विज्ञान मासिकाने प्रसिद्ध केलेल्या एका नवीन संशोधनातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. या शोधामुळे नासाच्या अपोलो मोहिमेतील चंद्राच्या मातीच्या नमुन्यांवर आधारित असलेला २० वर्षांपूर्वीचा जुना सिद्धांत आता पूर्णपणे बदलला आहे.



**नेमका शोध काय आहे?**

युनिव्हर्सिटी ऑफ रोचेस्टरच्या संशोधकांनी केलेल्या या अभ्यासानुसार, पृथ्वीच्या वातावरणातील आयन्स सौर वाऱ्यांच्या प्रवाहामुळे आणि पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रामुळे थेट चंद्रापर्यंत पोहोचतात आणि तिथे शोषले जातात.


ही प्रक्रिया कशी घडते? या विषयी संशोधकांनी सांगितले की, पृथ्वीभोवती एक अदृश्य चुंबकीय कवच असते. जेव्हा सूर्याकडून येणारे सौर वारे पृथ्वीला धडकतात, तेव्हा पृथ्वीच्या विरुद्ध बाजूला एका लांब शेपटीसारखा चुंबकीय भाग तयार होतो, ज्याला मॅग्नेटोटेल म्हणतात. दर महिन्याला जेव्हा पौर्णिमा असते, तेव्हा चंद्र नेमका पृथ्वीच्या या चुंबकीय शेपटीतून प्रवास करतो. या काळात पृथ्वीच्या वरच्या वातावरणातील नायट्रोजन आणि ऑक्सिजनचे सूक्ष्म कण या चुंबकीय लहरींच्या सहाय्याने चंद्राच्या पृष्ठभागावर फेकले जातात. चंद्राची माती हे कण स्वतःमध्ये शोषून घेते.

**या शोधाचे महत्त्व**

संशोधकांच्या म्हणण्यानुसार, हे संशोधन हा केवळ खगोलीय चमत्कार नसून मानवासाठी महत्त्वाचा पुरावा आहे. चंद्राच्या पृष्ठभागावर पृथ्वीच्या प्राचीन वातावरणाचे अंश अब्जावधी वर्षांपासून जतन केलेले आहेत. याचा अर्थ असा की, पृथ्वीवर जेव्हा जीवसृष्टीची सुरुवात झाली, त्या काळातील वातावरणाचे स्वरूप समजून घेण्यासाठी आता चंद्राची माती हा सर्वात मोठा ऐतिहासिक संग्रह ठरणार आहे. भविष्यात जेव्हा मानव चंद्रावर वसाहती स्थापन करेल, तेव्हा तिथे मिळणारे हे घटक श्वासोच्छवासासाठी किंवा इतर प्रक्रियांसाठी उपयुक्त ठरू शकतात का, यावर आता शास्त्रज्ञ अधिक संशोधन करत आहेत.

## मेंदूला शॉक दिल्याने गणित उत्तम?

गणिताची कठीण उदाहरणे सोडवताना अनेकदा मेंदूला प्रचंड ताण द्यावा लागतो. मात्र, आता एका नवीन संशोधनानुसार, मेंदूला सुरक्षित विद्युत प्रवाहाद्वारे उत्तेजित केल्यास गणित सोडवण्याची क्षमता अधिक प्रभावी होऊ शकते, असे दिसून आले आहे. युनिव्हर्सिटी ऑफ सरे येथील संशोधकांनी १८ ते ३० वयोगटातील तरुणांवर केलेल्या प्रयोगातून हे निष्कर्ष समोर आले आहेत.




संशोधकांनी मेंदूच्या डोर्सोलॅटरल प्रीफ्रंटल कॉर्टेक्स या भागावर लक्ष केंद्रित केले. मेंदूचा हा भाग प्रामुख्याने शिकणे, स्मरणशक्ती आणि एकाग्रता यासाठी जबाबदार असतो. अभ्यासादरम्यान ७२ तरुणांना पाच दिवसांचे गणिताचे प्रशिक्षण देण्यात आले. यात काही तरुणांना ट्रान्सक्रॅनियल रँडम नॉइज स्टिम्युलेशन या तंत्रज्ञानाद्वारे मेंदूला अत्यंत कमी दाबाचा आणि वेदनारहित विद्युत प्रवाह देण्यात आला.

**न्यूरोबायोलॉजी आणि शिक्षणाचा संबंध :** या अभ्यासाचे मुख्य लेखक रोई कोहेन कादोष यांच्या मते, आतापर्यंत शिक्षण पद्धतीत सुधारणा करण्यासाठी केवळ शिक्षकांचे प्रशिक्षण किंवा अभ्यासक्रमात बदल यांसारख्या बाह्य घटकांवर भर दिला जात होता. मात्र, विद्यार्थ्यांची न्यूरोबायोलॉजी (मेंदूची रचना) अनेकदा पर्यावरणापेक्षा शिक्षणावर अधिक परिणाम करते. ज्यांच्या मेंदूतील विविध भागांमधील संपर्क कमकुवत असतो, त्यांच्यासाठी हा सुरक्षित विद्युत प्रवाह अत्यंत उपयुक्त ठरला आहे.

मेंदूला दिलेल्या विद्युत प्रवाहामुळे तरुणांची गणिती कोडी सोडवण्याची गती आणि अचूकता वाढल्याचे दिसून आले. ही प्रक्रिया पूर्णपणे वेदनारहित असून, टाळूवर इलेक्ट्रोड्स् ठेवून मेंदूची कार्यक्षमता वाढवली जाते. विद्युत प्रवाहामुळे मेंदूतील जीएबीए या रसायनाची पातळी कमी होऊन नवीन माहिती लक्षात ठेवणे सोपे होते. या तंत्रज्ञानामुळे शैक्षणिक विषमता कमी होऊन प्रत्येकाला आपली पूर्ण क्षमता गाठण्यास मदत होऊ शकते.

## बिबट्याप्रमाणे शिकार करणाऱ्या मगरी

ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड प्रांतातील एका घराच्या परिसरात वैज्ञानिकांनी केलेल्या महत्त्वपूर्ण शोधामुळे प्राचीन मगरींच्या जीवनशैलीबद्दलचे जुने मत बदलले आहे. संशोधकांना ५.५ कोटी वर्षांपूर्वीच्या मगरींच्या जीवाश्म स्वरूपातील अंड्यांचे कवच सापडले आहेत. या



कवचांच्या अभ्यासातून मेकोसुकाईन्स नावाच्या नामशेष मगरींच्या गटाबद्दल धक्कादायक माहिती मिळाली आहे. सिडनीचे पॅलेओन्टोलॉजिस्ट मायकल आर्चर यांच्या मते, या प्राचीन मगरी आधुनिक मगरींप्रमाणे फक्त पाण्यात राहत नव्हत्या. त्या झाडांवर चढून आणि बिबट्याप्रमाणे सावजावर उडी मारून शिकार करत असाव्यात.

या विचित्र शिकारीच्या तंत्रामुळे मेकोसुकाईन्स ही जमिनीवर राहणारी शिकारी होती, जी विविध वातावरणाशी जुळवून घेत असे. मर्गॉन येथे सापडलेले हे कवच ऑस्ट्रेलियातील सर्वात जुने मगरींचे कवच आहे. त्याच्या सूक्ष्म तपासणीतून मेकोसुकाईन्सच्या प्रजनन प्रक्रियेचे महत्त्वपूर्ण तपशील समोर आले आहेत. या मगरी तलावांच्या काठावर अंडी घालत असत. या काळात ऑस्ट्रेलियन परिसंस्थेत बदल होत होते, जिथे तलावातील पाणी ऋतूनुसार कमी होत असे किंवा तलाव कोरडे पडत असत. अशा बदलत्या परिस्थितीमुळे माशांची संख्या आणि शिकारीची उपलब्धता प्रभावित होत असे. त्यानुसार या मगरी घरटी बनवण्याच्या पद्धतीत बदल करत होत्या. ज्या ठिकाणी ही अंडी सापडली, तो मर्गॉन परिसर ५.५ कोटी वर्षांपूर्वी दाट जंगलांनी व्यापलेला होता. या परिसंस्थेत बेडूक, साप आणि जगातील सर्वात जुने ज्ञात गाणारे पक्षी यांचे वैविध्य होते. हा शोध मेकोसुकाईन्सची अनुकूलता आणि प्राचीन ऑस्ट्रेलियाची जैवविविधता दर्शवणाराही ठरला आहे.

## स्पेनला मिळणार पहिली राणी

स्पेनच्या राजघराण्यामध्ये दीड शतकानंतर एक मोठी ऐतिहासिक क्रांती होणार आहे. १८६८ मध्ये राणी इसाबेला दुसरी यांची सत्ता संपल्यानंतर, स्पेनला अद्याप एकही महिला राज्यकर्ती मिळालेली नाही. मात्र, आता राजकुमारी लिओनोर स्पेनची पहिली क्वीन रेग्नंट बनून ही परंपरा मोडीत काढण्यासाठी सज्ज झाली आहे.

लिओनोर केवळ राजघराण्यातील सदस्य नसून ती एक प्रशिक्षित सैनिक आहे. तिने स्पेनच्या भूदल, नौदल आणि वायूदल अशा तिन्ही सैन्य दलांत कठोर लष्करी प्रशिक्षण घेतले आहे. जानेवारी २०२६ मध्ये तिने या प्रशिक्षणाचा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. अवघ्या २० वर्षांच्या लिओनोरला १० पेक्षा जास्त भाषा अवगत आहेत. तिच्या या संवादकौशल्यामुळे ती आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पेनचे प्रतिनिधित्व करण्यास अधिक सक्षम मानली जात आहे.

राजकुमारी लिओनोर ही सध्याचे राजे फिलिप सहावे यांची थोरली मुलगी आहे. २०१४ मध्ये तिची अधिकृत वारस म्हणून घोषणा करण्यात आली होती. स्पेनच्या संविधानानुसार, भविष्यात ती देशाची राष्ट्रप्रमुख आणि सर्वोच्च कमांडर-इन-चीफ बनेल.




**१५० वर्षांचा इतिहास बदलणार**

स्पेनमध्ये गेल्या १५० वर्षांपासून केवळ पुरुषच गादीवर बसले आहेत. १८३३ ते १८६८ दरम्यान राज्य करणाऱ्या राणी इसाबेला दुसरी यांच्यानंतर स्पेनला आता लिओनोरच्या रूपाने पहिली महिला शासक मिळणार आहे. तिची लोकप्रियता स्पेनमध्ये प्रचंड असून तिला आधुनिक स्पेनचा नवा चेहरा मानले जात आहे.

**स्पेनचे वारसा हक्काचे नियम**

स्पेनमध्ये वारसा हक्काचा नियम थोडा वेगळा आहे, ज्याला पुरुष-प्राधान्य कॉग्नॅटिक प्राइमोजेनीचर म्हणतात. या नियमानुसार, जर राजाला मुलगा आणि मुलगी दोन्ही असतील, तर मुलगा लहान असला तरी तोच राजा बनतो. सुदैवाने, राजे फिलिप सहावे यांना दोन मुलीच आहेत (लिओनोर आणि सोफिया). लिओनोर ही मोठी मुलगी असल्याने ती वारस ठरली. जर तिला एखादा धाकटा भाऊ असता, तर लिओनोरचे वारसपद रद्द झाले असते. स्पेनमध्ये आता या नियमात बदल करण्याची मागणी होत आहे, जेणेकरून भविष्यात मुलगा असो वा मुलगी, जो ज्येष्ठ असेल तोच गादीवर बसेल (जसे ब्रिटनमध्ये २०१३ मध्ये करण्यात आले). प्रिन्सेस ऑफ अस्टुरियास: हे लिओनोरचे अधिकृत पद आहे, जे स्पेनच्या गादीच्या वारसाला दिले जाते (जसे ब्रिटनमध्ये प्रिन्स ऑफ वेल्स असते). जानेवारी २०२६ पर्यंत लिओनोरने नौदलाचे प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या दिशेने मोठी झेप घेतली असून, तिला समुद्र सफरीवरील युद्धनौकांचे नेतृत्व करण्याचे शिक्षण दिले जात आहे.

## थकल्यावर मेंदू झोन आऊट का होतो?



व्हा आपल्याला पुरेशी झोप मिळत नाही, तेव्हा मेंदू झोन आऊट (ध्यान न लागणे) का होतो, यामागचे कारण एका नवीन अभ्यासात समोर आले आहे. झोप न मिळाल्यास आपला मेंदू जागेपणीच झोपेत जाण्यासारखे वर्तन करू लागतो. नेचर न्यूरोसायन्स या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या या शोधामुळे झोपेच्या कमतरतेने होणारे शारीरिक आणि मानसिक परिणाम स्पष्ट झाले आहेत.


रात्रभर जागे राहिल्यानंतर (स्लीप डिप्रिव्हड) व्यक्तीच्या मेंदूतील स्कॅनमध्ये रक्ताचा प्रवाह (ब्लड फ्लो) आणि सेरेब्रोस्पायनल फ्लुईडचा (सीएसएफ) प्रवाह या संशोधनात तपासण्यात आला. सीएसएफ हा मेंदू आणि मणक्याभोवती (स्पायनल कॉर्ड) असलेला एक द्रव आहे, जो मेंदूची टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट (वेस्ट डिस्पोजल) लावणारी प्रणाली चालवतो. जेव्हा एखादी व्यक्ती थकव्यामुळे झोन आऊट होते, तेव्हा हा सीएसएफ मेंदूतून बाहेर फेकला जातो (फ्लशडआऊट). जेव्हा व्यक्ती पुन्हा सावध होते, तेव्हा हा द्रव मेंदूत परत येतो. संशोधकांना असे आढळले की, थकव्यामुळे लक्ष कमी होणे, सीएसएफचा प्रवाह, रक्तप्रवाह आणि डोळ्यांच्या बाहुलीचा आकार (पपिल साईज) यांमध्ये मोठे आणि एकाच वेळी बदल (इन टॅन्डम) होतात. या तिन्ही गोष्टींचा एकत्रित संबंध यापूर्वी अज्ञात होता.

थकलेल्या लोकांच्या मेंदूमधील पॅटर्न, विशेषतः मंद मेंदू लहरी (स्लो ब्रेन व्हेव्ह) आणि सीएसएफची मोठे स्पंदने (प्लस), नॉन-आरईएम झोपेच्या पहिल्या दोन टप्प्यांत (एन १ आणि एन २) आढळणाऱ्या पॅटर्नसारखे होते. थकलेला मेंदू जागेपणीच झोपेसारख्या अवस्थेत जात असल्याचे हे संकेत आहेत. लक्ष कमी होणे (लॅप्स इन अटेन्शन) म्हणजे झोपेच्या प्रक्रियेची सुरुवात होणे; परंतु पूर्ण झोप लागण्यापूर्वीच ती प्रक्रिया थांबवणे. संशोधकांचे म्हणणे आहे की, भविष्यात या बदलांमुळे विषारी मेटाबॉलिक टाकाऊ पदार्थांचे (टॉक्सिक मेटॅबॉलिक वेस्ट ) मेंदूतून उत्सर्जन कसे होते, याचा अभ्यास केला जाईल.

## इंग्लंडच्या पहिल्या राजाचा अनमोल खजिना सापडला

इंग्लंडच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारा एक अतिशय दुर्मीळ खजिना पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. नवव्या शतकातील सोन्याचा आणि मौल्यवान रत्नांचा वापर करून बनवलेला आल्फ्रेड ज्वेल हा ऐतिहासिक ठेवा संशोधकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. या दागिन्यावर चक्क आल्फ्रेडने मला बनवण्याची आज्ञा दिली असा मजकूर कोरलेला आहे. आल्फ्रेड द ग्रेट याला इंग्लंडचा पहिला रोजा मानले जाते. त्यानेच विखुरलेल्या ॲंग्लो-सॅक्सन राज्यांना एकत्र करून इंग्लंड या राष्ट्राचा पाया रचला. हा दागिना त्याच्याच काळातील असून, तो त्याच्या राजेशाही थाटाचे प्रतीक आहे. या दागिन्याच्या कडांवर जुन्या इंग्रजी भाषेत 'आल्फ्रेडने मला बनवण्याची आज्ञा दिली,' असे शब्द कोरलेले आहेत. हा दागिना सोन्याच्या तारेच्या नाजूक कामात गुंफलेला असून, त्यावर पारदर्शक रॉक क्रिस्टल (स्फटिक) बसवलेले आहे. या क्रिस्टलच्या खाली निळ्या आणि हिरव्या रंगात एका व्यक्तीची आकृती चित्रीत केलेली आहे.

संशोधकांच्या मते, हा केवळ शोभेचा दागिना नव्हता. हा ॲस्टेल नावाच्या एका दांडीचा भाग असावा, ज्याचा वापर राजे किंवा विद्वान लोक धार्मिक पुस्तके वाचताना ओळींवरून फिरवण्यासाठी करत असत. एका माहितीनुसार 'आल्फ्रेड द ग्रेट' या शिक्षणाला खूप महत्त्व दिले होते. त्याने अनेक लॅटिन ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर करवून घेतले आणि त्यासोबत असे मौल्यवान ॲस्टेल भेट म्हणून पाठवले होते. हा दागिना १६९३ मध्ये सॉमरसेट येथे सापडला होता, जे ठिकाण राजा आल्फ्रेड याच्या अथेलनी किल्ल्याजवळ होते. हा ऐतिहासिक खजिना सध्या ऑक्सफर्डमधील ॲशमोलियन म्युझियममध्ये जतन करून ठेवण्यात आला असून, तो मध्ययुगीन इंग्लंडच्या प्रगत कलाकुसरीचा उत्तम नमुना मानला जातो.



# श्री संत नामदेव महाराज संजीवन सोहळा उत्साहात साजरा

## मिरवणुकीस उत्स्फूर्त प्रतिसाद, काल्याच्या कीर्तनाने सांगता

नगर – नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्यावतीने सावेडी येथील शिंदे मळ्यातील श्री संत नामदेव महाराज मंदिरात संतश्रेष्ठ श्री संत नामदेव महाराज यांचा संजीवन सोहळा अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, मिरवणूक आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्यावतीने सावेडी येथील शिंदे मळ्यातील श्री संत नामदेव महाराज मंदिरात संतश्रेष्ठ श्री संत नामदेव महाराज यांचा संजीवन सोहळा अत्यंत भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्यावतीने सावेडी येथील शिंदे मळ्यातील श्री संत नामदेव महाराज मंदिरात संतश्रेष्ठ श्री संत नामदेव महाराज यांचा संजीवन सोहळा अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ह.भ.प. नवनाथ महाराज शास्त्री, अशोक वडे, अनिल वनारसे, कृष्णा भस्मे, सुरेश लोळगे, राजेंद्र बगाडे, संतोष बोडगे, दिलीप काकडे, शिरीष लिमकर, प्रमिला दुमाटे, हेमलता वडे, छाया लिमकर, निर्मला लोळगे, पूजा वडे आदी उपस्थित होते.

संजीवन सोहळ्याचे एक दिवस अगोदर दिंडी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषेत, टाळ-मृदंगाच्या गजरात सहभागी होऊन मिरवणुकीची शोभा वाढवली. रस्त्याच्या कडेला महिला आणि बालकांनी आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. काही ठिकाणी फुलांची उधळण करत, टाळ्यांच्या गजरात व भजन-गजर करत मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. संजीवन सोहळ्याचे दिवशी सावेडी येथील शिंदे मळ्यात सकाळी १० ते १२ या वेळेत मच्छिन्द्रनाथ देवस्थान भालगाव येथील ह.भ.प. नवनाथ महाराज शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन पार पडले.

यावेळी नामदेव शिंपी समाज ट्रस्टचे अध्यक्ष अशोक वडे म्हणाले, संत नामदेव महाराजांनी समाजासमोर एक सश्रद्ध, सश्रवण आणि समर्पित जीवन जगण्याचा आदर्श ठेवला आहे. त्यांच्या कृतीतून उमटणारा समतेचा संदेश म्हणजेच आजच्या युगासाठी दीपस्तंभ आहे. त्यांनी ट्रस्टच्या कार्यकारिणी सदस्यांचे आणि नागरिकांचे आभार मानले. समाजातील एकोप्याचा आणि सेवाभावाचा वारसा जपणे हीच संत नामदेवांना खरे अभिवादन असल्याचे त्यांनी नमूद केले.

ट्रस्टचे उपाध्यक्ष विजय काकडे म्हणाले, या संजीवन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ट्रस्टच्यावतीने मागील आठवड्याभरात विविध कीर्तनकारांची कीर्तनमालिका आयोजित करण्यात आली होती. यामध्ये हभप बाबासाहेब गोलांडे, हभप तुळशीराम लबडे, हभप कपिल महाराज माळवदे, हभप विठ्ठल महाराज वाघ, निवृत्ती महाराज नामदास, हभप वर्षाताई काळे, हभप ओंकार महाराज जोंजाळ आदींनी आपल्या प्रभावी विचारांद्वारे संतांच्या जीवनाचे विवेचन केले.

सचिव राजेंद्र बगाडे म्हणाले, या वर्षीच्या संजीवन सोहळ्यात समाज बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. हा संजीवन समाधी सोहळा केवळ श्रद्धा व्यक्त करण्याचा नव्हे, तर सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा एक संकल्प होता, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास ट्रस्टचे सहसचिव सुधीर नेवासकर, खजिनदार कृष्णा भस्मे, सदस्य श्रीकांत बुलबुले, विठ्ठल वनारसे, सुनील अवसरकर, अनिल वनारसे, जुगलकिशोर वायचळ, सुरेश लोळगे, दिलीप काकडे, राजू पाटकुले, महेश चौकटे, चंदन बारटक्के, प्रवीण पाटसकर, दिनेश चॉकटे, प्रमिला दुमाटे, अनिता वाधवने, अशोक होमकर, प्रमोद गोंदकर, गोविंद बारटक्के आदी उपस्थित होते.

कार्यक्रमास माजी महापौर बाबासाहेब वाकळे, अनिल बोरुडे, पुष्कर कुलकर्णी आदींदीन उपस्थिती लावून कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. असंख्य भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राजेंद्र बगाडे यांनी केले.

# सविता रमेश फिरोदिया प्रशालेचे १३ विद्यार्थी जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत चमकले

नगर – शिशु संगोपन संस्था संचालित सविता रमेश फिरोदिया प्रशालेने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता सातवी-२०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रशालेचे इयत्ता चौथीचे १० आणि इयत्ता सातवीचे ३ असे एकूण १३ विद्यार्थी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत झळकले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार प्रतिवर्षी प्रत्येकी ५ हजार रुपये शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे प्रशालेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

इयत्ता चौथीच्या गुणवत्ता यादीत दहीहंडे सम्राट गणेश याने २५२ गुण मिळवत सर्वाधिक गुणांची नोंद केली. चौधरी रुद्र प्रकाश आणि तोडकर तन्मय केदारेश्वर यांनी प्रत्येकी २५० गुण मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. सवाने वेदिका गणेश व गोंधळे दूर्वा संकेत यांनी प्रत्येकी २४२ गुण, पाटील जानश्री प्रकाश हिने २३८ गुण, चोभे पृथ्वीराज सचिन याने २३६ गुण, पवार प्रज्योत तुकाराम याने २२२ गुण, बोरकर दर्शन सुभाष याने २२० गुण, तर राऊत कार्तिकी सागर याने २१८ गुण मिळवत जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.

इयत्ता सातवीच्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतही प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली. शिंदे वेदिका विजय हिने २४४ गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. मौलवी तुबा फातिमा वसीम हिने २२२ गुण, तर शिंदे वेदिका रविंद्र हिने २१८ गुण मिळवून गुणवत्ता यादीत स्थान पटकावले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोठा वाटा असल्याचे प्रशालेच्या वतीने सांगण्यात आले. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची नियमित सराव चाचणी, अभ्यासातील अडचणींचे निराकरण, विषयानुरूप मार्गदर्शन आणि परीक्षेच्या दृष्टीने आवश्यक तयारी करून घेण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जात गुणवत्तापूर्ण कामगिरी केली.

या यशाबद्दल मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी, सौ. कार्ले मनिषा, श्रीमती पार्ले वैशाली, सौ. खराडे शिल्पा, सौ. कुलट रोहिणी, श्री. डोळस भाऊराव आणि सौ. हराळे जया या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेतील स्पर्धात्मक वातावरणात आपली गुणवत्ता सिद्ध केली.

गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, सेक्रेटरी र. धों. कासवा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजय मुनोत, सर्व विश्वस्त व संस्था पदाधिकारी यांनी अभिनंदन केले. मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, सेवक वृंद आणि पालकांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलला डिस्ट्रिक्टच्या सोहळ्यात १२ पुरस्कार

नगर – रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या २०२५-२६ या रोटरी वर्षातील अचिव्हर्स अवार्ड सेरेमनीमध्ये रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल क्लबला तब्बल १२ मानाचे पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले. लातूर येथे आयोजित या दिमाखदार पुरस्कार सोहळ्यात विविध सामाजिक, सेवाभावी आणि रोटरीच्या उपक्रमांमधील उल्लेखनीय कार्याची दखल घेत क्लबचा गौरव करण्यात आला.




लातूर येथे आयोजित अचिव्हर्स अवार्ड सेरेमनीमध्ये रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल क्लबला तब्बल १२ मानाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

हे पुरस्कार रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष रो. सुनील कटारिया आणि सचिव रो. अमर गुप्त यांच्या २०२५-२६ या कार्यकाळातील उत्कृष्ट कार्याची पावती मानली जात आहे. क्लबला प्राप्त झालेले १२ पुरस्कार बेस्ट बुलेटीन अवॉर्ड, टीआरएफ सेमिनार अवार्ड, बेस्ट ट्रस्ट मॅनेजमेंट अवॉर्ड, ब्लड डोनेशन कॅम्प अवॉर्ड, गर्ल्स एज्युकेशन अवॉर्ड, इंटरनॅशनल एक्सीलेंस अवॉर्ड, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सिटेशन अवॉर्ड, डीआरएफ बेस्ट अवेन्यू डायरेक्टर अवॉर्ड, रो. हरीश नय्यर, टीआरएफ एक्सीडेंट अवॉर्ड, आऊटस्टँडिंग प्रेसिडेंट ऑफ द डिस्ट्रिक्ट अवॉर्ड रो. सुनील कटारिया, वूमन इनपॉवरमेंट अवॉर्ड, स्पेशल ॲप्रिसिएशन अवार्ड फोर हाऊसिंग द टीआरएफ सेमिनारकिंडल २०२५-२६ असे पुरस्कार देवून क्लबचा गौरव करण्यात आला. या सर्व पुरस्कारांमुळे रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलच्या सेवाभावी कार्याला जिल्हास्तरावर विशेष मान्यता मिळाली आहे. क्लबच्या सर्व सभासदांनी, संचालकांनी, देणगीदारांनी आणि हितचिंतकांनी केलेल्या समर्पित कार्य, सातत्यपूर्ण योगदान आणि सेवाभावामुळेच हा गौरव प्राप्त झाला, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या शानदार पुरस्कार सोहळ्यास रो. सुनील कटारिया, क्लब फर्स्ट लेडी रो. सुजाता कटारिया, रो. अमर गुप्त, स्नेहा अमर गुप्त, रो. हरीश नय्यर, डॉ. प्रीती नय्यर, डिस्ट्रिक्ट ऑफिसर रो. प्रसन्न खाजगीवाले, क्लब ॲडव्हायझर रो. शिरीष रायते, वैशाली रायते, क्लब डव्हायझर व चार्टर मेंबर रो. डॉ.श्रीकृष्ण जोशी, वैजयंती जोशी, रो. प्रभाकर बोरा आणि सुरेखा बोरा उपस्थित होते.

या सोहळ्यास ११ महसूल जिल्ह्यातील १०४ रोटरी क्लबचे अध्यक्ष, सचिव, असिस्टंट गव्हर्नर, डिस्ट्रिक्ट ऑफिसर्स, पीडीजीस तसेच सुमारे ६०० रोटेरियन उपस्थित होते. रोटरीच्या सर्विस अबाउ सेल्फ या मूलमंत्राला अनुसरून समाजाच्या विविध क्षेत्रांत सेवा देत असताना क्लबने केलेल्या कार्याला मिळालेला हा गौरव म्हणजे सर्व सदस्यांसाठी प्रेरणादायी क्षण आहे. या पुरस्कारांमुळे आगामी काळात अधिक जोमाने सामाजिक उपक्रम राबवून क्रियेट लास्टिंग इम्पॅक्ट निर्माण करण्याचा संकल्प अधिक दृढ झाला आहे.

या भव्य पुरस्कार सोहळ्याचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल होस्ट डिस्ट्रिक्ट ३१३२ चे डीजी रो. सुधीर लातुरे, डिस्ट्रिक्ट फर्स्ट लेडी रो. संगीता लातुरे आणि डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या संपूर्ण टीमचे रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलतर्फे आभार मानण्यात आले.

# राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला मजबूत आणि दर्जेदार शेतरस्त्याचा हक्क : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

नगर – शेतकऱ्याला पावसाळा, उन्हाळा आणि हिवाळा अशा तिन्ही ऋतूंमध्ये शेतापर्यंत सहज पोहोचता यावे, यासाठी मजबूत, दर्जेदार आणि कायमस्वरूपी शेतरस्ते उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. याच मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने शेतकऱ्यांच्या हक्काचा लढा अधिक तीव्र केला आहे.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन चर्चा करताना शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे.

शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन शिव पाणंद व शेतरस्त्यांच्या मजबुतीकरणाबाबत महत्त्वपूर्ण निवेदन सादर केले. यावेळी शिव पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी आमदारांना भरघोस निधी उपलब्ध करून देण्याची सकारात्मक भूमिका पालकमंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली. या निधीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतरस्त्यांची कामे अधिक वेगाने, दर्जेदार आणि प्रभावी पद्धतीने पूर्ण करण्याचा मार्ग खुला होणार आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शिव पाणंद रस्त्यांच्या कामांमध्ये कोणत्याही जिल्ह्यावर किंवा भागावर अन्याय होता कामा नये. राज्यातील सर्व कामे सम न निकषांवर, समान गतीने आणि पूर्ण पारदर्शकतेने झाली पाहिजेत, अशी ठाम मागणी शरद पवळे यांनी केली.

शिव पाणंद रस्त्यांचा प्रश्न हा केवळ निधीचा नसून शेतकऱ्यांच्या हक्काचा, शेतीच्या विकासाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशासन, लोकप्रतिनिधी, संबंधित विभागांचे अधिकारी आणि शेतकरी प्रतिनिधी यांची विशेष समन्वय बैठक आयोजित करावी, अशी मागणी शरद पवळे यांनी केली. या बैठकीत शेतरस्त्यांच्या कामांचे नियोजन, प्राधान्यक्रम, उपलब्ध निधीचा योग्य वापर, कामांची गुणवत्ता आणि अंमलबजावणीतील अडचणी यावर ठोस निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालक व शिक्षकांचा समन्वय महत्त्वाचा

## ज्ञानदेव पांडुळे यांचे प्रतिपादन; रयतच्या एलबीपी विद्यालयात पालक-शिक्षक मेळावा

नगर – विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास केवळ शाळेपुरता मर्यादित नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी शाळा आणि पालक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद व समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांनी शिक्षकांशी नियमित संवाद साधून मुलांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक, मानसिक आणि भावनिक विकासाकडे लक्ष देण्याचे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांनी केले.



कापड बाजार येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयात आयोजित पालक-शिक्षक मेळाव्याप्रसंगी प्रतिमापूजन करताना मान्यवर.

कापड बाजार येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयात आयोजित पालक-शिक्षक मेळाव्यात अध्यक्षीय भाषणात पांडुळे बोलत होते. यावेळी माजी ऑडिटर विश्वासराव काळे, माजी नगरसेवक संजय घुले, माजी बॉक्सिंग चॅम्पियन शामराव व्यवहारे, विष्णुपंत म्हस्के, भाऊसाहेब कर्डिले, गटणे ताई, बेरड, माध्यमिक विभागाचे प्रभारी मुख्याध्यापक महादेव भद्रे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्यासह शाळेतील शिक्षक, पालक आणि पालक-शिक्षक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे पांडुळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालक आणि शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी पालकांनी वेळोवेळी शिक्षकांशी संवाद साधावा. मुलांच्या अडचणी समजून घेत त्यांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक करताना प्रभारी मुख्याध्यापक महादेव भद्रे यांनी शाळेत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची माहिती दिली. या मेळाव्यास पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शाळेतील शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची प्रगती, शिस्त, उपस्थिती तसेच विविध सहशालेय उपक्रमांबाबत शिक्षकांशी संवाद साधला. या सभेला महिला पालकांची संख्या लक्षणीय होती.

माजी ऑडिटर विश्वासराव काळे यांनीही पालकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे केवळ गुणांच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांच्या अंगभूत गुणांना आणि कौशल्यांना प्रोत्साहन द्यावे, असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी ओळखून त्यांना योग्य क्षेत्रात पुढे जाण्यासाठी पालक व शिक्षकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शालेय शिक्षक प्रदीप पालवे, सुनीता लांडगे आणि स्मिता पिसाळ यांनी विविध विषयांवर पालकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, नियमित उपस्थिती, अभ्यासातील सातत्य, शिस्त, मोबाईल व डिजिटल माध्यमांचा योग्य वापर, विद्यार्थ्यांच्या सवयी तसेच पालकांनी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी पालक-शिक्षक संघाचे सचिव एस.एम. गारुडकर, ज्येष्ठ शिक्षिका एस.एस. लांडगे, एम.एस.कारखिले यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.



युनिक्लिंगर कंपनी व अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेच्या कामगार करारनामाप्रसंगी कंपनीचे अधिकारी व कामगार संघटनेचे पदाधिकारी.

# युनिक्लिंगर कंपनी व अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेमध्ये ३ वर्षांचा कामगार करारनामा

नगर – अहिल्यानगर एमआयडीसी येथील युनिक्लिंगर कंपनी आणि अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटना यांच्यामध्ये कामगारांचा पुढील तीन वर्षांसाठीचा करारनामा खेळीमेळीच्या आणि सकारात्मक वातावरणात संपन्न झाला. कंपनी प्रशासन आणि कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर कामगार हिताचा हा करारनामा यशस्वीपणे पार पडला.

या करारनाम्यानुसार नवीन कामगारांना सुमारे साडेबारा हजार रुपयांची पगारवाढ, तर जुन्या कामगारांना सरासरी १६ हजार रुपयांची पगारवाढ मिळणार आहे. कंपनी प्रशासन आणि कामगार संघटनेमध्ये करारनाम्याची देवाणघेवाण करण्यात आली. कामगारांच्या हिताचा निर्णय झाल्याने कंपनीतील कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी युनिक्लिंगर कंपनीच्या सीईओ अर्चना गुंद्रे, अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे, एचआर हेड योगिता शेट्टी, जनरल मॅनेजर दिनेश देव, जीवन चाबुकस्वार, प्लांट मॅनेजर प्रदीप रकाटे, युनियनचे सदस्य दादासाहेब सुद्रिक, आदिनाथ शेवाळे आदींसह कंपनीतील कामगार उपस्थित होते.

यावेळी सीईओ अर्चना गुंद्रे म्हणाल्या की, कामगार हा देशाच्या जडणघडणीतील म हत्त्वाचा घटक असून कंपनीच्या प्रगतीमध्येही त्यांचा मोठा वाटा आहे. कंपनी प्रशासन नेहमीच कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्याचा प्रयत्न करते. त्याचबरोबर कामगार उत्पादन आणि गुणवत्तेकडे लक्ष देत असल्यामुळे कंपनीची प्रगती होत असते.

युनिक्लिंगर कंपनी आणि अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेमध्ये सकारात्मक चर्चा झाल्यानंतर कामगारांच्या हिताचा करारनामा करण्यात आला आहे. कामगार आणि कंपनी प्रशासन हे एकत्र असून, कामगारांच्या सुख-दुःखामध्ये कंपनी सहभागी आहे. आपण सर्वजण एकाच कुटुंबातील सदस्य असल्याची भावना ठेवून कंपनीला पुढे घेऊन जाण्यासाठी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटना ही कंपनी प्रशासन आणि कामगार यांच्यामधील दुवा म्हणून काम करत असून, कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. स्वर्गीय अरुणकाका जगताप यांनी नेहमीच सर्वसामान्य माणसांच्या प्रगतीसाठी आणि त्यांच्या कुटुंबांच्या हितासाठी काम केले. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे संतोष लांडे यांनी सांगितले.

# ८०० विद्यार्थ्यांनी घेतली शपथ; ५ हजार ५५५ रोपांचा महासंकल्प

## बजरंग विद्यालयातून हरितक्रांतीची हाक; शिवगामिनी फाउंडेशनच्या वृक्षसंवर्धन अभियानाला प्रतिसाद

नगर – आपल्या वॉटर बॅगमधील उरलेले पाणी झाडांना टाका. घरातील महत्त्वाच्या वस्तू जशा आपण जपतो, तशीच झाडांचीही काळजी घेतली पाहिजे. आज आपण झाडे जपली, तरच भविष्यात आपल्याला सावली मिळणार आहे, असा पर्यावरण संवर्धनाचा संदेश माजी नगरसेवक नितीन शेलार यांनी दिला.




सावेडी येथील जय बजरंग प्राथमिक विद्यालयात शिवगामिनी फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण करताना मान्यवर.

सावेडी येथील जय बजरंग प्राथमिक विद्यालयात शिवगामिनी फाउंडेशनच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ग्रीन सिटी अभियानांतर्गत सावलीदार वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यालयातील तब्बल ८०० विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी 'ग्रीन सिटीग्रीन आर्मी'ची शपथ घेत वृक्षरक्षणाचा निर्धार केला. यावेळी शेलार बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा वृक्ष देऊन आगळ्यावेगळ्या पद्धतीने सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात शिवगामिनी फाउंडेशनच्या अध्यक्षा ॲड. गायत्री गुंड पाटील यांनी फाउंडेशनच्या आगामी पर्यावरण अभियानाची माहिती देताना सांगितले की, क्रांती दिनाच्या निमित्ताने हरितक्रांती आणण्याचा फाउंडेशनचा मानस आहे. या उपक्रमांतर्गत शहरातील सहा शाळांमध्ये तब्बल ५ हजार ५५५ रोपांचे वितरण करण्यात येणार आहे. पुढील क्रांती दिनापर्यंत शहरातील सावलीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसेल, असा आमचा संकल्प आहे.या संकल्पामुळे वृक्षारोपणापासून वृक्षसंवर्धनाकडे जाणाऱ्या व्यापक अभियानाला नवी दिशा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांसह पालकांना लावलेल्या प्रत्येक रोपाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. प्रमुख अतिथी, शिक्षक, पालक आणि ८०० विद्यार्थ्यांना 'ग्रीन सिटीग्रीन आर्मी'ची शपथ देण्यात आली. वृक्षांचे संरक्षण, संवर्धन आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संकल्प यावेळी करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यालय परिसरात 'एक विद्यार्थी एक वृक्ष, एक जबाबदारी' हा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमास ॲड.महेश शिंदे, प्रा.डॉ.रमेश वाघमारे, ॲड. रजनी ताठे, मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर, शिवगामिनी फाउंडेशनच्या पालक महिला प्रतिनिधी म्हणून सौ.रमा भैरी, वैशाली शिंदे, वैशाली वारे, सुमन शेवाळे, वैशाली मिसाळ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड. पूजा बनकर, रोहित पुंडे, अभिजीत कांबळे, ॲड. दिनेश शिंदे आणि ॲड. आरती शिंदे यांनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले, तर ॲड. मेहूल गांधी यांनी आभार मानले.



आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये आयोजित इंडक्शन प्रोग्राम व फ्रेशर्स पार्टीप्रसंगी उपस्थित मान्यवर, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक.

# आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये इंडक्शन प्रोग्राम व फ्रेशर्स पार्टी उत्साहात

नगर – चास येथील साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्था संचलित सुंदराबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निक येथे प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार इंडक्शन प्रोग्राम व फ्रेशर्स पार्टीचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या गणेश वंदनेवरील मनमोहक नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढली. नव्याने प्रवेशित विद्यार्थी व पालकांचे महाविद्यालयाच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. रमेश गडाख यांनी इंडक्शन प्रोग्रामची संकल्पना, उद्देश व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील त्याचे महत्त्व स्पष्ट केले. आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये दरवर्षी शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी वार्षिक नियोजन करून त्याची काटेकोर अंमलबजावणी केली जाते. यामुळे महाविद्यालयाच्या निकालाचा आलेख सातत्याने उंचावत असून, चालू शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील शंभर टक्के प्रवेश पूर्ण करणाऱ्या पॉलिटेक्निकमध्ये महाविद्यालयाचा समावेश झाला आहे. अत्याधुनिक शिक्षणपद्धतीचा अवलंब करताना स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, शैक्षणिक सॉफ्टवेअर व व्हर्च्युअल लॅब यांचा वापर केला जात असल्याचे प्राचार्य डॉ. गडाख यांनी सांगितले. शासकीय तंत्रनिकेतनचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. दादासाहेब करंजुले यांनी विद्यार्थ्यांना दृष्टिकोन, वर्तन, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, ध्येय निश्चिती आणि वेळेचे नियोजन याबाबत मार्गदर्शन केले.

शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. अजय आगरकर यांनी आडसूळ पॉलिटेक्निकच्या शैक्षणिक गुणवत्तेचे व उत्कृष्ट निकालाच्या परंपरेचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त, शैक्षणिक शिस्त आणि सामाजिक शिस्त या त्रिसूत्रीचा अवलंब करून औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करावीत आणि यशस्वी अभियंता बनावे, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेच्या सचिव डॉ. लीना आडसूळ यांनी विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत माहिती देताना संपूर्ण परिसर सीसीटीव्ही निगराणीखाली असून महिला बाउन्सर्सच्या माध्यमातून सुरक्षा व्यवस्था राबविण्यात येत असल्याचे सांगितले. विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र तक्रार निवारण कक्षही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांनी विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वसतिगृह व भोजन व्यवस्थेची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्यासाठी संस्था संशोधनाचा संपूर्ण खर्च करण्यास तयार असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमास संस्थेच्या सचिव लीना आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, सदस्या डॉ. कल्पना आडसूळ, रत्ना आडसूळ, पायल आडसूळ, आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य डॉ. पी. एम. पाटील, प्राचार्य डॉ. संभाजी पठारे, विद्युत अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख पवळे एस. एस., यंत्र अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख जाधव एम. बी., इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विभागप्रमुख दरंदले जे. पी., संगणक विभाग प्रमुख होले पी. ए., स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख म्हस्के एस. के. सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## हिताचिया गोष्टी सांगू एकमेका

"मुसाफिर"

संकलन: दिशान फिचर्स




सोनाराला अटक केली. विषारी सापापेक्षाही माणूस अधिक विखारी । भुतां परस्परे पडो मैत्र जीवांचे । हे ज्ञानदेवाचे पसायदान प्रसिद्ध आहे. लोककल्याणाच्या तळमळीनं तसाच विचार नामदेवांनी आपल्या एका अभंगात मांडला आहे. नामदेव म्हणतात, दुर्लभ नरदेह झाला तुम्हा आम्हा । येथे साधू प्रेमा राघोबाचा अवघे हातोहाती तरा भवसिंधू । आवडी गोविंदु, गाउं गीती । हिताचिया गोष्टी सांगू एकमेकां । शोक, मोह, दुःखा निरसूं तेणे ।। एकमेकां करूं सदा सावधान । नासी, अनुसंधान तुटों नेदु । घेउ सर्वभावे रामनाम दीक्षा । विश्वासे सकलिकां हेचि सांगो। रामा म्हणे शरण रिघों पंढरीनाथा । नुपेक्षी सर्वथा दीनबंधु ।।

आपल्या बांधवांना नामदेवांनी केलेला हितोपदेश लाखमोलाचा आहे. ते सांगतात. बंधुनो। अनेक जन्मांच्या पुण्याहून हा मनुष्यजन्म तुम्हा. आम्हाला लाभला आहे. तेव्हा या जन्मातच आपण श्रीरामाची कृपा मिळवू या. एकमेकांच्या मदतीनं ही संसाररुपी समुद्र आपण तरुन जाउ मोठ्या प्रेमानं गोविंदाचा महिमा आपण भजनांतून गाउ. गीतगायन करताना आणि आयुष्याची वाटचाल करताना आपण परस्परांना हिताच्या गोष्टी सांगू. असं केलं म्हणजे आपली दुःख, मोह आणि अडचणी या सगळ्या गोष्टीचं निराकरण होईल.

संकटापासून आपण एकमेकांना सावध करु. या पण ते करताना विठ्ठल नामाच्या ठिकाणी आपलं जे लक्ष असेल, ते ढळू नये. रामनामाचं व्रत आपण. भक्तिभावानं घेउ. इतर सर्व लोकांनाही नामस्मरणाची दीक्षा आपण देउ. या पंढरीच्या पांडुरंगाला आपण शरण जाउ या तो दीनांचा बंधु आहे. तो आपली उपेक्षा करणार नाही. त्याची कृपा आपल्याला लाभेलच.

विठ्ठलाच्या चरणी एकरुप व्हावं, अशी नामदेवांची शिकवण आहे. अमृताहूनी गोड अशा विठ्ठलनामाचा उपदेश त्यांनी केला. तो उपदेश करता करता ते स्वत:च अमृतमय झाले. लोकहिताची देखवे डोळा । म्हणवूनी कळवळा आम्हालागी।। असे तुकोबांच्याही मनातले आर्त आहे. एकमेकां करु सदा सावधान हे नामदेवांचे मनोगत त्याच तोलामोलाचे आहे.

– किशोर गांधी

# शासकीय, निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी २२ ऑगस्ट रोजी कायदेविषयक मार्गदर्शन

नगर – महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी, कर्मचारी मध्यवर्ती संघटनेतर्फे सेवानिवृत्त अधिकारी कर्मचार्यांसाठी 'दिलासा' उपक्रम अहिल्यानगर येथे प्रायोगिक तत्वावर करण्यात येत आहे. या संघटनेचे राज्यातील सदस्य व संघटनेबाहेरील इतर नागरिकांनी याबाबत उत्कृष्ट प्रतिसाद दिला आहे. याचा विचार करून नगर जिल्ह्यातील सदस्य व इतरांसाठी ॲलड. प्रवीण भांगे व त्यांचे दोन सहकारी वकील यांच्या सहकार्याने २२ ऑगस्ट रोजी 'दिलासा' उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सेवानिवृत्तीनंतर अनेक अधिकारी, कर्मचार्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. दैनंदिन जीवन जगताना त्यांना अनेक समस्या, तसेच काही कायदेविषयक प्रश्न असतात. कित्येकांचे फ्लॅट, प्लॉट, शेतजमीन, वारसा हक्क, मृत्यूपत्र, कौटुंबिक कलह यांसह इतर मालमत्तेविषयक प्रश्न असतात. अनेक सामाजिक प्रश्नही असतात. या सर्व बाबतीत त्यांना योग्य ते कायदेशीर मार्गदर्शन मिळावे, यासाठी हा 'दिलासा' उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

'दिलासा' उपक्रमाचा पहिला उपक्रम येथील सावेडी भागातील पाईपलाईन रस्त्यावरील रेणावीकर कॉलनी येथील पेट्रोलपंपासमोर असलेल्या श्रीकृष्ण हॉलमध्ये सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार आहे. यासाठी कृतिशील संघटना सभासद व पती/पत्नीसाठी प्रत्येकी ५०० रुपये शुल्क आणि सभासदांव्यतिरिक्त नागरिकांसाठी १ हजार रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे, अशी माहिती देण्यात आली.

नोंदणी केलेल्या व्यक्ती समक्ष येऊन 'दिलासा' उपक्रम केंद्रातील कायदेविषयक तज्ज्ञ व्यक्तींशी चर्चा करतील व त्यांना अपेक्षित योग्य मार्गदर्शन मिळवू शकतील. या उपक्रमात जास्तीत जास्त सभासद व नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संघटनेचे पदाधिकारी सर्वश्री चंद्रकांत दळवी, दिलीप थिटे, नागनाथ बोल्ली, अभियंता व्यंकटराव गायकवाड, अभियंता मनोहर पोकळे, अभियंता रामदास साळी आदिंसह इतरांनी केले आहे.

# साळवे कुटुंबावरील खोटा गुन्हा 'ब फायनल' करण्याची मागणी

## जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाचे निवेदन



साळवे कुटुंबावरील खोटा गुन्हा 'ब फायनल' करण्याची मागणी करणारे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षकांना देताना रिपब्लिकन पक्षाचे शिष्टमंडळ.

नगर – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांच्या कुटुंबावर झालेल्या हल्ल्याच्या प्रकरणात त्यांच्या कुटुंबीयांना अद्यापही टोळीतील आरोपींकडून जीवितास धोका असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच साळवे कुटुंबाविरुद्ध दाखल करण्यात आलेला कथित खोटा गुन्हा 'ब फायनल' करून जखमी कुटुंबीय व साक्षीदारांना तातडीने पोलीस संरक्षण देण्यात यावे आणि गुन्ह्यातील काही फरार आरोपींना तात्कळ अटक करण्याची मागणी रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे, शहराध्यक्ष किरण दाभाडे, सतीश मगर, अविनाश भोसले, उत्कर्ष भालेराव, शुभम गायकवाड, राजेंद्र मगर, आदेश साळवे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात करण्यात आलेल्या आरोपानुसार, २४ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री सुमारे ११ वाजता टोळीतील काही व्यक्तींनी सुनिल साळवे यांच्या कुटुंबातील यशदीप संपत साळवे व आदर्श साळवे यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून, यशदीप साळवे यांचा एक डोळा निकामी झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

या घटनेनंतर साळवे कुटुंब दहशतीच्या वातावरणात असल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, साळवे कुटुंबीयांवर गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपी व त्यांच्या नातेवाईकांकडून दबाव टाकला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. गुन्हा मागे न घेतल्यास खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देण्यात आल्याची तक्रार यापूर्वीच पोलिसांकडे करण्यात आल्याचे शिष्टमंडळाने सांगितले.

या पार्श्वभूमीवर साळवे कुटुंबावर दाखल करण्यात आलेल्या कथित खोट्या गुन्ह्याची निष्पक्ष चौकशी करून तो 'ब फायनल' करण्यात यावा, हल्ल्यातील जखमी व साक्षीदारांना तातडीने पोलीस संरक्षण द्यावे, तसेच साळवे कुटुंबाच्या जीवितास असलेला धोका लक्षात घेऊन आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था कायम ठेवावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

# 'मानवता' च्या वतीने युवक-युवतींना नशा मुक्तीचा संदेश

## राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा सन्मान



मानवता हाच एक धर्म सामाजिक संस्था व नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या माध्यमातून युवक-युवतींना नशा मुक्तीचा संदेश देत राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा सन्मान करताना अल्ताफ सय्यद.

नगर – मानवता हाच एक धर्म सामाजिक संस्था व नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या माध्यमातून युवक-युवतींना सकारात्मक दिशा देत नशेपासून दूर राहण्याचा आणि आरोग्य-क्रीडा क्षेत्रात आपले करिअर घडविण्याचा संदेश देण्यात आला. तर राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन उत्कृष्ट यश संपादन केलेल्या खेळाडूंचा सन्मान मानवता हाच एक धर्म संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांच्या हस्ते करण्यात आला.

अल्ताफ सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली युवकांमध्ये आरोग्य, क्रीडा आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच सकारात्मक विचारांना बळ देणाऱ्या नेक्स्ट लेव्हल फिटनेस जिममध्ये युवक-युवतींना केवळ व्यायामाची सुविधा नाही, तर क्रीडा क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या जिममध्ये प्रशिक्षण घेतलेल्या अनेक युवकांनी नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे संस्थापक डेव्हिड मकासारे यांनी युवक-युवतींना प्रेरणादायी संदेश देताना सांगितले की, तरुणाईमध्ये प्रचंड ऊर्जा आणि क्षमता आहे. या ऊर्जेला योग्य दिशा दिली, तर प्रत्येक युवक आपल्या आयुष्यात मोठे यश मिळवू शकतो. मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या जोरावर राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करण्याचे त्यांनी आवाहन केले.

अल्ताफ सय्यद यांनी युवक-युवतींना नशेच्या आहारी न जाण्याचे आवाहन केले. ड्रग्ज, एमडीसारख्या अमली पदार्थांच्या आहारी जाऊन आपले आयुष्य उद्धवस्त करू नका. नशा तुमचे आरोग्य, करिअर आणि कुटुंबाचे भविष्य हिरावून घेऊ शकते. त्याऐवजी व्यायाम करा, खेळा आणि आपल्या ध्येयासाठी दिवस-रात्र मेहनत करा, असा संदेश त्यांनी दिला. युवक ही देशाची ताकद आहे. तुमच्या हातात नशेची पुडी नव्हे, तर यशाची ट्रॉफी दिसली पाहिजे. शरीर निरोगी असेल, मन सकारात्मक असेल आणि ध्येय निश्चित असेल तर यशाची शिखरे गाठणे निश्चित शक्य असल्याचे सांगितले.

# अभिराज सानप यांची इंडो-नेपाळ आंतरराष्ट्रीय एरोस्केटोबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड



नगर – अहिल्यानगर जिल्हा एरोस्केटोबॉल संघटनेचा होतकरू व गुणवंत खेळाडू अभिराज श्रीकृष्ण सानप यांची इंडो-नेपाळ आंतरराष्ट्रीय एरोस्केटोबॉल स्पर्धा २०२६ साठी भारतीय संघात निवड झाली आहे. ही प्रतिष्ठित स्पर्धा १९ ते २१ ऑगस्ट या कालावधीत पोखरा, नेपाळ येथे आयोजित करण्यात आली आहे.

अभिराज सध्या डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आकुर्डी, पुणे येथे सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेच्या बी.टेक. अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहे. तो टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमी, जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे नियमित सराव करत आहे.

अभिराजने आपल्या क्रीडा कारकिर्दीत उल्लेखनीय कामगिरी करत वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर नोंदविला असून, यापूर्वीही भारताचे विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व करून देशाचा गौरव वाढविला आहे. भारतीय संघातील ही नव्याने झालेली निवड त्याच्या अथक परिश्रम, शिस्तबद्ध सराव, समर्पण आणि जिद्दीची आणखी एक गौरवास्पद पावती आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्राचार्या डॉ. पी. मालथी, विभागप्रमुख डॉ. अशोक मोरे, क्रीडा संचालक डॉ. आबाजी माने, अहिल्यानगरचे नगरसेवक गणेश भोसले, टीम टॉपर्स स्केटिंग अक्ॅडमीचे अध्यक्ष संजय नन्नवरे, तसेच एरोस्केटोबॉल फेडरेशनचे संस्थापक व एरोस्केटोबॉल या खेळाचे जनक चेतन पगवाड यांनी अभिराजचे अभिनंदन करून त्याला आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. अभिराजच्या या यशामागे त्याचे प्रशिक्षक प्रशांत पाटोळे व प्रदीप पाटोळे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.



केडगावच्या ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी काढलेली तिरंगा रॅली.

# ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी केडगाव परिसरातून काढली तिरंगा रॅली

नगर – महापालिकेच्या केडगाव येथील प्रथम आय.एस.ओ.मानांकन प्राप्त ओंकारनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा अभियानातर्गत केडगाव परिसरातून हातात तिरंगे घेत तिरंगा रॅली काढली. भारत माता की जय,वंदे मातरम् अशा घोषणा देत व देशभक्तीपर गीतांच्या जयघोषात ओंकारनगर, सचिननगर, शाहूनगर परिसरातून विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात तिरंगा रॅली काढली.या तिरंगा रॅलीने परिसरातील सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

सर्व भारतीयांच्या मनामध्ये भारतीय तिरंग्याविषयी अधिक अभिमान जागृत व्हावा. सर्वांच्या मनामध्ये भारतीय तिरंग्याविषयी जवळीक निर्माण व्हावी. तसेच सर्वांनी हर घर तिरंगा अभियानात सहभागी व्हावे यासाठी ओंकारनगर शाळेच्या विद्यार्थ्यांनी परिसरातून तिरंगा रॅली काढली आहे,असे मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी म्हणाले.यावेळी शाळेची विद्यार्थीनी आराध्या भुजबळ हिने आपला भारत या विषयावर शाहूनगर बसस्थानक येथे अतिशय सुंदर वक्तृत्व केले.याठिकाणाहून जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांनी आवर्जून थांबून या विद्यार्थीनीचे भाषण ऐकले व तिचे कौतुक केले. या तिरंगा रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा पल्लवी भुजबळ, उपाध्यक्षा दुर्गा घेवारे, सदस्य दिपाली साळवे,आसिया मोमीन यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## स्वातंत्र्यदिनी त्यांना विशेष मानवंदना...

# सिमा रक्षणासह जीवनात संघर्ष झेलणारे अनाम वीर...

दरवर्षी प्रमाणे देशाच्या स्वातंत्र्याचा दिवस आला. स्वातंत्र्याचा अर्थ समजून घेणाऱ्यांना आपणा सार्वांना, नव्या पिढीला स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभकामना.

आजच्या शुभदिनी झेंडावंदन, स्वातंत्र्य सैनिक, देशभक्तीपर गीतांनी आपण त्यांना मानवंदना देतो. इतर धकाधक व धावपळीच्या दिवसांत आपल्याला या सर्वांची फारशी जाणीव राहात नसते.

आपल्याला स्वातंत्र्यासाठी व घरात, सिमेवर लढणाऱ्या ज्ञात अज्ञात सैनिकांची कितीशी माहिती असते? त्यातही संग्राम करताना अपंगत्त्व प्राप्त झालेल्या अनाम शूरवीरांची तर आपल्याला कल्पनाच नसते.

सुदैवाने माझे एक आवडते लेखक, कथाकथनकार स्व. व.पू. काळे यांच्या सुकन्या स्वाती चांदोरकर यांचे 'अथक' हे विशेष सैनिकांच्या जीवनावरील पुस्तक वाचणणत आले आणि त्या सैनिकांचे नवजीवन पाहून जीवनाच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचे व जीवंतपणाची जाणीव झाली.

लेखिका खडकी येथील 'पॅराप्लेजिक रिहॅबिलीटेशन सेंटरमध्ये' गेल्या होत्या तिथे अपंगत्व आलेल्या सैनिकांना नवजीवन देणाऱ्या कर्नल डॉक्टर रतन मुखर्जी यांचे हे सेंटर व परिसर पाहून त्या थक्क झाल्या व त्यांची कहाणी या पुस्तकातून मांडली.

तसं पाहिलं तर नगरवासीय भुईकोट किल्ला आणि सैनिक तळ, रणगाडा संग्रहालय इत्यादीमुळे या पुण्यक्षेत्राला अगदीच सपरिचित नाही तरीपण आपण सामान्य माणसं सैनिकांबद्दल कितीसे जाणून असतो? त्यातही अशा वेगळ्या शूरवीरांबद्दल आपण जवळपास अनभिज्ञच असतो.

देशाचे रक्षण करताना, काही अपघाताने, काही गोळी लागून अपंगत्व आलेल्या सैनिकांची माहिती या



पुस्तकात मिळते. अपंगत्व आले व सेवेतून निवृत्त व्हावं लागलं तरी जीवनाच्या शर्यतीतून हे मुळीच मागे हटलेले नाहीत. ते कृतीतून दाखवतात आम्ही हरलो नाहीत. आमची कीव काय करता? आम्ही आजही कार्यरत आहोत. तसं पाहिलं तर आपलं जीवन स्वतःच्याच कोशात आणि चौकटीत असतं. स्वतःच्या जगापलीकडच्या विश्वाचा, तेथील व्यथा वेदनांचा आपल्याला थांगपत्ता नसतो. बथ्थड राजकारण, लादल्या गेलेल्या बातम्या, सिरीज, संवेदना हरवलेले समाजकारण याच्याही पलीकडे प्रेरणा, आनंद देणारे जीवन असते. अशात तेज:पुंज पण आदर्शवत जीवनाचे प्रेरणा ठरतात हे सैनिक.

जखमी, विकलांग झाले तरी अत्यंत उमेदीने शिस्तीने ते जीवन जगत असतात. ज्याच्या सहसा तून देशभक्तीचा सुगंध देशभर दरवळतो तोच वीर जवान अर्धमृत, घायाळ, विकलांग, दिव्यांग होऊन घरी आला की समाजाचे त्याकडे काहीसे दुर्लक्ष होते. खरंतर त्यांच्या जीवांवरच आपण घरी शांत व सुखमग्न झोपत असतो. त्यांच्या एकाकी, मानसिक पोकळीच्या दिवसांत त्यांना अधिक पाठिंब्यासह प्रोत्साहनाची व त्यांच्याकडून मुलांना अनुभवांची शिदोरी देणे अत्यंत महत्त्वाचे ठरेल. सैनिकी शिस्त व कठोर नियमांचे पालन त्यांच्या रक्तातच भिनलेले असल्याने भल्या पहाटे उठून कवायत, व्यायाम ते नियमित करतात तेही ठरलेल्या वेळेत ठरलेल्या ठिकाणी त्यासाठी व्हीलचेअर वरून करायचे तरी!

'हॉलिडे' चित्रपट पाहिलाय? आठवतोय? त्यात अक्षय कुमार अशाच विकलांग सैनिकांची मदत घेतो. खेळ असो, चित्र काढणे असो वर्कशॉप असो वा एखादा नवीन जॉब, छंद असो ते तितक्याच समर्पित भावनेने करतात. या सैनिकांचे कमरेखाली सारं शरीर पंगू झाले तरी उत्कृष्ट बॅडमिंटन खेळणारे, बास्केटबॉल सारखे सांघिकतेने खेळणारी आहेत. हातपाय विकलांग झालेला एक नायक चक्क तोंडात ब्रश धरून चित्र काढणारा 'माऊथ पेंटर' आहे तर हळव्या भावना शब्दांतून व्यक्त करणारा कवीमनाचा सैनिकही आहे. ही दुनिया जाणून घेतली पाहिजे. स्वातंत्र्यदिनी अशा माहितीत असलेल्या शूर 'अनाम'वीरांना मानवंदना देता आली तर त्यापेक्षा या दिनाचे साजरे करणे काय? पुनश्च एकवार अशा सर्व शूरवीरांना मानाचा मुजरा. स्वातंत्र्य दिन चिरायू होवो...!

– **किशोर गांधी** (दिशान फीचर्स)



महात्मा फुले वसतिगृहात मिठाई वाटप करताना शैलेश मुनोत, सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, आबासाहेब काळे, सुनील झिरपे आदी.

# आर्किटेक्ट, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी तांदळे; उपाध्यक्षपदी औटी तर सचिवपदी पांडव

नगर – आर्किटेक्ट इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन अहिल्यानगर या शहरातील नामांकित संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि कार्यकारिणीची निवडणूक प्रक्रिया नुकतीच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी इंजिनिअर प्रदीप तांदळे यांची अध्यक्षपदी, तर इंजिनिअर सुनील औटी यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



आर्किटेक्ट इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा संघटनेच्या बैठकीत सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

संचालक पदासाठी झालेल्या निवडणुकीत संतोष खांडेकर, अनमोल जैन, सुनील जाधव, सचिन डागा, संकेत पादिर, गौरव मांडगे, अमोल येनगंदुल, आदिनाथ आंबेकर, सागर ढगे, अमेय कुलकर्णी आणि विजय उजनीमठ यांची निवड झाली. भूषण पांडव आणि अन्वर शेख यांची स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आल्याचे नूतन अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी जाहीर केले.





त्यानंतर संचालक मंडळाच्या झालेल्या पहिल्या बैठकीत भूषण पांडव यांची सचिवपदी, संतोष खांडेकर यांची खजिनदारपदी, तर अनमोल जैन यांची सहसचिवपदी निवड करण्यात आली. रत्नाकर कुलकर्णी यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. निवडणूक प्रक्रियेत संस्थेच्या एकूण २६९ सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण ५०.२९ टक्के मतदान झाले असून, निवडणूक प्रक्रियेला सभासदांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

मागील वर्षीचे अध्यक्ष अभिजीत देवी यांनी वर्षभरात संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. संस्था सभासदांच्या हिताचे विविध निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यामध्ये एसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड, पोलाद स्टील प्रायोजित नॉलेज सिरीज, ग्रुप सिरीज अंतर्गत वर्षभर तांत्रिक सेमिनार, फॅमिली गेट–टुगेदर तसेच सभासद व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमांना सभासदांनी उत्तम प्रतिसाद दिल्याचे त्यांनी सांगितले.

शासकीय विभागांमध्ये काम करताना सभासदांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी संस्थेने प्राधान्याने काम केले. तसेच एसा भवनच्या निर्माणकार्यासाठी वर्षभरात विविध उपक्रमांच्या माध्यमातून २५ लाख रुपये जमा करून देण्यात आल्याची माहिती अभिजीत देवी यांनी दिली. वर्षभर सहकार्य करणारे संचालक, कमिटी अध्यक्ष व सदस्य, ग्रुप सिरीज तसेच विविध उपक्रमांचे प्रायोजक आणि सभासद यांचे त्यांनी आभार मानले.

नूतन अध्यक्ष तांदळे यांनी आगामी वर्षात एसा भवनचे काम पूर्ण करून संस्थेचे विविध उपक्रम तेथे घेण्यास प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. शासकीय विभागांमध्ये सभासदांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी कमिटीच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. ५४६ सभासद संख्या असलेल्या आणि आपल्या कार्याच्या ४०व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या संस्थेचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळणे ही सन्मानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

वर्षभर सभासद हिताचे निर्णय घेण्यास प्राधान्य देणार असून, विविध समित्यांची नियुक्ती करून जास्तीत जास्त सभासदांना त्यामध्ये सहभागी करून घेत संस्था हिताचे निर्णय घेतले जातील. सर्व उपक्रमांना सभासदांनी वर्षभर उपस्थिती व पाठबळ देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

वार्षिक सर्वसाधारण सभेत इंजिनिअर प्रकाश जैन, आर्की. मिनल काळे आणि आर्की. किरण कांकरिया यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी प्रकाश जैन, अशोक मवाळ, संजय पवार, विजय पादिर, अजित माने आणि इक्बाल सय्यद यांनी मार्गदर्शन केले.

सभेसाठी संजय चांडवले, आदिनाथ दहिफळे, जितेश सचदेव, अविनाश कुलकर्णी, रविंद्र मुळे, प्रशांत आढाव, रविंद्र खर्डे, अजय दगडे, अजय किर्तानी, सुरेंद्र धर्माधिकारी, वैभव फिरोदिया, अनिल धोकरीया, मकरंद देशपांडे, नितीन ठानेकर, अशोक भोसले, विकार काझी, एकनाथ जोशी, सुनील हळगावकर, यश शहा, साजिद शेख, आशिष कापसे, रमेश बोऱ्हूडे यांच्यासह संस्थेचे सभासद उपस्थित होते.

# जय आनंद महावीर मंडळातर्फे बाबावाडी व महात्मा फुले वसतिगृहात मिठाई वाटप

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषी महाराज यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने बाबावाडी व महात्मा फुले वसतिगृह येथील वंचित मुलांना मिठाई वाटप करण्यात आले. आचार्यश्रींनी कायम मानवसेवेची, दिनदुबळ्यांची सेवा करण्याची शिकवण दिली. त्यानुसार मंडळाने बाबावाडी व महात्मा फुले वसतिगृहात मिठाई वाटप करून आचार्यश्रींचा जन्मोत्सव साजरा केला.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, आबासाहेब काळे, सुनील झिरपे, बाबावाडीच्या शिक्षिका कांबळे, वसतिगृहाचे गणेश कोरडे उपस्थित होते.

शैलेश मुनोत म्हणाले, आचार्य आनंदऋषीजी महाराज देशभरातील भाविकांचे श्रध्दास्थान आहेत. अहिल्यानगर ही त्यांची जन्मभूमी तसेच कर्मभूमी आहे. त्यांच्या पावन पदस्पर्श लाभलेल्या या भूमीत समाजकार्याची मोठी परंपरा आहे. त्यांच्याच शिकवणीनुसार मंडळ कार्यरत असून यावर्षी मंडळ रौप्य महोत्सव साजरा करत आहे. यावर्षी नगरमध्ये उपाध्यायश्री पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांचा समर्पण चातुर्मास साजरा होत आहे. त्यामुळे आचार्यश्रींच्या भक्तांमध्ये मोठा उत्साह आहे. आचार्यश्रींचे आशीर्वाद व त्यांनी दिलेली शिकवण कायम दिशादर्शक आहे.

आनंद मुथा म्हणाले, मंडळाच्या सर्व सदस्यांची आचार्यश्रींवर नितांत श्रध्दा आहे. त्यांचा जन्मोत्सव वंचित मुलांसमवेत साजरा करताना विशेष आनंद होत आहे. आचार्यश्रींच्या स्मृतीदिनी २८ मार्चला मंडळातर्फे दरवर्षी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करत असते. हजारो भाविक या महाप्रसादाचा लाभ घेतात.

# गुलमोहर फाऊंडेशनतर्फे गुणी विद्यार्थी व माजी विद्यार्थीनींचा सन्मान

नगर – मोहंमदिया एज्युकेशन सोसायटी संचलित मौलाना आझाद उर्दू मुलींचे हायस्कुल मुकुंदनगर येथील विद्यार्थिनी खान तरन्नुम अबुबकर–गोल्ड मेडलिस्ट (एम.एस्सी.) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ–प्राध्यापिका, राधाबाई काळे महिला महाविद्यालय तसेच खान सना आरीफ (नेट/सेट उत्तीर्ण) प्राध्यापिका–राधाबाई काळे महिला महाविद्यालय या दोघींचा संस्थेच्या वतीने स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



गुलमोहर फाऊंडेशन तर्फे गुणी विद्यार्थी व माजी विद्यार्थीनींचा सन्मान करताना संस्थेचे पदाधिकारी.

मौलाना आझाद उर्दू मुलींचे हायस्कुल मुकुंदनगर मार्च २०२६ पुणे एसएससी बोर्डचे प्रथम शेख निदा नवेद, व्दितीय शेख मरीयम, तृतीय शेख जैनब वसीम तसेच आयडीयल विद्यार्थीनी बागवान ताहा या चौघींचा गुलमोहर फाऊंडेशनचे अध्यक्ष आय.एम. खान तर्फे रोख बक्षीस व संस्थेच्या वतीने स्मृतीचिन्ह देण्यात आले.तसेच मदर तेरेसा उर्दू ज्युनिअर कॉलेज मार्च २०२६ एचएससी बोर्ड पुणेचे गुणी विद्यार्थिनी प्रथम–शेख रुखसार आसिफ, व्दितीय–शेख शैजीन जमील व तृतीय–शेख अलीजा शकील व आयडीयल विद्यार्थिनी खान शमा अतीक यांचे गुलमोहर फाऊंडेशनचे अध्यक्ष आय.एम. खान यांच्यातर्फे रोख बक्षिसे व संस्थेच्या वतीने स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.शेख अब्दुस सलाम अब्दुल अजीज होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शेख अब्दुल अजीज अब्दुल रहेमान– अध्यक्ष मोहंमदिया एज्युकेशन सोसायटी, अलाउद्दीन सर, सलीम खान, शेख लाल, फरीदा भाभी, मुख्याध्यापिका फरहाना बाजी, मुख्याध्यापक नौशाद सय्यद, अब्दुल हसीब शेख, यास्मिन बाजी, शिक्षक वर्ग, विद्यार्थिनी उपस्थित होते. अब्दुल हसीब शेख यांनी आभार मानले.

# भगवान श्रीगोपालकृष्ण मूर्ती प्रतिष्ठापना आणि गोकुळाष्टमी सप्ताहाचे आयोजन

नगर – श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज उपासना संस्थान, चिंतामणी उपासना केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने भगवान श्रीगोपालकृष्ण मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा तसेच श्री गोकुळाष्टमी सप्ताह ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

३० ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते १०.३० या वेळेत श्रीमद्भगवद्गीतेवरील प्रवचन होणार असून, सकाळी १०.३० ते १ या वेळेत भगवान श्रीगोपालकृष्णांची शोभायात्रा व नगरप्रदक्षिणा चिंतामणी उपासना केंद्रातून काढण्यात येणार आहे. ३१ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर दरम्यान पुढील सर्व कार्यक्रम थोरले श्रीराम मंदिर, नेप्ती येथे होणार आहेत. दररोज सकाळी ७.३० ते ९ या वेळेत श्रीमद्भगवद्गीता प्रवचन, तर सायंकाळी ५ ते ७ या वेळेत श्रीएकनाथी भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. सप्ताहभर २४ तास अखंड पहारा राहणार आहे. ३ सप्टेंबर व ४ सप्टेंबर रोजी भगवान श्रीगोपालकृष्ण मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा पार पडणार असून, ५ सप्टेंबर रोजी गोपाळकाला व उत्सव सांगता होणार आहे.

या सप्ताहात नाशिक भजनी मंडळाची सेवा, बारामती मंडळाचे कृष्ण तांडव, श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरी नित्यपाठ अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुपौर्णिमा सोहळ्यानंतर विस्तृत कार्यक्रमपत्रिका जाहीर करण्यात येणार असून, या भक्तिमय सोहळ्यात भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पाणीपुरवठ्यातील अनियमिततेविरोधात सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा १५ ऑगस्ट रोजी उपोषणाचा इशारा



नगर – महापालिकेच्या टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यात अनियमितता, कथित भ्रष्टाचार व नागरिकांना होत असलेल्या त्रासाबाबत मनपा सेवानिवृत्त कर्मचारी ज्येष्ठ नागरिक दिलीपकुमार भांबरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. याबाबत १४ ऑगस्टपर्यंत चौकशी न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वाजता मनपा गेटजवळ आमरण उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी आयुक्तांना निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलीपकुमार भांबरे हे महापालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी असून, सध्या महापालिकेच्या पाणीपुरवठ्यातील अनियमिततेविरोधात त्यांनी तीव्र आक्षेप नोंदविले आहेत. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे, नालेगाव परिसरातील नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून, टँकर व्यवस्थेत गैरप्रकार होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पाणीपुरवठ्याबाबत वारंवार तक्रारी करूनही मनपाच्या वतीने कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तसेच माहिती अधिकारांतर्गत मागविलेली माहितीही अपूर्ण स्वरूपात मिळाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. टँकर व्यवस्थेतील कथित गैरप्रकाराची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करावी, संबंधित टँकरचालकावर व टँकर व्यवस्था पाहणारे लिपीक यांच्यावर कारवाई करावी, तसेच पाणीवाटपासाठी कायमस्वरूपी टँकरची व्यवस्था करून वेळापत्रकानुसार पाणीपुरवठा करावा, अशा प्रमुख मागण्या त्यांनी केल्या आहेत. मागण्यांची पूर्तता न झाल्यास १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण करण्यात येईल. उपोषणादरम्यान होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी मनपा प्रशासनाची राहील, असा इशाराही भांबरे यांनी निवेदनातून दिला आहे.

# केडगाव येथे मासखमन व ६० आठई तपस्यानिमित्त तप अनुमोदना व भक्तिसंध्येला जैन बांधवांचा प्रतिसाद

नगर – केडगाव येथील अंबिकानगर जैन स्थानकात तपस्यानिमित् आयोजित करण्यात आलेल्या भक्तिसंध्या व भावा कार्यक्रमाला जैन समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माने भारलेल्या वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे उपस्थित भाविकांना आध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळाली.



केडगाव येथील अंबिकानगर जैन स्थानकात ३१ उपवासांची कठोर तपस्या पूर्ण करणाऱ्या सौ. कविता संजय बाफना यांचा सन्मान करताना मान्यवर.

हा कार्यक्रम अंबिकानगर जैन स्थानक, केडगाव येथे जैन श्रावक संघाचे संस्थापक अध्यक्ष पन्नालाल बोकरीया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.'चलो झूम उठे भक्ती के धुन में वैदेही के संग'या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या भक्तिसंध्येत वैदेही बोरा यांच्या सुरेल भक्तिगीतांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सुमधुर आवाजातील भक्तिगीतांवर भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने सहभाग घेतला. संपूर्ण स्थानक परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

सौ. कविता संजय बाफना यांनी ३१ उपवासांची कठोर तपस्या पूर्ण व इतरही जणांनी तपस्या (उपवास) केल्याबद्दल समाजबांधवांकडून अनुमोदना देण्यात आली. जैन धर्मामध्ये तपश्चर्या, संयम आणि आत्मशुद्धीला विशेष महत्त्व असून, मासखमन ही अत्यंत कठोर तपश्चर्या मानली जाते. अशा प्रकारची तपश्चर्या करणाऱ्या साधकांच्या त्यागातून समाजाला संयम, श्रद्धा आणि आत्मिक शांतीचा संदेश मिळतो. त्यांच्या या तपश्चर्येचे उपस्थितांनी कौतुक करून त्यांना पुढील धार्मिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात एक उपवास, बेला, तेला तसेच त्यापुढील तपस्या करणाऱ्या तपस्वींचाही विशेष सन्मान करण्यात आला. तपस्या करणाऱ्या प्रत्येक साधकाचा गौरव करून त्यांच्या धार्मिक साधनेला प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे कार्यक्रमाला केवळ भक्तिसंध्येचे स्वरूप न राहता तप, त्याग आणि संयमाचा गौरव करणारे स्वरूप प्राप्त झाले.यापुढेही संघपती पन्नालाल बोकरीया यांच्या अध्यक्षतेखाली अंबिकानगर स्थानक मध्ये श्रावक संघ नवनवीन उपक्रम राबवत राहील, असे मत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन मयुर चोरडीया व सम्राट बरमेचा यांनी केले. तसेच आभार कमलेश गुंदेचा यांनी मानले.

# डिजिटल युगातील आय.एम.एस.सी.डी.आर. ग्रंथालय व संसाधन केंद्र यांची वाटचाल

मानवी संस्कृतीचा विकास हा ज्ञानाच्या जतन, संवर्धन आणि प्रसारावर आधारित आहे. ज्ञान हीच व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीची खरी शक्ती आहे. या ज्ञानसंपदेचे जतन करणारे आणि ती प्रत्येकापर्यंत पोहोचविणारे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे ग्रंथालय. ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे संग्रहालय नसून विचार, संशोधन, संस्कृती, नवोपक्रम आणि आजीवन शिक्षणाचे सशक्त केंद्र आहे. या ज्ञानमंदिराचे प्रभावी व्यवस्थापन करणारा, योग्य माहिती योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचविणारा आणि विद्यार्थ्यांना संशोधनाची दिशा दाखविणारी वास्तू म्हणजे ग्रंथालय.

भारतात दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचं संग्रहालय न होता ती एक संस्था व्हावी चळवळ व्हावी म्हणून अहोरात्र झिजणाऱ्या डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा स्मृतिदिन आहे.त्यांनी भारतीय ग्रंथालय व्यवस्थापनाला वैज्ञानिक अधिष्ठान दिले आणि आधुनिक ग्रंथालयशास्त्राची पायाभरणी केली. त्यांच्या विचारांमुळे ग्रंथालये ही केवळ पुस्तकांची कपाटे न राहता ज्ञाननिर्मिती आणि संशोधनाची गतिमान केंद्रे बनली.

आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयांची भूमिका अधिक व्यापक झाली आहे. इंटरनेटवर माहितीचा महासागर उपलब्ध असला तरी योग्य, विश्वासार्ह आणि संशोधनासाठी उपयुक्त माहिती निवडण्याचे कार्य प्रशिक्षित ग्रंथपालच प्रभावीपणे करू शकतात. त्यामुळे आधुनिक ग्रंथपाल हा केवळ पुस्तकांचा संरक्षक नसून माहिती व्यवस्थापक, संशोधन सुलभकर्ता, ज्ञान मार्गदर्शक आणि डिजिटल शिक्षण भागीदार म्हणून कार्यरत आहे. राष्ट्रीय ग्रंथपाल दिन हा ग्रंथपालांच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस आहे. समाजात वाचनसंस्कृती वाढविणे, माहिती साक्षरता विकसित करणे, संशोधनाला चालना देणे आणि विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या नव्या क्षितिजांशी जोडणे ही ग्रंथपालांची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे.

डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी मांडलेले ग्रंथालयशास्त्राचे पाच नियम आजही प्रत्येक ग्रंथालयासाठी मार्गदर्शक मानले जातात.पुस्तके वापरण्यासाठी असतात. प्रत्येक वाचकाला त्याचे पुस्तक मिळाले पाहिजे.प्रत्येक पुस्तकाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे. वाचकाचा वेळ वाचवला पाहिजे.ग्रंथालय ही सतत विकसित होणारी संस्था आहे.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल लर्निंग, ई–पुस्तके आणि ऑनलाइन माहिती स्रोतांचा विस्तार होत असतानाही हे नियम तितकेच उपयुक्त आहेत. आय.एम.एस.ग्रंथालय हे विद्यार्थी, शिक्षक, संशोधक आणि कर्मचाऱ्यांसाठी आधुनिक ज्ञानकेंद्र म्हणून कार्यरत आहे. पारंपरिक ग्रंथालयाच्या संकल्पनेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शिक्षण, अध्यापन, संशोधन आणि कौशल्य विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध डिजिटल सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सुविधा संशोधन, प्रकल्प, स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक लेखन, नवोपक्रम आणि आजीवन शिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवे बळ देत आहेत. आय.एम.एस.सी.डी.आर ग्रंथालय केवळ पुस्तके उपलब्ध करून देत नाही, तर विविध शैक्षणिक सेवा देखील पुरवते संशोधनासाठी आवश्यक संदर्भ साहित्य उपलब्ध करून देणे विद्यार्थ्यांना मोफत पुस्तक संच उपलब्ध करून देण्यात येतो,प्रकल्प, सेमिनार, प्रबंध आणि संशोधन लेखनासाठी मार्गदर्शन, माहिती शोध व पुनर्प्राप्ती (इन्फॉर्मेशन रिट्रीव्हल) व संदर्भ सेवा,डिजिटल माहितीचा प्रभावी वापर करण्यासाठी मार्गदर्शन,वाचनसंस्कृती, माहिती साक्षरता आणि संशोधनवृत्ती विकसित करण्यासाठी विविध उपक्रमराबविण्यात येतात.

आयएमएस ग्रंथालयाने पारंपरिक ग्रंथालयाच्या संकल्पनेला आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाची जोड देत विद्यार्थी, शिक्षक, संशोधक आणि कर्मचाऱ्यांसाठी उत्कृष्ट अध्ययन व संशोधनाचे वातावरण निर्माण केले आहे. समृद्ध ग्रंथसंपदा, आधुनिक डिजिटल सुविधा, संशोधनाभिमुख सेवा, सुसज्ज अध्ययन कक्ष, संशोधन कक्ष, प्रकल्प विभाग, डिजिटल ग्रंथालय, एन.डी.एल.आय., वेब–ओपॅक, एन.पी.टी.ई.एल., एन.–लिस्ट आणि डेलनेट. आणि इतर ई–संसाधनांच्या माध्यमातून हे ग्रंथालय ज्ञानाचे समृद्ध केंद्र म्हणून कार्यरत आहे.

आय.एम.एस.सी.डी.आर ग्रंथालय हे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रमासाठी सक्षम करणारे आधुनिक ज्ञानकेंद्र आहे. या ज्ञानकेंद्राचा अधिकाधिक उपयोग करून प्रत्येक विद्यार्थ्याने वाचनाची सवय जोपासावी, संशोधनाची आवड निर्माण करावी आणि ज्ञानाच्या बळावर स्वतःचा तसेच समाजाचा विकास साधावा, हीच राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त अपेक्षा.

**– धनराज घोडके** (ग्रंथालय सहाय्यक, आय.एम.एस.सी.डी.आर ग्रंथालय)

# डॉ.अमोल बागुल यांची दुसऱ्यांदा तिरंगा स्वयंसेवक म्हणून निवड

नगर – भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत सुरू झालेल्या हर घर तिरंगा–२०२६ या मोहिमेसाठी येथील दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक डॉ. अमोल बागुल यांची सलग दुसऱ्या वर्षी तिरंगा स्वयंसेवक/ॲम्बेसेडर म्हणून निवड झाली असून मीडिया अपलोड उपक्रमात पोर्टलनुसार भारतातील सुमारे आठ लाख स्वयंसेवकातून उत्कृष्ट कामगिरीमुळे डॉ.बागूल भारतात पाचव्या क्रमांकावर होते. यामुळे मंत्रालयाच्या वतीने त्यांना पाच प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत.



हर घर तिरंगा मोहिमेसाठी दुसऱ्यांदा तिरंगा स्वयंसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल डॉ.अमोल बागुल यांचा सन्मान करताना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया.

९ ते १७ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या मोहिमेचा बॅज डॉ.बागूल यांना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ए आय.तंत्रज्ञानाचा वापर करत या उपक्रमाचे वेबपेज,हॅशटॅग,इमेजेस, व्हिडिओ, गाणी देखील डॉ.बागुल यांनी तयार केली आहेत. वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने यावर्षीची हर घर तिरंगा मोहीम विशेष महत्त्वाची आहे. देशासाठी आपण आपल्या गुणवत्तेतून देशप्रेम दर्शवत असतो. याही वर्षी नागरिकांनी ध्वजसंहितेचे पालन करून तिरंगा सेल्फी काढून मंत्रालयाच्या वेबसाईटवर अपलोड करावा व इतरांना देखीलप्रोत्साहित करावे. यातून नव्या पिढीमध्ये देशभक्ती अजून समृद्ध होण्यासाठी मदत होणार आहेअसे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.आशिया यांनी केले.

भारत सरकारच्या माध्यमातून याआधी डॉ.बागुल यांनी जिल्ह्याचे स्वच्छतादूत, मतदारदूत, निःक्षय मित्र, सायबर म्बेसिडर, युनिसेफ–डब्ल्यू एच ओ स्वयंसेवक, एडस्व्हॉटसअपदूत, विद्यांजली स्वयंसेवक, इस्रो–नासा स्पेस एज्युकेटर आदी घटकांच्या माध्यमातून स्वतःचे कलाकौशल्य व सोशल मीडियाचा चपखल वापर करून अहिल्यानगर जिल्ह्याच्या विविध उपक्रमांमध्ये भरघोस योगदान देऊन जिल्ह्याला अनेक जिल्हा, राज्य, विभाग, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर पारितोषिके प्राप्त झाली आहेत.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मेंदू विकार तपासणी शिबीर

नगर – जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित आचार्य श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६व्या जन्मदिनानिमित्त व स्व. श्रीकंवरबाई नारायणदास लोढा यांच्या समरणार्थ आणि सतीश व संजयकुमार लोढा परिवाराच्यावतीने मेंदू विकार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ९० रुग्णाची तपासणी करण्यात आली.



आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे स्व. श्रीकंवरबाई नारायणदास लोढा यांच्या स्मरणार्थ मेंदू विकार तपासणी शिबिराचे उद्‌घाटन उद्योजक सतीश लोढा यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिराचे उद्‌घाटन उद्योजक सतीश लोढा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संजयकुमार लोढा, उज्वला लोढा, सुनीता लोढा, सुमित लोढा, भाग्यश्री लोढा, कुणाल लोढा, डॉ. वसंत कटारिया, डॉ. आशिष भंडारी, मानकचंद कटारिया, गणेश कांकरिया, वसंत चोपडा, प्रेक्षा लोढा, तज्ज्ञ डॉ. अद्वैत गीते, डॉ. वैशाली कदम, डॉ. स्नेहा म्हस्के आदी उपस्थित होते.

उद्योजक सतीश लोढा म्हणाले, आचार्य आनंदऋषीजी महाराज यांनी संपूर्ण जीवन मानवसेवा, अहिंसा, त्याग आणि करुणेचा संदेश देण्यासाठी समर्पित केले. या आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे काम करताना एक नवी ऊर्जा मिळते तसेच आपल्या हातून रुग्णसेवेचे काम होत असल्याने काम करण्यासाठी प्रेरणा मिळते. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना चांगल्या दर्जाची आरोग्यसेवा मिळणे ही आमची सामूहिक जबाबदारी आहे. वैद्यकीय उपचार दिवसेंदिवस प्रगत होत आहेत; मात्र या सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविले जात असून त्याचा लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा, हा आमचा उद्देश असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

भाग्यश्री लोढा म्हणाल्या, आमचे आजोबा स्व. नारायणदास मोहनलाल लोढा यांच्या जयंतीनिमित्त आमच्या लोढा परिवाराच्या वतीने या शिबिराचे आयोजन केले गेले आहे. या हॉस्पिटलची महिमा संपूर्ण भारतभर प्रचलित झाली आहे. आमच्या लोढा परिवाराला या ठिकाणी काम करण्याची संधी दिल्याबद्दल जैन सोशल फेडरेशन यांचे आभार मानते. वीस वर्षांपूर्वी लावलेले एक छोटेसे रोपटे आज वटवृक्षात रूपांतर झालेले पाहून मनाला समाधान वाटते. आनंदऋषीजी महाराजांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून भविष्यातही समाजोपयोगी आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले, सतीश लोढा हे या हॉस्पिटलसाठी अहोरात्र मेहनत घेत असतात. त्यांच्या दूरदृष्टीच्या माध्यमातून हॉस्पिटलसाठी विविध अत्याधुनिक यंत्र सामुग्री तसेच या हॉस्पिटलच्या वतीने कमी खर्चात उपचार कसे केले जातील यासाठी ते सतत प्रयत्न करत असतात. लोढा परिवार आणि आनंदऋषीजी हॉस्पिटल यांचे अगदी जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

डॉ. अद्वैत गीते म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या उपचारासाठी अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हॉस्पिटलमध्ये उच्च दर्जाचे सीटी स्कॅन तसेच एमआरआय मशीन उपलब्ध असून मेंदू आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचे अचूक निदान करण्यासाठी या आधुनिक यंत्रसामग्रीचा उपयोग केला जातो. आधुनिक तंत्रज्ञानामुळे आजाराचे स्वरूप समजून घेऊन उपचाराची योग्य दिशा निश्चित करण्यास डॉक्टरांना मदत होते. त्यामुळे रुग्णांनी आजाराची लक्षणे जाणवल्यास उपचार पुढे ढकलू नयेत आणि उपलब्ध आधुनिक वैद्यकीय सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले

डॉ. आशिष भंडारी यांनी सूत्रसंचालन केले. आभार मानकचंद कटारिया यांनी मानले.

## गुरुवाणी – १९



### गुरूदेवांप्रती कृतज्ञता व्यक्त करा

तप करणे आव्हानात्मक असले तरी तीर्थंकरांची कृपा असल्यावर ते शक्य होते. गुरूदेवांच्या जन्मोत्सवात अनेकांना तप करता आले नाही कारण तीर्थंकरांची कृपा ते ग्रहण करू शकले नाहीत. ज्यांनी उपवास केले त्यांच्यावर कृपा झाली आहे. जितक्या श्रद्धेने अट्ठाई केली तितक्याच श्रद्धेने पारणा केला पाहिजे. अंतर्मनात अशी शक्ती जागृत करा की पुढच्या वर्षी सुद्धा असेच तप करण्याचा दृढ संकल्प होईल. श्रद्धेने उपवास तप केले तर अनेक समस्यांचे निराकरण होते. अनेक तपस्वींना शारीरिक व्याधी होत्या पण त्यांनी गुरूदेवांवर श्रद्धा ठेवून तप केले. परिणामी त्यांना कोणताच त्रास झाला नाही. ही ताकद दृढ संकल्प आणि गुरूदेवांच्या भक्तीत असते. उपवास करताना अनेक सकारात्मक विचार मनात आले असतील. तपासाठी कोणाकडून प्रेरणा मिळाली असेल. पारणा करताना त्या सगळ्या गोष्टींचे मुद्दाम स्मरण करावे. तीर्थंकर परमात्म्याचे स्मरण करा. ज्यावेळी तुम्ही तपस्या सुरू केली. तुमची उत्कट भावना होती की काहीही झाले तरी मला तपस्या पूर्ण करायची आहे. तेव्हा तुमच्या मनात गुरूभक्ती जागृत झाली. ही भक्ती जन्मोजन्मी जागृत राहण्याची मनोकामना करा. तपस्येमुळे मनातील नकारात्मकता नाहीशी होते. पाप कर्माची निर्जरा तप साधनेतून होते. तपस्या काळात मनात नकारात्मक विचार आले असतील, कधी पोट दुखले असेल, पित्त वाढले असेल. हे सर्व तुमच्या जुन्या कर्माची निर्जरा होती. तीर्थंकर परमात्म्याला प्रार्थना करा, 'भविष्यात जेव्हा साधना करेल तेव्हा माझ्या मनात असे नकारात्मक विचार येणार नाही अशी कृपा माझ्यावर व्हावी'. तपस्ये दरम्यान कोणती इच्छा निर्माण झाली, माझी कोणी तरी सेवा केली पाहिजे, अशी अभिलाषा जागृत झाली. या सगळ्या गोष्टी आठवा. आणि तीर्थंकर परमात्मा आणि गुरुदेवांना निवेदन करा, 'जे माझ्या मनात चुकीच्या गोष्टी आल्या, त्यासाठी मला क्षमा करा'. ज्यांनी तपस्या दरम्यान सेवा केली त्यांना धन्यवाद द्या. समर्पण चातुर्मास कमिटी, चातुर्मास लाभार्थी बोरा परिवार, डॉक्टर या सर्वांना धन्यवाद द्या.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# चेन्नई येथे स्वातंत्र्य दिनाच्या मुशायरात डॉ. कमर सुरूर यांना निमंत्रण



नगर – तामीळ उर्दू इंटिग्रल लिटररी एज्युकेशनल फाउंडेशनच्या वतीने भारताच्या स्वातंत्र्य दिना निमित्त राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित अखिल भारतीय उर्दू मुशायराचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यामध्ये भारतातील नामांकित शायरांना निमंत्रित करण्यात आले आहे. या मुशायऱ्याचे प्रमुख आकर्षण म्हणून देशातील नामांकित उर्दू कवयित्री, लेखिका, पत्रकार आणि अनुवादक नगर येथील डॉ. कमर सुरूर यांना विशेष निमंत्रित करण्यात आले आहे.

हा ऑल इंडिया मुशायराचा कार्यक्रम १४ ऑगस्ट रोजी रात्री चेन्नई येथे आयोजित करण्यात आला आहे. आपल्या प्रभावी शायरी, साहित्यिक लेखन आणि उर्दू भाषेच्या संवर्धनातील उल्लेखनीय योगदानामुळे डॉ. सुरूर यांना देशभरात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यांच्या सादरीकरणामुळे मुशायऱ्याला एक वेगळी उंची प्राप्त होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. हा कार्यक्रम बैतुल मॉल कन्व्हेन्शन हॉल त्रिप्लिकेन चेन्नई येथे आयोजित करण्यात आला आहे.

# नगरचे कवी दत्तात्रय वारकड यांना राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार' जाहीर

नगर –प्रेरणादायी वक्ते व कवी दत्तात्रय वारकड यांना या वर्षीचा



'राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार – २०२६ जाहीर करण्यात आला आहे.२३ ऑगस्ट रोजी के. एस. आय. पब्लिकेशन्स, कोल्हापूर (मु.पो. इंगळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांच्या वतीने आळंदी येथे आयोजित ३० वे राज्यस्तरीय साहित्य संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

कवी वारकड यांचे साहित्य क्षेत्रात निःस्वार्थ भावनेने, संवेदनशील लेखनशैलीने, सामाजिक जाणीव व साहित्यनिष्ठा जपत सातत्यपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या सृजनशील साहित्यकृती सम ाजमनाला विचारप्रवृत्त करणाऱ्या असून साहित्यविश्वात त्यांनी स्वतंत्र असा ठसा उमटविला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय साहित्यसेवेचा गौरव म्हणून त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# संघर्ष प्रतिष्ठान आयोजित श्रावण स्पेशल उपवास पदार्थ बनविण्याची स्पर्धा संपन्न

नगर – श्रावण हा हिंदू धर्मातील पवित्र महिना असून या महिन्याला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. श्रावण महिन्यात नागरिक मोठ्या प्रमाणात उपवास करतात. उपवासाच्या काळात सकस आणि पौष्टिक आहार घेऊन उत्तम आरोग्य राखणे गरजेचे आहे. याच उद्देशाने संघर्ष प्रतिष्ठानच्या वतीने श्रावण स्पेशल उपवास पदार्थ बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

किरणताई बारस्कर म्हणाल्या, सकस आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थांच्या व्यवसायातून महिलांना आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावता येऊ शकतो. गृहिणी म्हणून काम करताना महिलांना स्वयंपाकाची खरी आवड आणि विविध पदार्थ बनविण्याचे कौशल्य असते. याच कौशल्याचा उपयोग करून उपवासाचे खाद्यपदार्थ बाजारात आणत व्यवसायाची सुरुवात करता येईल.

अहिल्यानगर शहर हे खवय्येप्रेमी शहर असून नागरिकांना चविष्ट आणि दर्जेदार उपवासाचे खाद्यपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा. आपल्या आवडीला व्यवसायाची जोड देऊन महिलांनी आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन किरणताई बारस्कर यांनी केले.



संघर्ष प्रतिष्ठान आयोजित उपवासाचे पदार्थ बनवा स्पर्धेतील सहभागी महिला व त्यांनी बनविलेले विविध पदार्थ. (छाया – लहू दळवी)

संघर्ष प्रतिष्ठान आयोजित या स्पर्धेसाठी माजी नगरसेविका शितलताई जगताप, किरणताई बारस्कर, धनश्री खरडे, दिपाली बल्लाळ, प्रियंका हौसिंग आदींसह स्पर्धक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी दिपाली बल्लाळ म्हणाल्या, श्रावण स्पेशल या आगळ्यावेगळ्या स्पर्धेत दोन मैत्रिणींनी एकत्र येऊन एक उपवासाचा पदार्थ बनवायचा होता. यामध्ये सासू–सून, आई–मुलगी, जावा–जावा, नणंद–भावजय, बहीण–बहीण किंवा खास मैत्रिणींना सहभागी होता येणार होते.

या संकल्पनेला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलांनी एकत्र येत आपल्या आवडीचे व नाविन्यपूर्ण उपवासाचे पदार्थ तयार करून स्पर्धेत सहभाग घेतला. या माध्यमातून महिलांच्या पाककौशल्याला व्यासपीठ मिळाले तसेच चांगला आहार, उत्तम आरोग्यचा संदेशही देण्यात आला.

स्पर्धेतील विजेते– प्रथम क्रमांक : ज्योती दोषी व कविता छप्पनिया, द्वितीय क्रमांक : उज्वला आभाने व जनाबाई खोसे, तृतीय क्रमांक : सोनल भूतकर व भारती खरमाळे, उत्तेजनार्थ : लक्ष्मी गाडे व पूजा दिंडू तसेच सौ. ज्योती लिंगडे व श्वेता कोडेकर, स्पर्धेतील विजेत्या व सहभागी महिलांचा सन्मान करण्यात आला. महिलांनी आपल्या पाककौशल्यातून तयार केलेल्या विविध उपवासाच्या पदार्थांना उपस्थितांकडून दाद मिळाली.



देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त शहर भाजपच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या तिरंगा यात्रेत शेकडो विद्यार्थी, भाजपाचे पदाधिकारी, नागरीक हातात तिरंगा झेंडा घेत सहभागी झाले होते.

# शहर भाजपच्या तिरंगा यात्रेने परिसर दुमदुमला

नगर – देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त शहर भाजपच्या वतीने गुरुवारी बालिकाश्रम रोड व सावेडी भागातून भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या यात्रेत विविध शाळांमधील शेकडो विद्यार्थी, भाजपाचे पदाधिकारी व नागरीक हातात तिरंगा झेंडा घेत उत्स्फूर्त सहभागी झाले होते. यावेळी भारतमातेच्या व देशभक्तीच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

अनिल मोहिते म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सर्वत्र उत्साहाचे व स्फूर्तीदायक वातावरण निर्माण झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रभक्ती जागृत करण्यासाठी प्रत्येकाने तिरंगा हाती घेऊन रॅली काढण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार शहर भाजपाच्या वतीने तिरंगा यात्रेचे आयोजन केले आहे. नगरमध्ये झालेल्या या तिरंगा यात्रेमुळे देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी देशाप्रती अभिमान बाळगून देश कार्यात सहभागी व्हावे.

या तिरंगा यात्रेत शहर भाजपाचे सरचिटणीस अशोक गायकवाड, सावेडी मंडल अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे, कालिंदी केसकर, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, युवा मोर्चाचे अध्यक्ष ऋद्रेश अंबाडे, मुकुल गंधे, पुष्पा बोरुडे, महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक निखिल वारे, करण कराळे, मनोज दुल्लम, बाबासाहेब सानप, राहुल जामगावकर, सुरेखा जंगम, सविता मोरे, गोविंद गायकवाड, आदित्य देशपांडे व रेखा मैड आदींसह नागरिक, केशवराव गाडीलकर हायस्कूल, मंदाकिनी कलामंदिर व सखाराम मेहेत्रे शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

# आयसीएआयचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सीए मंगेश किनरे यांची नगर शाखेस भेट

नगर – आयसीएआयचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सीए मंगेश किनरे यांनी नुकतीच अहिल्यानगर शाखेला भेट देऊन शाखेतील सदस्यांशी संवाद साधला. या प्रसंगी त्यांचे पोलिस बँड पथकातर्फे जंगी स्वागत करण्यात आले.

सीसीएम सीए उमेश शर्मा, सीसीएम सीए पीयूष छाजेड, आरसीएम सीए संजय निकम हे सुद्धा उपस्थित होते. अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी सीए मंगेश किनरे यांचे स्वागत केले. आपल्या स्वागतपर भाषणात त्यांनी अहिल्यानगर शाखेच्या विविध उपक्रमांची, सदस्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक व शैक्षणिक कार्यक्रमांची तसेच शाखेच्या भविष्यातील योजनांची माहिती दिली. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही चार्टर्ड अकाउंटंट्स साठी धोका नसून, भविष्यात नवीन संधी निर्माण करणारे प्रभावी साधन ठरेल, असे प्रतिपादन सीए मंगेश किनारे यांनी केले.



आयसीएआयचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सीए मंगेश किनरे यांची अहिल्यानगर शाखेस सदिच्छा भेट दिली असता त्यांचे स्वागत करताना पदाधिकारी.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करताना नैतिकता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता यांना सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर चार्टर्ड अकाउंटंट्सनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आपल्या व्यावसायिक कौशल्यांमध्ये सातत्याने वाढ करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर शाखेतील ज्येष्ठ व अनुभवी सदस्यांचा विशेष सन्मान करून त्यांच्या व्यावसायिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी शाखेतील नवीन एलईडी स्क्रीनचे उद्घाटन सीए मंगेश किनारे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी अध्यक्ष सीए मोहन बरमेचा, सीए संजय देशमुख, सीए अजय मुथा, सीए मिलिंद जांगडा, सीए सुशील जैन, सीए प्रसाद भंडारी, सीए (डॉ) परेश बोरा, सीए किरण भंडारी, सीए संदीप देसरडा, सीए पवनकुमार दरक, सीए ज्ञानेश्वर काळे, सीए सनित मुथा हे उपस्थित होते. सूत्रसंचालन सीए काजल चंदे यांनी केले तर सीए महेश तिवारी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया, उपाध्यक्ष सीए महेश तिवारी, सचिव सीए महेश भळगट, खजिनदार सीए सुनंदा रच्चा, सदस्य सीए काजल चंदे, सदस्य सीए प्रसाद पुराणिक, आणि नगर विद्यार्थी शाखेचे सभासद यांनी परिश्रम घेतले.



आयएमएस संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करताना प्रभारी संचालक डॉ. प्रणोती तेलोरे, डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, कार्यालीन अधीक्षक महेश दीक्षित, लेखापाल नरेंद्र कदम आदी.

# 'आयएमएस'मध्ये बीबीए व बीसीए प्रवेश प्रक्रियेला प्रतिसाद

नगर – बी.पी.एच. ई. सोसायटीच्या आयएमएस शिक्षण संस्थेत २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी बीबीए व बीसीए प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून, विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी उत्तम प्रतिसाद मिळत असल्याची माहिती माहिती प्रभारी संचालक डॉ. प्रणोती तेलोरे यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने सन २०२६–२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. आयएमएस संस्थेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी डॉ. एम. बी. मेहता, संस्थेचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, कार्यालीन अधीक्षक महेश दीक्षित, लेखापाल नरेंद्र कदम, दिपक तुंगार, अश्विनी येळीकर, अनुश्री गुंफेकर, किरण साबळे, सी. डी. मोहिते, सॅम्यूअल उजागरे व इतर सदस्य उपस्थित होते.

शासनाच्या निवड प्रक्रियेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सोपी व्हावी म्हणून ऑनलाईन पध्दतीने सर्व सोपस्कार राबविले जातात. प्रवेश प्रक्रियेचा फॉर्म भरण्यापासून फी भरेपर्यंत सर्व सुविधा ऑनलाईन आहेत. ही प्रकिया पूर्ण झाल्यानंतर प्रशासन विभागाच्या वतीने प्रक्रिया पूर्ण झाल्याचे पत्र, पुष्प, सॅक (बॅग) देऊन मुलांचे स्वागत केले जाते.

प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी एक हेडआउट तयार केला आहे की जे आय. एम. एस. मधल्या त्यांच्या शैक्षणिक कार्यकाळात काय करावे आणि काय करू नये याबाबत मार्गदर्शक सुचना देणारा आहे. शिष्यवृत्तीच्या औपचारिकतेची माहिती देणारा एक क्यूआर कोड प्रशासन विभागाच्या वतीने तयार केला आहे. या दोनही गोष्टी विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर आहेत.

आयएमएसमध्ये उच्च दर्जाचे शिक्षण, उत्तम कंपन्यांसोबत असणारे संबंध, यामुळे नोकरीच्या भरपूर संधी मुलांसाठी उपलब्ध आहेत. त्यामुळेच आयएमएस संस्थेला मुलांचे प्राधान्य असल्याचे डॉ. विक्रम बार्नबस यांनी सांगितले.

# पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करण्याच्या मागणीसाठी बँक कर्मचाऱ्यांनी केली 'निदर्शने'

नगर – पाच दिवसीय बँकिंग आठवडा लागू करण्याच्या प्रलंबित मागणीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी, 'युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स' च्या देशव्यापी आवाहनानुसार नगर–मधील बँक कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली. प्रोफेसर चौक येथील युनियन बँकेसमोर झालेल्या या निदर्शनांमध्ये शहरातील सर्व बँकांमधील बहुसंख्य कर्मचारी आणि अधिकारी सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या आंदोलनात महिला बँक कर्मचाऱ्यांचा सहभाग लक्षणीय होता.





पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करण्याच्या मागणीसाठी निदर्शने करताना नगरमधील बँक कर्मचारी.


बाराव्या द्विपक्षीय करारात इंडियन बँक्स असोसिएशनने पाच दिवसीय बँकिंग तत्त्वतः मान्य करूनही, केंद्र सरकारकडून यावर अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. सरकारच्या या वेळकाढू धोरणाचा तीव्र निषेध करण्यासाठी ही निदर्शने करण्यात आली. यावेळी जोरदार घोषणा देऊन कर्मचाऱ्यांनी परिसर दणाणून सोडला.

सभेचे प्रास्ताविक अध्यक्ष कॉ. माणिक अडाणे यांनी करून आंदोलनाची मुख्य भूमिका स्पष्ट केली. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले कॉ. कांतीलाल वर्मा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सरकारच्या वेळकाढू धोरणावर कडक शब्दांत टीका केली व लवकरात लवकर निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला.

या निदर्शनांमध्ये कॉ. संदीप सरोवरे, कॉ. सागर तनपुरे, कॉ. सचिन शिरसाठ, कॉ. प्रकाश कोटा, कॉ. शशांक नवले, कॉ. महेश पंडित, कॉ. समीर डांगवळे, कॉ. सुरज गाडे, कॉ. अमोल पवार, कॉ. कीर्ती जोशी, कॉ. अमोल बर्वे, कॉ. उमाकांत कुलकर्णी, कॉ. राजेंद्र बेरड, कॉ. पल्लवी लोखंडे, आणि कॉ. प्रतीक्षा गवळी यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. शहरातील अनेक बँक कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. जर सरकारने लवकरात लवकर पाच दिवसीय बँकिंगच्या प्रस्तावाला मंजुरी दिली नाही, तर आगामी काळात युएफबीयू च्या नेतृत्वाखाली संपाचे हत्यार उपसण्याचा इशारा देण्यात आला. निदर्शनांचे सूत्रसंचालन कॉ. सुजय नळे यांनी केले व कॉ. उमाकांत कुलकर्णी यांनी आभार मानले.

**गाळा भाड्याने देणे**
१५०० स्के.फुट आर सी सी कमर्शीयल शोरूम, बँक, फायनान्स, एजेंन्सी
इ. पार्किंग/सर्व सोईंनीयुक्त उपलब्ध टिळक रोड अहिल्यानगर
**7057398661**

**ढोल पथकसाठी प्लॉट भाड्याने देणे**
रोहन रियल्टी
**9881241060**



प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञांचा सल्ला
सन २०१० पासून
मुलाच्या शालेय प्रगतीसाठी व बुद्धी विकासासाठी
(जन्मा पासून ते १८ वर्षा पर्यंत)
**चिरायु**
लहान मुलांचे क्लिनिक
मो.९५२७९३१३८४/८८३०४००१७०
१ शाळा चौक,तुळजाभवानी मंदिरा समोर,(सायंड बेकरीसमोर) अहिल्यानगर.

**पाहिजेत**
अहिल्यानगर MIDC मधील नामांकित कंपनीमध्ये अनुभवी आणि कुशल
**मशीन ऑपरेटर**
CNC VTL machine operator- 4 nos
CNC HMC machine operator-4 nos
अनुभव आणि कौशल्यानुसार प्राधान्य मिळेल
**9271817181**

**पाहिजे**
पेट्रोल पंपावर काम करण्यासाठी पंप
**पुरुष** ऑपरेटर पाहिजे
नायरा पेट्रोल पंप,बालिकाश्रम रोड, सावेडी, अहिल्यानगर
**9922199909**

**पाहिजेत**
राखी शॉपमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत
(पार्ट टाईम/फुल टाईम)
**परदेशी बंधू रक्षाबंधन**
घासगल्ली, कापड बाजार, अहिल्यानगर
**9890913382**

सावेडी येथील नामांकित शोरूमसाठी
**त्वरित पाहिजेत**
सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षाचा अनुभव
कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES One Stop Shop
**SONY GIFTS** PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar
**7887395983**

**ऑफिस भाड्याने देणे**
एरिया :- ३५०० चौ. फूट
उपयुक्त - बँक, कॉर्पोरेट ऑफिस, फायनान्शियल इन्स्टिट्यूट, सीए, क्लिनिक किंवा डायग्नोस्टिक सेंटर, जिम फिटनेस स्टुडिओ, योगा सेंटर, कोचिंग क्लासेस, आयटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, इत्यादीसाठी उपयुक्त
**मार्क स्क्वेअर**
१ ला मजला, ऑफिस नं. - २ प्लॉट नं. - १०२/२/५, सावेडी रोड, कोहिनूर मॉल्स्या समोर, अहिल्यानगर.
**9270503030/ 9209848287**

**पाहिजेत**
५० ते ६० वयाचा कमी शिकलेला २४ तासासाठी माणुस पहिजेत.
*भेटा*
**9422222226**

**पाहिजेत**
डिलिव्हरी बॉय १
ड्रायव्हर - १
**9657115000**

**WE ARE HIRING**
CNC/ VMC/Operator /GDC Operator
Foundry/ Heat Treatment Operator
paintshop/ Maintenace Eng. / Molding /
RCM / VR / Qulity Engineers/ Safty/Packing
Email hi.skill2004@gmail.com
Call- Hi Skill **9822613188**

अंडरग्राउंड बुकिंग सुरू
**MY CINEMA**
AHILYANAGAR'S 1ST
**5-SCREEN MULTIPLEX**
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow



Show - 14 to 17 Aug 2026
AWARAPAN 2 - 8:30 am, 9:45, 12:30, 3:15, 4:15, 5:45, 8:15, 9:15, 10:45pm,
THE END OF OAK (Hindi) - 11:00 am, 6:00, 10:30 pm,
BATWARA 1947 - 9:45, 11:00 am, 12:15, 3:00, 5:30, 6:45, 8:15, 10:45pm,
SPIDER-MAN (Hindi) - 1:00, 3:30, 8:00 pm, SAMARTH (Marathi) - 12:00, 1:30, 5:00 pm,
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

**शाडू मातीचे गणपती**
पेण येथील शुद्ध शाडू मातीचे सजावट केलेले, शास्त्रोक्त सात्विक, मनमोहक, देखण्या श्रीमंत गणेशमूर्ती किफायतशीर दरात मिळण्याचे कलादालन
डेकोरेट केलेल्या मूर्ती पाहण्यासाठी अवश्य भेट द्या.
**विघ्ने आर्ट गॅलरी** बुकिंग सुरु
श्री लक्ष्मीनारायण मंदिरा समोर, बागडपट्टी, अ.नगर
मो. **9860222259, 9665022280**

**पाहिजेत**
**सिक्युरीटी गार्ड**
**8788365654**

**अशोक बारगजे अँण्ड कं.**
**मुले-मुली पाहिजेत**
अनुभवी उमेदवार - ३ जागा
टॅलीचे चांगले ज्ञान आवश्यक- अकौंटींग-जीएसटी कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य
फ्रेशर उमेदवार - २ जागा - टॅलीचे ज्ञान आवश्यक
शिकण्याची इच्छा व कामाची शिस्त आवश्यक
(पगार ₹१०,००० ते ₹२०,००० पर्यंत : उमेदवाराच्या ज्ञान व अनुभवाप्रमाणे)
**साईमिडास टच बिल्डींग,** चंदूकाका ज्वेलरीच्या वरती कोहिनूर मॉलसमोर, सावेडी,अहिल्यानगर, मो : **9096195554**

**SONI TILES** Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

**15 ऑगस्ट १३ वा वर्धापनदिन**
अद्यावत.. नुतणीकृत हॉस्पिटलचा
स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा...
**रच्चा बालरूग्णालय व प्रसुती गृह**
चिमुकल्यांच्या सर्वांगिण आरोग्याची परिपूर्ण काळजी...



आपल्या सेवेत...
एक तपपुर्ती (१२ वर्षे) पुर्ण करुन १३ व्या वर्षात यशस्वी पदार्पण...
**रच्चा बालरूग्णालय व प्रसुती गृह**
मोहनबाग, सपना फोटो स्टुडिओ मागे, दिल्लीगेट, अहिल्यानगर फोन नं. **8420485253**
डॉ. सुरेंद्र शरद रच्चा
M.B.B.S., D.C.H.
(नवजात शिशु व बालरोग तज्ञ)
अध्यक्ष, बालरोग तज्ञ संघटना,अ.नगर
डॉ.सौ. कंचन सुरेंद्र रच्चा
M.B.B.S., D.G.O. (स्त्रीरोग तज्ञ)

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
**दि. : १४ ते २० ऑगस्ट २०२६**
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

| SCREEN - 1 | | SCREEN - 1 | |
|---|---|---|---|
| **स्पाईडर मॅन** | | **आवारापन २ (हिंदी)** | |
| 01.00 AM | 230/- | 09.30 AM | 100/- |
| **बटवारा १९४७** | | 12.30 PM | 150/- |
| 10.00 AM | 100/- | 03.30 PM | 200/- |
| 04.00 PM | 150/- | 06.30 PM | 200/- |
| 07.00 PM | 150/- | 09.30 PM | 200/- |
| 10.00 PM | 150/- | | |

**आशा स्क्वेअर** कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
**दिनांक : ०७ ते 13 ऑगस्ट 2026**

धमाल-४: 10:00 AM, 01:00 PM, 07 :30 PM, 10 :15 PM
जननेता: 09:15 AM, 01:30 PM, 09:00 PM
स्पाईडर मॅन (हिंदी): 08:30 AM, 11:20 AM, 04:50 PM, 10:20 PM
मामाच्या गोव्याला जाऊया: 04:00 AM
स्पाईडर मॅन (इंग्रजी): 02:05 PM, 07:35 PM
माय ब्लडी व्हॅलेंटाईन: 10:05 AM, 01:00 PM, 06:30 PM, 09:30 PM
देऊळबंद (२): 04:00 PM
हनुमान अंश हिंदी: 05:30 PM

-For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
**CONNPLEX**
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 | 7798094001

## ग्रामपंचायत सुरेगाव, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर
### बी-१ निविदा

ग्रामपंचायत सुरेगाव ता.कोपरगाव जि. अहिल्यानगर साठी १५ वा वित्त आयोग २०२५/२६ या कामासाठी नोंदणीकृत ठेकेदार/पुरवठादार यांचे सीलबंद बी १ निविदा दरपत्रके मागवण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे सुरेगाव येथे पाणीपुरवठा विहीर कदम वस्ती रस्ता मजबुतीकरण व अनुषंगिक कामे करणे . | १५ वा वित्त आयोग | २४१३७६/- | खुला |

(काम पुर्ण करण्याचा कालावधी- ६ महिने), निविदा रक्कम- १००/-
**अटी व शर्ती-** अटी व शर्ती १) निविदा व माहितीपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात १४/०८/२०२६ ते २०/०८/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) निविदा दि. २१/०८/२०२६ रोजी १०.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील. ३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

सरपंच/ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत सुरेगाव, ता. कोपरगाव,जि.अहिल्यानगर

**बाळ आजारी आहे का?**



▮ ते वारंवार आजारी असणे ▮ नेहमी सर्दी, खोकला ▮ वारंवार होणारा बाल दमा ▮ वारंवार जुलाब होणे ▮ प्रतिकारशक्ती कमी असणे ▮ वजन, उंची कमी
या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
*सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध. *सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds संपर्क : मो. ९५१११९०४४४
**अक्षय मुलांचे हॉस्पिटल** बालिकाश्रम रोड, अ.नगर

## अ. नगर तालुका नागरी सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या. अहिल्यानगर

व्यापारी संकुल,१ ला मजला,गाळा नं.४, मार्केटयार्ड,म.फुले चौक,जी.एस.महानगर बँकेजवळ,अहिल्यानगर. पिन.४१४००१.

जाक्रतापफे/५१४/ पुण्यश्लोक पत/सन २०२६ — दिनांक २०/०७/२०२६

### स्थावर मालमत्ता ताबा घेतल्याबाबतची नोटीस
(नमुना झेड)
( नियम १०७ पोटनियम (११(ड-१)पहा )

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मार्यादित, गजराज फॅक्टरीसमोर, भिस्तबाग, अहिल्यानगर ता. जि. अ. नगर, अ. नगर तालुका नागरी सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या;अहिल्यानगर. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून मागणीची नोटीस ऋणको श्री-सतिश रखमाजी ढवण करीता जामिनदार श्री- वैशाली दिलीप तुंगार यांना देऊन नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम रु:- ९४,९३२/-(अक्षरी - चौऱ्याण्णव हजार नऊशे बत्तीस मात्र/-) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केलेली आहे. खाली सही करणाऱ्याने दि. ०७/११/२०२४ रोजी स्थावर जप्ती नोटीस दिली असून,पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. तसेच दि १६/०१/२०२६ रोजी स्थावर मालमत्तेचा ताबा घेणेबाबतची नोटीस देखील पाठविणेत आलेली आहे.

ऋणकोणे रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७(११ ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. १६/०२/२०२६ दिवशी प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे कि, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये. आणि व्यवहार केल्यास पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मार्यादित, गजराज फॅक्टरीसमोर,भिस्तबाग,अहिल्यानगर यांच्या कर्ज बोजाची रक्कम रु:- ९४,९३२/- आणि दि. २०/०६/२०२४ पासून द.सा.द.शे. १८% दराने होणारे व्याजास व खर्चास अधीन रहावे लागेल.

**स्थावर मालमतेचे वर्णन**

| अ. नं. | गावाचे नाव | गट नं. | क्षेत्र | इतर बोजे |
|---|---|---|---|---|
| १ | भिस्तबाग ता. जि. अहिल्यानगर | ५/१अ/ प्लॉट नं. ३९/१ | ०.७२.४३ पैकी चौ.मी. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रा. बि. पत. मर्या. अ. नगर |

**( एन .पी.दळवी)**
विशेष वसुली व विक्री अधिकारी,
( महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये )

जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्था
## जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा
ता. पारनेर जि. अहिल्यानगर, ४१४३०३

### टेंडर नोटीस
दिनांक १४/८/२०२६

अधिकृत मटेरियल सप्लायर्स नेमणेबाबत
(दरपत्रक निविदा)

*आमच्या विद्यालयाच्या नविन बांधकाम चाललेल्या शाळा इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील ''शाळा रिक्रिएशन हॉल'' छतासाठी लागणारे रूफिंग शीटस ५००० mm (L) x १००० mm (W) ७२ नग आणि इतर ढापे व फिटिंग मटेरियल चे रेट (दरपत्रक) बंद लिफाफ्यामध्ये शाळेच्या वरील पत्त्यावर देण्यात यावे.
*कोरे टेंडर फॉर्म रुपये ५००/- भरुन वेळ सकाळी ९ ते ४ वा. पर्यंत दिनांक १५/०८/२०२६ ते दिनांक १८/०८/२०२६ पर्यंत शाळेच्या कार्यालयात मिळतील.
* भरलेले टेंडर फॉर्म बंद लिफाफ्यात सीलबंद करून दिनांक १८/०८/२०२६ ते २१/०८/२०२६ पर्यंत वरील वेळेत शाळेच्या कार्यालयात वरील पत्त्यावर जमा करावेत.
* टेंडर जमा करताना त्यासाठी रु. ३०००/- बयाना रक्कम भरावी लागेल.
* वरील मटेरियल सप्लाय करण्याचा कालावधी १५ दिवसांचा राहील.
१) वरील मटेरियल चे सर्व दरपत्रक बंद पाकीटात द्यावे
२) कोणतेही टेंडर मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर नाकारणे याबाबत सर्व अधिकार संस्थेने राखून ठेवलेले आहेत.

प्र. मुख्याध्यापक. जय मल्हार विद्यालय, पिंपळगाव रोठा
सचिव जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्था पिंपळगाव रोठा ता. पारनेर जि. अहिल्यानगर.

## CAVALRY CANTEEN
ACC&S AHILYANAGAR ph-no -0241-2320751

### TENDER NOTICE

Invites sealed tenders from eligible and experienced transport service providers for the provision of trucks to facilitate store collection operations.

**Scope of work**
1. Supply trucks suitable for collection and delivery of goods from CSD Depo Khadki, Pune to Cavalry Canteen, Jamkhed Raod, ACC&S, Ahilyanagar.
2. Enusre timely pickup and delivery.
3. Provide trained drivers with necessary licenses.

**Eligibility Criteria**
1. Minimum 05 years of experience in commercial transport services.
2. Monthly 25 to 27 trucks required with 06 tyre, 10 tyre, 12 tyre & 14 tyre.
3. Compliance with statutory requirements (RTO registration, insurance, PUC etc)

**Submission of Tender**
1. Tender documents must include company profile, fleet details, compliance certificates, and financial quotation.
2. Sealed tenders should be submitted to Cavalry Canteen before 30 July 2026.

**Evaluation Criteria**
1. Technical capability and fleet strength.
2. Past performance and references.
3. Competitive pricing.
4. Compliance with statutory and safety requirements.

**Terms & Conditions**
1. The Cavalry Canteen ACC&S, reserves the right: without assigning reasons.
2. Contract period will be valid for a period of two years.

दर्जेदार व माफक दरात
**फ्लेक्स प्रिंटींग**
**9403232323**

## अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर

प्रकल्प विभाग जा. क्र
दि. १३/०८/२०२६
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रकल्प विभागामार्फत चितळे रोड नेहरू मार्केट या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसविणे करिता स्थापत्य कामाअंतर्गत ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येणार आहेत तरी ऑफ लाईन निविदा मनपाच्या www.amc.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**उपायुक्त (सा.)**
अहिल्यानगर, महानगरपालिका

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **१. पुजा आशु सिंग, २. अनिकेत संजय भालसिंग, ३. कांचन संजय भालसिंग, ४. संजय गणपतराव भालसिंग, ५. सरला श्रीनिवास सोनवणे, ६. श्रीनिवास नामदेव सोनवणे** विद्यमान मालक नं. १ ते ६ रा. अहिल्यानगर. **व ७. स्वाती विजय पायघन, ८. सविता राम पायघन, ९. आबासाहेब मारुती पायघन, १०. विमल आबासाहेब पायघन,** विद्यमान मालक नं. ७ ते १० रा. खंडोबानगर, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून आमच्या अशिलाकडुन रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-** डि.।। अहिल्यानगर, सब. डि.।। ता. नगर पैकी, अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे बुऱ्हाणनगर येथील रहिवास विभागात समाविष्ट असलेले जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स. नं. | हे.आर. | रु.पै. |
|---|---|---|
| १०६/१अ/२/१ | ०.६० | २.१२ |

**यापैकी विद्यमान मालक नं. १ ते १० यांच्या मालकीची संपुर्ण ० हे. ०८ आर (८२४८.०१ चौ. फुट) जाणे-येणाच्या रस्त्यासह जमीनीबाबत याचा नियोजीत प्लॉट नं.१२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २० व २१ असा आहे.**
**नियोजित प्लॉट नं. १२ ते २१ यांसी एकत्रित चतु:सिमा -**
पुर्वेस - ४.०० मीटर अंतर्गत रस्ता — दक्षिणेस - गट नं. पैकी नियोजीत प्लॉट नं. ११
पश्चिमेस - गट नं. १०५ — उत्तरेस - गट नं. पैकी नियोजीत प्लॉट नं. २२
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि.१४/०८/२०२६ अहमदनगर.

**ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख** (बीएएलएलबी)
**ॲड. कुरेशी फैजान फारुक** (बीएएलएलबी. डीटीएल)
पत्ता- जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

An ISO 9001:2015 Certified
**DiSHA COMPUTER INSTITUTE**
Career Ki Shuruwat DiSHA ke saath
**15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER**
**Get Any Course Just in 2700/-**
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, ADV. TALLY, BANKING, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, HTML.

**दिल्ली गेट शाखा** — आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर. **9371051769**
**जुने बस स्टँड शाखा** — अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी, अ.नगर. **9371151769**
**पाईपलाईन शाखा** — रुपा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहिल्यानगर **7447761769**

**दीप गार्ड पावर सिस्टम**
सर्व कंपनीचे इन्व्हर्टर व बॅटरी रिपेअर करुन मिळेल.
बॅटरी वॉटर टाकून मिळेल.
घरपोहोच सेवा
जुने इन्व्हर्टर बॅटरी विकत घेतो व विकतो
9260000613




१५ ऑगस्ट
**स्वातंत्र्य दिना निमित्त**
सर्वांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा !
समाजसेवक
**माननीय श्री. अविनाश देडगांवकर**
अ.नगर समाजरत्न पुरस्कार प्राप्त
अहिल्यानगर




जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
**श्री आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड हार्ट सर्जरी सेंटर, अहिल्यानगर**
राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त आयोजित

# भव्य विविध मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर

तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली
दि. १७ ते २८ ऑगस्ट २०२६
रोज सकाळी १० ते दुपारी २

| वार/दिनांक | शिबीरांचे नांव | तज्ञ डॉक्टर्स |
|---|---|---|
| १७ ऑगस्ट २०२६ सोमवार | **स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबीर व मार्गदर्शन-** * दुर्बिणीद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाची पिशवी योनीद्वारे काढण्याची शस्त्रक्रिया रू. 10000/-पॅकेज * सिझेरियन रू. 10000/- * शिबीरात सहभागी होणाऱ्या गर्भवती मातांना सोनोग्राफी, रक्त, लघवी इ. तपासण्या ५०% सवलतीच्या दरात केल्या जातील. (शिबीरापासून पुढे १ महिन्यापर्यंत केल्या जातील) * शिबीरात सहभागी होणाऱ्या गर्भवती मातांना बाळंतपण वेळी होणाऱ्या बिलात ५०% सवलत दिली जाईल. मात्र सवलतीचे कार्ड असणे आवश्यक आहे. |  स्त्री रोग तज्ञ - डॉ. रविंद्र मुथा, डॉ. कृतिका पाटील, डॉ. निलोफर धानोरकर |
| २१ ऑगस्ट २०२६ शुक्रवार | **बालरोग तपासणी शिबीर** नवजात शिशुंच्या सर्व आजारांवर निदान व उपचार. लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, हर्निया, डायाफ्रामॅटिक हर्निया, फायमोसीस, हायड्रोसील, अनडिसेंन्डेड टेस्टीस व इतर | नवजात शिशु व बालरोग तज्ञ - डॉ. निखीलकुमार मुद्दे, बालरोग तज्ञ - डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दीप्ती अग्रवाल, डॉ. सचिन तोडमल, पिडियाट्रिक सर्जन - डॉ. रुपेश सिकची |
| २२ ऑगस्ट २०२६ शनिवार | **कॅन्सर तपासणी शिबीर-** घशाचा, फुफ्फुसाचा, आतड्याचा, तोंडाचा इ. **स्त्रियांचे कॅन्सर तपासणी शिबीर -** मॅमोग्राफी मशिनद्वारे स्त्रियांच्या स्तनाचा कॅन्सर शिबीराचे वैशिष्ट्ये : * स्त्रियांच्या गर्भपिशवीच्या कॅन्सर व निदानाकरिता सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी. सर्व प्रकारचे कॅन्सर उपचार, ब्रेकिथेरपी, ब्लड कॅन्सर, पॅलीयेटीव्ह कॅन्सर उपचार, सिम्टोमॅटीक कॅन्सर उपचार, लहान मुलांचे कॅन्सर उपचार इ. सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध. **मॅमोग्राफी तपासणी रू. 100/- मात्र दरात केली जाईल.** | कॅन्सर सर्जन : डॉ. अनिकेत शिंदे, कॅन्सर फिजिशियन - डॉ. तुषार मुळे, कॅन्सर विकार तज्ञ : डॉ. तिझा बलसारा, फिजिशियन - डॉ. नरेंद्र गिरी, स्त्रीरोग तज्ञ - डॉ. रविंद्र मुथा, डॉ. कृतिका पाटील, डॉ. निलोफर धानोरकर, रेडिओलॉजिस्ट - डॉ. मितेश कटारिया, डॉ. भक्ती काळे, डॉ. सोनाली सोलट, डॉ. निकीता जैन (कटारिया), पॅथोलॉजिस्ट : डॉ. मुकुंद तडे, डॉ. सारिका झरेकर, डॉ. जिज्ञासा मुनोत, मायक्रोबायोलॉजिस्ट : डॉ. नरेंद्र पाटील |
| २३ ऑगस्ट २०२६ रविवार | **मोफत नेत्र रोग तपासणी- अल्पदरात मोतिबिंदु शस्त्रक्रिया शिबीर**  शिबिराचे ठिकाण : आनंदऋषिजी नेत्रालय, भगवान महावीर भवन. नाव नोंदणीसाठी संपर्क : 8686401515 | नेत्ररोग तज्ञ - डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. अशोक महाडीक, डॉ. संदिप राणे, डॉ. प्रतिक कटारिया, डॉ. विशाल तांबे, डॉ. किरण शिंदे, डॉ. नेहा भराडिया, डॉ. केतन राठोड, डॉ. विवेक पाऊलबुधे, डॉ. नलिनी गिते, डॉ. कौस्तुभ घोडके, डॉ. निरंजन पेहरे, डॉ. पुनम लंकेश्वर व इतर नेत्रतज्ञ |
| २४ ऑगस्ट २०२६ सोमवार | **एंडो-युरोलॉजिकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय) स्टोन शस्त्रक्रिया -** * प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरुष वंध्यत्व समुपदेशन, मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मार्गातील विकार, मूत्रमार्ग, मूत्राशय, प्रोस्टेट, पुरुषांचे जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन * महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जातील. | मूत्रविकार शल्यचिकित्सक - डॉ. अजित दरंदले, डॉ. अमेय सांगळे, डॉ. संकेत काळपांडे |
| २५ ऑगस्ट २०२६ मंगळवार | **अस्थिरोग तपासणी मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया व फिजिओथेरपी शिबीर-** संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण/संपूर्ण खुबा प्रत्यारोपण रु. 65,000 पासुन पुढे- (गुणवत्तापूर्वक इम्प्लांटसह) औषध खर्च वेगळा. गुडघेदुखी (TKR पुनर्वसन): Knee pain (Total Knee Replacement Rehabilitation) गोठलेला खांदा (फ्रोजन शोल्डर): Frozen shoulder मानदुखी: Neck pain पाठदुखी: Back pain फ्रॅक्चर नंतरचे पुनर्वसन: Post fracture rehab बेल्स पाल्सी आणि चेहऱ्याचा कमकुवतपणा : Bell's palsy & facial weakness पक्षाघात (पॅरालिसिस) उपचार: Paralysis treatment | अस्थीरोग तज्ञ - डॉ. विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे, स्पाईन सर्जन - डॉ. अमित सुराणा, डॉ. श्रीकांत दलाल, डॉ. भरत जगताप, फिजिओथेरपिस्ट - डॉ. आराधना अरवडे, डॉ. अभय साठे, डॉ. नितीनकुमार |
| २८ ऑगस्ट २०२६ शुक्रवार | **प्लॅस्टिक सर्जरी शिबीर-** लहान मुलांचे जन्मजात हाताचे समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणाऱ्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, हाताच्या नस संबंधित आजार, जखमा, दुभंगलेले ओठ, तुटलेले कान, चेहऱ्यावरील व्रण इ. तोंड, गाल, ओठ, जीभ, जबडा, मान, सायनस आणि लाळ ग्रंथीच्या गाठ्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार, तोंडात होणाऱ्या लाल, पांढरे चट्टे, तिखट व मसालेदार अन्न खाण्यास अडचण येणे, तोंडाच्या व्रण यावर औषधोपचार.. स्माईल ट्रेन प्रोजेक्ट अंतर्गत मोफत शस्त्रक्रिया | प्लॅस्टिक सर्जन : डॉ. आदित्य दमानी, डॉ. मृदुला मुळे |

महावीर भवन - रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे करिता अल्पदरात निवासाची व्यवस्था उपलब्ध. भोजन रु. 35/- मात्र
जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
**श्री आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड हार्ट सर्जरी सेंटर, अ.नगर**
24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक
डिजिटल एक्सरे रू. 250/- | सोनोग्राफी रू. 950/-
Siemen's 96 Slice CT Scan Machine सिटीस्कॅन रू. 1250/-
MRI-1.5 Tesla एम.आर.आय. रू. 2500/-
१२४, आनंदऋषीजी मार्ग, अ.नगर. फोन : २३२०४७३, ७४, ७५ । मो. ९४०४३९९९११
हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.




तरुणाईची एकच आस
**हाती तिरंगा**
देशाचा विकास..


१५ ऑगस्ट
देशाच्या स्वातंत्र्य दिना बरोबरच आमच्या साहेबांचा वाढदिवस..
शहराच्या आर्थिक व वैचारिक आंदोलनासह पतसंस्था चळवळीत धडाडीचे नेतृत्व करणाऱ्या
**मा. श्री. वसंतजी लोढा**
यांना वाढदिवसा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
संस्थापक अध्यक्ष - पंडीत दीनदयाळ पतसंस्था
अध्यक्ष - नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशन
भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
सुधीर पगारिया - उपाध्यक्ष | विकास पाथरकर - मानद सचिव | मिलिंद गंधे - ज्येष्ठ संचालक
संचालक मंडळ
श्रीमती शैला चंगेडे | निलेश लोढा | सुभाष फणसे | सौ. शारदा होशिंग
अनंत होशिंग | आदित्य चांदेकर | बाबासाहेब साठे | किशोर गांधी (सल्लागार)
निलेश लाटे, व्यवस्थापक | सुखदेव दरेकर, उपव्यवस्थापक
शहरातील एक विश्वसनीय व आदर्श पतसंस्था पुरस्कारप्राप्त..
**पंडीत दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अ.नगर**
मुख्य शाखा - आनंदी बाजार, अ.नगर फोन : २३४५४४६, २३२२२४२. * सावेडी शाखा, फोन : २४२४७९७
E-mail : dindayalpat@gmail.com
Dishan



**पेस्ट कंट्रोल**
झुरळ, मुंग्या, उंदीर, वाळवी, ढेकूण, पाल, कोळी व मच्छर इ.साठी
7276423997
9322196180



## ८ वे पुण्यस्मरण


स्व.तात्यासाहेब बाबुराव कोतकर | स्व.लंकाबाई तात्यासाहेब कोतकर

सूर्यापासून जसे त्याची किरणं दूर करणे अशक्य आहे
फुलांपासून जसे त्याचा सुगंध हिरावणे अशक्य आहे...
तसच आमच्या मनातून आपल्या आठवणी दूर होणे अशक्य आहे.

आठव्या पुण्यस्मरणानिमित्त भावपूर्ण श्रध्दांजली..
: शोकाकूल :
गोधाबाई मधुकर कार्ले | रोहिदास बाबुराव कोतकर
रविंद्र तात्यासाहेब कोतकर | राजेंद्र तात्यासाहेब कोतकर
रमेश तात्यासाहेब कोतकर | प्रतिभा अमोल मांडे
**समस्त कोतकर परिवार**




## १० वे पुण्यस्मरण
सावली आम्हाला दिली वटवृक्षाप्रमाणे
शिक्षा आम्हाला दिली अविरत सेवेची..
कर्तृत्व आम्हाला शिकवले स्वकष्टाचे..
आदर्श आम्हाला दिले सद्विचारांचे
**स्व. रतिलालजी कचरदासजी नहार**
संथाराव्रत : १५ ऑगस्ट २०१६
आपल्या स्मृतीदिनी प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली..
श्रीमती कमलाबाई रतिलालजी नहार
सुरेशलाल कचरदासजी नहार
विजय दानमलजी नहार | सुनिल दानमलजी नहार
राजेंद्र रतिलालजी नहार | जितेंद्र रतिलालजी नहार
सौ. निता महेंद्रजी छाजेड (इचलकरंजी)
**नहार परिवार**
रिगल फर्निचर । रॉयल फर्निचर । रॉयल एजन्सी, अहिल्यानगर .



**बजाज वॉटरप्रूफिंग कंपनी**
५ वर्षांच्या लेखी गॅरंटी सह
तोडफोड न करता केमिकल वॉटरप्रूफिंग
टेरेस, बाल्कनी, पाण्याचे हौद इ.
9096291653



## चौथे पुण्यस्मरण
आपल्या संस्काररूपी स्मृतींचा..
स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच
आम्हांला प्रेरणा देत आहे..
******

**स्व. दिनेश महेश दाणे**
जन्म : ०५/०९/१९९३ । स्व. दि.१५/०८/२०२२
एस.एच.लॅमिनेटस् परिवाराकडून भावपूर्ण श्रध्दांजली!
* शोकाकुल *
**एस.एच.लॅमिनेटस् व सर्व स्टाफ**
पाईपलाईन रोड, श्रीराम चौक,अहिल्यानगर